CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ४ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वत:चा विकास करायचा असेल तर आपल्याला शिकण्याची मानसिकता ठेवावी लागेल. अभ्यास संपला असला तरी शिक्षण थांबलेले नाही. स्वत:ला विकसित करण्याची इच्छा म्हणजे दैवी शक्ती होय. ही दैवी शक्ती सर्वांमध्ये असते. फक्त ती असल्याचा विश्वास असला पाहिजे.

**- मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

महायुतीत आपसात पक्षांतर्गत बंदी लागू



# शिवसेनेच्या बहिष्कार अस्त्रानंतर निर्णय
# फडणवीसांनी शिंदेंच्या मंत्र्यांना झापले



**मुंबई, दि. १८ नोव्हेंबर-**
तुम्ही उल्हासनगरमध्ये या प्रकाराची सुरुवात केली. तुम्ही जे केले ते आम्ही चालवून घ्यायचे आणि भाजपने केले तर ते चालणार नाही, असे अजिबात चालणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाल्याचे वृत्त आहे. यापुढे एकमेकांचे नेते, पदाधिकाऱ्यांना प्रवेश देऊ नका. दोन्ही पक्षांनी याप्रकरणी पथ्य पाळावीत. तुम्ही पथ्य पाळणार असाल तर भाजपही पथ्य पाळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना सुनावले.

हा प्रकार घडला त्यावेळी दस्तुरखुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हजर होते. आज दिवसभर मंत्रालय परिसरात याचीच चर्चा सुरु होती. यावरुन ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे राजकारण तापल्याचे चित्र दिसून येते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपवर मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा आरोप करत शिवसेनेने ही भूमिका घेतली. राज्यात सध्या नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. स्थानिक पातळीवर वेगवेगळे राजकीय समीकरणे अस्तित्वात येत आहेत. त्यातच भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. त्यावरून सत्ताधारी महायुतीच्या गोटात प्रचंड धुसफूस सुरू झाली आहे. याप्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना प्रचंड नाराज झाली आहे. या नाराजीतूनच शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर कथितपणे बहिष्कार टाकला. आजच्या प्री-कॅबिनेटला शिवसेनेचे सर्व मंत्री उपस्थित होते. पण त्यानंतर झालेल्या कॅबिनेटला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वगळता शिवसेनेचा एकही मंत्री उपस्थित नव्हता. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या सर्व नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात जाऊन त्यांची भेट घेतली. त्यात त्यांनी भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्यात येत असल्याच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शिंदे गटाचे मंत्री भेटीस आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

यावेळी उभय नेत्यांत काय चर्चा झालीफ? याचा तपशील समोर आला नाही. पण यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे गटाच्या मंत्र्यांना मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याच्या मुद्यावरून चांगलेच झापल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

**एकमेकांच्या पक्षातील कोणालाही प्रवेश नाही द्यायचा :** मुख्यमंत्र्यांना भेटून आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, मुख्यमंत्र्यांशी चर्चा गझाली असून यापुढे एकमेकांच्या पक्षातील कोणालाही पक्षात प्रवेश द्यायचा नाही, असे निश्चित झाले आहे. शिवसेनेचे मंत्री सजय शिरसाट यांनी मात्र या विषयावर पत्रकारांशी बोलणे टाळल्याचे दिसून आले. या सर्व घडामोडी पाहता महायुतीत आपसात पक्षांतर्गत बंदी हा अलिखित कायदा लागू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली तर विरोधकांनी यावरून महायुतीवर टीकास्त्र सोडले.

## महत्त्वाचे

### सलग तेजीनंतर बाजाराची आपटी

**मुंबई** : सलग सहा सत्रातील तेजीनंतर देशांतर्गत शेअर बाजारात मंगळवारी पुन्हा मंदीचे सावट आले. निर्देशांक आणि निफ्टीत घसरण झाली. निर्देशांक २७८ अंकांनी खाली येत ८४,६७३ वर बंद झाला तर, निफ्टीत १०३ अंकांची घसरण झाली. तो २५,९१० वर बंद झाला.



निर्देशांकातील ३० पैकी केवळ सात कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी दिसून आली. उर्वरित सर्व शेअर्स विक्रीच्या दबावाखाली राहिले. जागतिक बाजारातील मंदीमुळे देशांतर्गत बाजारात घसरण झाली. बाजाराची सुरुवात सकारात्मक असली तरी अवघ्या काही मिनिटांतच निर्देशांक, निफ्टी कोसळले.

### अनमोल बिश्नोईचे अमेरिकेतून प्रत्यार्पण

**नवी दिल्ली** : गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोई याचे अमेरिकेतून प्रत्यार्पण करण्यात येत आहे. अनमोलवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी आणि पंजाबी गायक सिद्धू मुसेवालाच्या हत्येचा आरोप आहे. अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेल्या गोळीबारातही अनमोलचे नाव समोर आले. अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ होमलॅण्ड सिक्युरिटीने याबाबतची माहिती झिशान सिद्दीकी यांना ई-मेलद्वारे दिली आहे. झिशान सिद्दीकी यांनी या मेलचा स्क्रीनशॉट शेअर केला. त्यात स्पष्टपणे नमूद आहे की, अनमोल बिश्नोईला १८ नोव्हेंबर रोजी अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ९:३० वाजता मुंबईतील वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलवर हत्या करण्यात आली. लॉरेन्स टोळीने या हत्येची जबाबदारी स्वीकारली.



# हिडमाचा खात्मा; एक कोटींचे होते बक्षीस

**●आंध्रप्रदेशातील चकमकीत सहा माओवादी ठार ●नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले**

**मरेदुमिल्ली, १८ नोव्हेंबर**
आंध्रप्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यात मंगळवारी सुरक्षा दलाशी झालेल्या चकमकीत छत्तीसगडमधील माओवाद्यांच्या केंद्रीय समितीतील सदस्य, बटालियन एकचा प्रमुख क्रूरकर्मा माडवी हिडमा आणि त्याच्या पत्नीचा खात्मा करण्यात आला. या चकमकीत एकूण सहा माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. माडवी हिडमा माओवाद्यांची सर्वाधिक आक्रमक आणि अत्यंत क्रूर मानली जाणारी बटालियन एकचा प्रमुख होता. त्याचा मृत्यू हा माओवादी चळवळीच्या शवपेटीवरील शेवटचा खिळा असल्याचे मानले जात आहे.



हिडमा वयाच्या सोळाव्या वर्षी माओवादी चळवळीत आला होता. मरेदुमिल्ली मंडलच्या जंगलात सकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान ही चकमक झडली, असे अल्लुरी सीताराम राजू जिल्हा पोलिस अधीक्षक अमित बर्दार यांनी सांगितले. आज सकाळी मारेदुमिल्ली मंडल परिसरात माओवादी आणि पोलिस सदलात गोळीबार झाला. या चकमकीत सहा माओवादी मारले गेले, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे. या चकमकीत दोन महिला आणि चार पुरुष माओवादी ठार झाले. विश्वसनीय स्रोत आणि पडताळणीच्या आधारे पोलिसांनी हिडमा त्याची पत्नी मडकम राजे, देवे, लकमल (चैतू), मल्ला (मल्लालू) आणि कमल (कमलेश) यांचा मृत्यू झाल्याच्या माहितीला दुजोरा दिला. मागील काही आठवड्यांपासून आंध्रप्रदेशछत्तीसगड-ओडिशा सीमेवर माओवाद्यांच्या हालचाली वाढल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांकडून मिळाली होती. त्यामुळे शोधमोहीम तीव्र करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. चकमकीनंतर पोलिसांनी दोन एके-४७ रायफली, एक पिस्तूल, एक रिव्हॉल्व्हर, सिंगल बोअर रायफल, इलेक्ट्रिकल आणि नॉन-इलेक्ट्रिकल डिटोनेटर्स, फ्युज वायर, किट बॅग व इतर साहित्य जप्त केले. मुदतीपूर्वीच खात्मा माडवी हिडमाचा ३० नोव्हेंबरपर्यंत खात्मा करण्यात यावा, अशी मुदत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली होती. मात्र, ही मुदत संपायला १२ दिवस शिल्लक असताना सुरक्षा दलांनी माडवी हिडमाला टिपले. अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ही मुदत दिली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# सोलापूर जिल्ह्यात नगराध्यक्षपदासाठी १४६ तर नगरसेवकपदासाठी २२६१ अर्ज

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**
सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा आणि एक नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदासाठी १४६ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. नगरसेवकपदाच्या २८९ जागांसाठी २२६१ अर्ज दाखल झाले आहेत. अनगर नगरपंचायतीच्या नगरसेवकपदाच्या १७ च्या १७ जागा बिनविरोध झाल्या आहेत. याठिकाणी नगराध्यक्ष पदासाठी तीन अर्ज दाखल आहेत. मात्र छाननीत उज्ज्वला थिटे यांचा अर्ज बाद ठरला. त्यामुळे नगराध्यक्षपदाची निवडणूक अविरोध होण्याची शक्यता वर्तविली जात आहे



सोमवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने यादिवशी तहसील कार्यालयांना यात्रेचे स्वरुप आले होते. रात्री उशिरापर्यंत अर्ज भरुन घेण्याची प्रक्रिया सुरू होती. दाखल अर्जांची मंगळवारी छाननी करण्यात आली. उमेदवारांना शुक्रवार, दि.२३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

**करमाळा** : नगराध्यक्षपदासाठी १५ तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी २५४ अर्ज दाखल झाले आहेत. **अक्कलकोट** : नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवकांच्या २५ जागांसाठी १७५ अर्ज दाखल झाले आहेत. **दुधनी** : नगराध्यक्षपदासाठी ७ तर नगरसेवकांच्या २० जागांसाठी ९७ अर्ज दाखल झाले आहेत. **अकलूज** : नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ७ तर नगरसेवकपदाच्या २६ जागांसाठी १५१ अर्ज दाखल झाले आहेत. **पंढरपूर** : नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकांच्या ३६ जागांसाठी ३६६ अर्ज प्राप्त झाले आहेत. **मंगळवेढा** : नगराध्यक्षपदासाठी १७ तर नगरसेवकाच्या २० जागांसाठी १६० अर्ज दाखल झाले आहेत. **कुर्डुवाडी** : नगराध्यक्षपदासाठी १० तर नगरसेवकांच्या २० जागांसाठी १६४ अर्ज दाखल झाले आहेत. **बार्शी** : नगराध्यक्षपदासाठी १० तर नगरसेवकांच्या ४२ जागांसाठी २८४ अर्ज दाखल झाले आहेत. **मैंदर्गी** : नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी ८४ अर्ज दाखल झाले आहेत. **सांगोला** : नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी सर्वाधिक ३१ अर्ज दाखल झाले आहेत. तर नगरसेवकपदाच्या २३ जागांसाठी ३३८ अर्ज दाखल झाले आहेत. **मोहोळ** : नगराध्यक्षपदासाठी १९ तर नगरसेवकपदाच्या २० जागांसाठी १७० अर्ज दाखल झाले आहेत.

# अल-फलाह विद्यापीठाच्या विश्वस्तांवर ईडीचे छापे




**◆ नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**
लाल किल्ला बॉम्बस्फोटाच्या केंद्रस्थानी असलेल्या हरयाणाच्या फरिदाबाद येथील अल-फलाह विद्यापीठाच्या विश्वस्त आणि संचालकांवर ईडीने दिल्ली-एनसीआरमध्ये मंगळवारी छापेमारी केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ईडीच्या पथकांनी पहाटे सव्वापाच वाजल्यापासून अल-फलाह ट्रस्ट आणि विद्यापीठाच्या किमान २५ ठिकाणांवर छापेमारी केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ईडीच्या पथकांनी दिल्लीतील ओखला परिसरातील विद्यापीठाच्या कार्यालयावर केलेल्या छापेमारीदरम्यान पोलिस आणि निमलष्करी दलाने या भागाला वेढा घातला होता.

ही कारवाई आर्थिक अनियमितता, बनावट कंपन्यांचा वापर, निवास संस्था आणि मनी लॉण्ड्रिंगमध्ये सुरू असलेल्या चौकशीचा एक भाग आहे. अल-फलाह ट्रस्ट आणि संबंधित संस्थांची भूमिका तपासाधीन आहे, असे ईडीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. ट्रस्ट आणि वित्त प्रशासनावर देखरेख करणारे प्रमुख कर्मचाऱ्यांवरही छापेमारी करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

*(वृत्तसंस्था)*

# समन्वयाचा अभाव हेच बालमृत्यूचे कारण

**अमरावती** : मेळघाटातील बाल व माता मृत्यू हा विषय १९९५ पासून चर्चेत आहे. या मृत्यूमागच्या कारणांमध्ये मुलींचे कमी वयात लग्न होणे, अनुवांशिक आजार, आरोग्याबद्दलची अनभिज्ञता, आहार व सुविधांची कमतरता, शिक्षण, भौगोलिक रचना यांचा समावेश होतोच. शिवाय, आरोग्य यंत्रणेतील समन्वयाचा प्रचंड अभाव हे यामागील न दिसणारे सर्वांत प्रमुख कारण आहे.

धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांचा भाग म्हणजे मेळघाट! आदिवासीबहुल असलेल्या या भागात एकूण ३२४ गावे आहेत. जवळपास ५ लाख लोकसंख्या आहे. आरोग्य व्यवस्था हाताळण्यासाठी ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे, चुरणी व चिखलदरा अशी दोन ग्रामीण रुग्णालये आणि धारणीत उपजिल्हा रुग्णालय आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या आरोग्य अधिकाऱ्याच्या नियंत्रणात आहे, तर ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार राज्य शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हा शल्यचिकित्सकांच्या देखरेखीखाली आहे.

# 'आयकॉनिक' शहर विकासासाठी धोरण


## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई, १८ नोव्हेंबर**
सिडकोसह राज्यातील विविध प्राधिकरणांकडील लॅण्ड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी संकल्पना आधारित- आयकॉनिक शहर विकासाच्या आदर्श धोरणास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सिडको महामंडळाकडून विविध वापरांसाठी भूखंडांचे लिलाव पद्धतीने भाडेतत्त्वावर वाटप केले जातात. या भूखंडांवर संबंधितांना प्रकल्पांचे बांधकाम करता येते. म त्र, यासाठी भाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील नियमांचे पालन करावे लागते. यातील काही भूखंड हे वेगवेगळ्या बांधकाम व विकास संचलनकर्त्यांच्या (सिडीओज-कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट ऑपरेटर) ताब्यात असल्यामुळे या ठिकाणी एकसंधपणे आणि एकात्मिक वसाहत धोरणाप्रमाणे विकास प्रकल्प पूर्ण करणे शक्य नसते. यासाठी सिडकोच्या संचालक मंडळाने संकल्पना आधारित- आयकॉनिक शहर विकासाचे धोरण तयार केले असून, त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला.



या धोरणामुळे राज्यातील सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील जमिनी, भूखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्यास प्राधान्य मिळणार आहे. संबंधित प्राधिकरणाला बांधकाम व विकास संचलनकर्ता-सीडीओजची निविदा प्रक्रियेद्वारे नेमणूक करता येणार आहे. यामुळे सीडीओजला निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी करता येणार आहे. त्याला विकसनाचे हक्क मिळणार आहे. तसेच प्रकल्पातील सदनिका व व्यवसायिक मालमत्तेची विक्री करता येणार आहे. या धोरणात वसाहतींच्या उभारणीसाठी कालबद्धतेची अट घालण्यात आली असून सीडीओची जबाबदारी, धोरण उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी संरक्षक उपाय, आयकॉनिक विकास संकल्पनांची निवड-संक्षिप्त आराखडा, विकासक निवड प्रक्रिया, प्रकल्पासाठी विकास आराखडा, जमिनीचा ताबा हस्तांतरण, महसूल हिश्श्याचे वाटप, देयक अटी, प्रकल्प समाप्तीसंदर्भातील तरतुदी अशा बाबींचा या धोरणात समावेश आहे.



# बोर्डाने जाहीर केले नवीन परीक्षा नियम

**पुणे, १८ नोव्हेंबर**
दहावी, बारावी बोर्डाची परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि त्याहीपेक्षा पालकांना प्रचंड तणावाला सामोरे जावे लागते. आता महाराष्ट्र बोर्डाने विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्णतेचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी नवीन परीक्षा नियम जाहीर केले आहेत.

बोर्डाने प्रश्नपत्रिकांचे स्वरूप इतके सोपे केले आहे की, थोडे कष्ट करून प्रत्येक विद्यार्थी सहजपणे उत्तीर्ण होऊ शकतो. यावेळी, दहावीमध्ये त्रिभाषिक सूत्र (मराठी, हिंदी आणि इंग्रजी) लागू करण्यात आले आहे. त्यानुसार, तिन्ही विषयांमध्ये एकूण १०५ गुण उत्तीर्ण होण्यासाठी पुरेसे आहेत



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल

**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्यावर नेरुळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विनापरवाना उद्घाटन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मनसेच्या कार्यकर्त्यांनी आरोप केला होता की, हा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून झाकून ठेवला होता. याच पृष्ठभूमीवर रविवारी अमित ठाकरे यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यानंतर नवी मुंबईत त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर, या संपूर्ण प्रकरणावर त्यांच्या मातोश्री शर्मिला ठाकरे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकारांशी बोलताना शर्मिला ठाकरे यांनी मला याचा अभिमान वाटतोय अशी प्रतिक्रिया दिली आहे.

### बंगळुरू विमानतळावर चाकू घेऊन धावला तरुण

**बंगळुरू** : बंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका तरुणाने टॅक्सी चालकावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ही घटना टर्मिनल एकच्या प्रवेशद्वारावर घडली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी सोहेल अहमद टॅक्सी ड्रायव्हरकडे वेगाने येत असल्याचे आणि त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले. जवळून जाणारे लोक घाबरले आणि वेगवेगळ्या दिशेने पळू लागले. घटनास्थळी उपस्थित असलेले सीआयएसएफचे एएसआय सुनील कुमार आणि त्यांच्या पथकाने तातडीने कारवाई केली. त्यांनी हल्लेखोराकडे धाव घेतली, त्याला जमिनीवर ढकलले. चाकू हिसकावून घेतला आणि त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

### भाषण देताना तरुणीला हृदयविकाराचा झटका

**सुरत** : गुजरातमधील सुरत येथील एका महाविद्यालयीन कार्यक्रमात भाषण देत असताना, एक मुलगी अचानक स्टेजवर कोसळली. तिला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होईल. तथापि, प्राथमिक तपासणीत हृदयविकाराचा झटका आल्याचे दिसून आले आहे. सुरतमधील धारुकावाला कॉलेजमध्ये व्यासपीठावर भाषण देत असताना अहमदाबादमधील २४ वर्षीय जिलबेन ठक्कर कोसळली. कपोदरा पोलिसांनी सांगितले की, जिलबेन एका आयटी कंपनीत काम करत होती. कंपनीने कॉलेजमध्ये एक कॅम्प आयोजित केला होता. कॅम्पबद्दल बोलताना जिलबेनचा मृत्यू झाला.

### ओडिया गायक हुमेन सागर यांचे निधन

**भुवनेश्वर** : लोकप्रिय ओडिया गायक हुमेन सागर यांचे १७ नोव्हेंबर रोजी निधन झाले. ते ३४ वर्षांचे होते. अनेक अवयवांचे कार्य बिघडल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. १४ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास हुमेन सागर यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना भुवनेश्वर येथील एम्समध्ये (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) दाखल करण्यात आले. तपासणीत असे दिसून आले की त्यांच्या शरीरातील अनेक अवयव निकामी झाले. त्यांना डायलेटेड कार्डिओमायोपॅथी आणि न्यूमोनियाचा त्रास होता. दोन दिवसांच्या उपचारानंतर, १७ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा गायकाचे निधन झाले.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८४,६७३.०२ (-२७७.९३) |
| निफ्टी | २५,९१०.०५ ( -१०३.४०) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२२,२०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५४,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.४ | १३.९ |
| अमरावती | ३०.० | ११.४ |
| भंडारा | २८.० | १०.० |
| बुलडाणा | २७.८ | १२.० |
| चंद्रपूर | २९.२ | १३.२ |
| गडचिरोली | २८.४ | १२.६ |
| गोंदिया | २७.८ | ९.६ |
| नागपूर | २८.० | १०.९ |
| वर्धा | २८.६ | ११.५ |
| वाशीम | २८.४ | १०.० |
| यवतमाळ | २९.० | ९.६ |

# सहायक धर्मादाय आयुक्तपदासाठी वकिलीचा अनुभव अनिवार्य

## महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमात सुधारणा

**मुंबई, १८ नोव्हेंबर**

सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ संवर्गातील पदासाठी आता तीन वर्षे वकिलीचा अनुभव अनिवार्य असणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाने एका न्यायालयीन प्रकरणात दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), प्रथम स्तर न्यायदंडाधिकारी या पदावर अनुभव नसलेल्या विधि पदवीधारकांना केवळ पदवीच्या आधारे नियुक्ती देण्यास अपात्र ठरविले आहे. त्यानुषंगाने सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या अर्धन्यायिक पदावर नामनिर्देशाने नियुक्तीसाठी तीन वर्षे वकिलीचा अनुभव अनिवार्य करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात बदल करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सहायक धर्मादाय आयुक्तपदाच्या जबाबदाऱ्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे केवळ पुस्तकी ज्ञानातून प्रश्न हाताळण्याची गुणवत्ता व संवेदनशीलता प्राप्त होत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष वकिली करून पक्षकारांशी संपर्क, न्यायदानाच्या प्रक्रियेत सहभाग आवश्यक आहे. यासाठी अनुभव अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शासनास अनुभवी व चांगल्या दर्जाचे अधिकारी मिळतील, जे न्यायदानाच्या प्रक्रियेसाठी लाभदायक ठरतील. याचा लाभ पक्षकार, विश्वस्त व नागरिकांना होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### भिक्षा प्रतिबंध कायद्यातील शब्दरचना बदलण्यास मान्यता

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. एका याचिकेवरील निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व अधिनियम, नियम, नियमावली, उपविधी इत्यादीमधील मानहानीकारक, असे शब्द बदलण्याचा आदेश दिला आहे. त्यावर मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम-१९५९ मधील कलम ९ व २६ मध्ये सुधारणा करण्याची शिफारस विधी व न्याय विभागाने केली आहे. त्यानुसार या अधिनियमातील महारोगाने पीडित, कुष्ठरोगी, कुष्ठालये असे शब्द वगळण्यास व त्यानुषंगाने अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

# मनी लॉँड्रिंगप्रकरणी नवाब मलिक यांच्यावर आरोप निश्चित

**पुढच्या वर्षापासून सुनावणी**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १८ नोव्हेंबर -**



: अंडरवर्ल्डचा डॉन दाऊद इब्राहिमशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारात राष्ट्रवादी काँग्रेस नेते व माजी मंत्री नवाब म लिक यांच्याविरुद्ध सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या मनी लॉन्ड्रीगच्या गुन्ह्याबाबत मंगळवारी विशेष न्यायालयाने आरोपाची निश्चिती केली.

मलिक यांनी आपल्यावरील आरोप अमान्य करीत निर्दोष असल्याचा दावा केला.विशेष न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी १९ डिसेंबरपर्यंत पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुनावणी तहकूब करीत जानेवारी महिन्यापासून खटल्याची दैनदिन सुनावणी जानेवारी महिन्यापासून सुरू करण्याची सूचना दिली. दाऊद इब्राहिमच्या नातेवाईकाशी जमीन खरेदी व्यवहार केल्याचा आरोप २०१९ मध्ये तत्कालीन मंत्री मलिक यांच्याविरुद्ध भाजपाने राळ उठवली होती. त्याबाबत ईडीने गुन्हा करून त्यांना अटक करून जेलमध्ये टाकले होते. त्यानंतर २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली फूट पडल्यानंतर मलिक यांनी त्यांना पाठिंबा दिला होता. त्यानंतर प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना जामीन मंजूर करण्यात आला होता. याप्रकरणी दाखल केलेल्या आरोपपत्रावर आज मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एमपी-एमएलए न्यायलयात सुनावणी झाली.यावेळी मलिकांनी याप्रकरणी निर्दोश असल्याचा दावा केला. त्यानंतर नवाब मालिकांविरोधात कथित मनी लाँड्रिंग प्रकरणात न्यायालयाकडून आरोपनिश्चित करण्यात आले.त्यांच्यावर पीएमएलए कायदा, २००२ मधील कलम ३, कलम ४ आणि कलम १७ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले. विशेष न्या. सत्यनारायण नावंदर यांनी या खटल्याची दैनंदीन सुनावणी जानेवारी महिन्यापासून सुरू करू, असे आश्वासन दिले.

तत्पूर्वी मलिकांनी दाखल केलेला दोषमुक्तीचा अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले असून त्यावर सुनावणी होणं बाकी असल्याचे कारण देत मलिकांच्यावतीने सकाळच्या सत्रात आरोपनिश्चितीची प्रक्रिया स्थगित करण्याची विनंती न्यायालयाकडे केली. त्यावर न्यायालयानं त्यांना दुपारी तीन वाजेपर्यंत उच्च न्यायालयाकडून स्पष्टीकरण आणण्याचा अवधी दिला होता.

### काय आहे मनी लॉँड्रिंगचं प्रकरण

मुनिरा प्लंबर आणि तिची आई यांची मालकी असलेल्या कुर्ल्यातील गोवावाला कंपाऊंडमधील मालमत्ता मलिक यांनी जवळपास दोन दशकांपूर्वी खरेदी केली होती. मात्र दाऊदची मुंबईतील हस्तक आणि बहिण हसीना पारकर, सलीम पटेल आणि १९९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी सरदार खान यांनी ही जमीन मूळ मालकाला धमकावून हस्तगत केली होती. मलिकांना या संपूर्ण प्रकाराची माहिती असूनही त्यांनी जाणीवपूर्वक हा व्यवहार केला. मलिकांनी डी कंपनीसाठी हा व्यवहार करून त्यांना पैसे पुरवल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे.

### कसा झाला घोटाळा

ईडीच्या आरोपानुसार, दाऊदची बहीण हसीना पारकर, सलीम पटेल, मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी सरदार खान आणि नवाब मलिक यांनी कुर्ला येथील गोवावाला कंपाउंडमधील मुनीरा प्लंबर या महिलेची तीन एकर जमीन कट रचून बेकायदेशीरपणे हडपली. या महिलेनं साल १९९९ मध्ये सलीम पटेल याच्या नावानं पॉवर ऑफ एटर्नी काढली होती. पटेलनं त्याचा दुरुपयोग करत हसीना पारकरच्या आदेशानुसार गोवावाला कंपाऊंडमधील जमीन नवाब मलिक यांच्या सॉलिडस इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला विकली. मलिक यांनी ही जागा भाडेतत्वावर देऊन त्यातून आलेल्या पैशांमधून वांद्रे, कुर्ला इथं सदनिका आणि उस्मानाबादमध्ये काही शेतजमीन खरेदी केली होती. सुमारे ३०० कोटींच्या या आर्थिक गैरव्यवहारात ही सर्व मालमत्ता ईडीनं जप्त केली आहे. या आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी फेब्रुवारी २०२२ मध्ये ईडीने मलिक यांना अटक केली होती.

# आम्ही कचऱ्याकडेही लक्ष द्यावे का?

### सर्वोच्च न्यायालयाचा संताप

**नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

वकिलांनी घातलेल्या रुमालांबाबत सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी एक याचिका दाखल करण्यात आली. त्यात वापरल्यानंतर या रुमालांची विल्हेवाट लावण्यासाठी एकसमान व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचना मागितल्या होत्या. महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने याचिकेवर विचार करण्यास नकार दिला. रुमाल कसे वापरले जातात, कचऱ्यात फेकले जातात का, यावरही आम्ही लक्ष ठेवायचे का, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.



याचिकाकर्त्या साक्षी विजय यांनी या रुमालांच्या संकलन आणि विल्हेवाटीसाठी एकसमान आणि पर्यावरणपूरक व्यवस्था निर्माण करण्याची मागणी करणारी जनहित याचिका दाखल केली होती. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. विनोद चंद्रन यांचा समावेश असलेले न्यायासन याचिकेवर सुनावणी करीत होते. याचिका पाहिल्यानंतर न्यायालयाने म्हटले की, मग आमचे काम कुठे संपेल? रुमाल कसे वापरले जात आहेत यावर लक्ष ठेवणे? किंवा गावात कचरा कसा विल्हेवाट लावला जात आहे?... आपण रिट कुठे जारी करावी? याचिकाकर्ता जिंदाल ग्लोबल लॉ स्कूलमध्ये असोसिएट प्रोफेसर आहेत.

**याचिकेची मागणी काय होती?**

याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, त्यांना न्यायालयाबाहेर कचऱ्याच्या डबक्याजवळ, फुटपाथजवळ कृत्रिम पट्ट्या आढळल्या आहेत. त्यात म्हटले आहे की ही परिस्थिती पर्यावरणीय चिंता आणि व्यवसायाच्या प्रतिष्ठेचे प्रतिबिंबित करते. याचिकेत पांढऱ्या पट्ट्यांची आदरपूर्वक विल्हेवाट लावण्यासाठी कोणतेही धोरण नाही यावर भर देण्यात आला आहे. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून सध्याच्या परिस्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

**...तर २०० वर्षांहून अधिक काळ लागेल**

याचिकेत म्हटले आहे की पूर्वी वकील कापडाच्या पट्ट्या वापरत असत, ज्या धुवून पुन्हा वापरता येत होत्या. तथापि, सध्याचे पट्टे कृत्रिम आणि जैवविघटनशील नाहीत. त्यांची किंमत १० रुपये आहे आणि अनेक वकील एका वापरानंतर ते फेकून देतात. (वृत्तसंस्था)

# सुकमात दहशतीचे दुसरे नाव होते हिडमा

**सुकमा, १८ नोव्हेंबर**

आंध्रप्रदेशातील चकमकीत ठार झालेला माडवी हिडमा हा एक कुख्यात माओवादी होता. छत्तीसगडमधील सुकमात दहशतीचे दुसरे नाव हिडमा होते, असे स्थानिकांनी सांगितले.

छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या जंगलात लपून राहत त्याने सुरक्षा दलांवर असंख्य हल्ले केले. यामध्ये १२ पेक्षा अधिक पोलिसांचा मृत्यू झाला. हिडमा माओवाद्यांच्या एका बटालियनचे नेतृत्व करत होता. सुरक्षा दलांनी त्याच्यावर ४५ लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. २५ मे २०१३ रोजी झालेल्या झिरम व्हॅली घटनेसाठीही हिडमा जबाबदार होता. या घटनेत, माओवाद्यांनी बस्तरच्या झिरम खोऱ्यात छत्तीसगड काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वासह ३३ जणांची हत्या केली. तेव्हापासून छत्तीसगड पोलिसांसह अनेक यंत्रणा त्याचा शोध घेत आहेत. हिडमावर ६० जवानांच्या हत्येचाही आरोप आहे.

हिडमाचा शोध घेण्यासाठी १२५ हून अधिक गावांचे तांत्रिक मॅपिंग केले जात होते. सुरक्षा दल छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्रप्रदेशच्या सीमेवर असलेल्या अंदाजे १२५ गावांचे थर्मल इमेजिंग करीत होते. (वृत्तसंस्था)

# लघु-मध्यम उद्योग क्षेत्र प्रगतीचे आधारस्तंभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन ● महाराष्ट्र शासन-युनिडात हेतुपत्र वाटप

**मुंबई, १८ नोव्हेंबर**



उद्योजक स्वतःच्या कष्टातून उद्योग उभारतात, तंत्रज्ञानाची जोड, विकासाला चालना, आधुनिक साधने यांची उपलब्धता करून दिल्यास हे उद्योजक चमत्कार घडवू शकतात. महाष्ट्रात देशातील सर्वाधिक लघु आणि मध्यम उद्योग असून, हे क्षेत्र राज्याच्या प्रगतीचे आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि युनायटेड नेशन्स इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (युनिडो) यांच्यात डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि इनोव्हेशन क्षेत्रातील सहकार्यासाठी हेतुपत्र (लेटर ऑफ इंटेंट) वाटप करण्यात आले. या करारामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वीकाराला गती मिळणार असून, विशेषतः एमएसएमई उद्योगांना जागतिक स्पर्धात्मकतेकडे नेण्यास मोठी मदत होणार आहे. युनिडो ही जागतिक स्तरावर टिकाऊ आणि समावेशक औद्योगिक विकासाला पाठबळ देणारी प्रमुख संस्था आहे. तर इंडिया एसएमई फोरम (आयएसएफ) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे प्रशिक्षण, आउटरीच आणि उद्योग स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी कार्यरत आहे. दोन्ही संस्थांच्या अनुभवाचा लाभ राज्याला तंत्रज्ञान-आधारित औद्योगिक वाढीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. राज्यातील औद्योगिक क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, एव्ही, व्हीआर, ऑटोमेशन आणि इंडस्ट्री ४.० सारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे झपाट्याने बदलत आहे. (तभा वृत्तसेवा)

### भारतीय दूतावासाचे मदिना येथे मदत केंद्र

**दुबई** : सौदी अरेबियातील हज यात्रेकरूंच्या बस अपघातात मृत्युमुखी पडलेल्या भारतीयांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी जेद्दाह येथील भारतीय वाणिज्य दूतावासाने मदिना येथे एक केंद्र सुरू केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. महावाणिज्य दूत फहाद अहमद खान सूरी यांनी अपघातातील एकमेव वाचलेले अब्दुल शोएब मोहम्मद यांची भेट घेतली. ते सध्या मदिना येथील रुग्णालयात उपचार घेत आहेत.

# राष्ट्रवादीच्या मुंबई प्रतिनिधीपदी वजाळे; उपाध्यक्षपदी माने-देशमुख





**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १८ नोव्हेंबर-**

श्रीपूर (ता.माळशिरस) येथील राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस समिर वजाळे यांची मुंबई प्रतिनिधीपदीही नियुक्ती करण्यात आली आहे. तर बोरगांव (ता. माळशिरस) येथील उदयसिंह माने-देशमुख यांची वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे व जिल्हाध्यक्ष यांच्या आदेशाने या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सद्य स्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी चालु झाली असून सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे कॉंग्रेसचे (अप) बडे नेते पक्ष सोडून गेले आहेत. त्या पार्श्वभूमीवर पक्षाने सोलापूर जिल्ह्यावर लक्ष केंद्रीत केलेले दिसून येत आहे. निवडीनंतर समिर वजाळे व उदयसिंह माने-देशमुख यांनी पक्ष श्रेष्ठींनी जी जबाबदारी सोपवली आहे ती आम्ही प्रामाणिक पणे पार पाडून पक्षाची ताकद वाढविणे तसेच पक्षाची भूमिका प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची पराकाष्ठा करू असे सांगितले. दोघांच्या निवडीचे श्रीपूर, बोरगाव परिसरातून स्वागत होत आहे.

# सहायक व्यवस्थापकानेच केली कॅनरा बँकेत लूट

### पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**गर्रा/बघेडा, १८ नोव्हेंबर**

तुमसर तालुक्यातील गोबरवाही पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या सीतासावंगी येथील कॅनरा बँकेच्या शाखेत अज्ञातांनी कुलूप तोडून प्रवेश करीत दीड कोटींहून अधिक रोकड व अन्य साहित्य लंपास केले होते. या घटनेचा तपास जलद गतीने करीत पोलिसांनी बँकेच्या सहायक व्यवस्थापक मयूर नेपाळे याला अटक केली.

कॅनरा बँकेच्या शाखेतून १७ ते १८ नोव्हेंबरच्या रात्री सामानासह १ कोटी ५८ लाख ४७ हजार ९४४ रुपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला होता. बँकेच्या दाराचे कुलूप तोडून २७ हजार रुपये किमतीचे ९ सीसीटीव्ही कॅमेरे, स्ट्राँग रूममधून १ कोटी ५८ लक्ष १२ हजार ९४४ रुपये रोख चोरून नेली. सकाळी बँकेचे कामकाज सुरू करण्यासाठी कर्मचारी गेले असता, चोरीची घटना उघड झाली. शाखा प्रबंधक सातपुते यांच्या तक्रारीवरून गोबरवाही पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक नुरूल हसन आपल्या सहकारी अधिकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी वस्तुस्थिती पाहून चोरीच्या घटनेत बँकेतील कर्मचारी सहभागी असल्याचा संशय व्यक्त करून त्या दिशेने तपास सुरू केला. कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन माहिती घेतली असता, १७ रोजी बँकेचे सहायक प्रबंधक मयूर नेपाळे यांची वागणूक संशयास्पद असल्याचे सांगण्यात आले. याचवेळी नेपाळे बँकेच्या प्रशिक्षणासाठी नागपूरला गेल्याचे सांगितले गेले. पोलिसांचा संशय बळावल्याने सहायक पोलिस निरीक्षक विवेक सोनवणे यांच्या नेतृत्वात एक पथक नागपूरला रवाना झाले. नेपाळे यांना ते राहत असलेल्या ठिकाणी पकडण्यात आले.

सुरुवातीला विचारपूस केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी हिसका दाखविताच नेपाळे यांनी चोरीची कबुली दिली. नेपाळेकडून पोलिसांनी रोख रक्कम, दुचाकी, सीसीटीव्ही कॅमेरे आणि अन्य साहित्य जप्त करीत त्यांना अटक केली. या कारवाईत पोलिस अधीक्षक हसन, अतिरिक्त पोलिस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापुरे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक चिंचोलकर, गोबरवाहीचे पोलिस निरीक्षक शरद शेवाळे यांनी सहभागी होत गुन्हा उघडकीस आणला. (तभा वृत्तसेवा)

# बिहारमध्ये सरकार स्थापण्याच्या हालचालींना वेग

**नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआचे सरकार स्थापण्याच्या हालचालींना वेग आला आहे. नितीशकुमार २० नोव्हेंबरला दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

रालोआ विधिमंडळ पक्षाची बैठक १९ नोव्हेंबरला पाटण्यात होणार असून, त्यात नितीशकुमार यांची नेतेपदी निवड केली जाईल. या बैठकीला जदयू, भाजपा, लोजपा रामविलास, हम आणि रालोसपा या पक्षाचे नवनिर्वाचित आमदार उपस्थित राहील. त्याआधी जदयू आणि भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठकही होणार आहे. जदयू विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नेतेपदी नितीशकुमार यांची निवड केली जाईल. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत भाजपा विधिमंडळ पक्षनेत्याची निवड केली जाईल.



हम पक्षाचे प्रमुख आणि केंद्रीय मंत्री जितन राम मांझी यांनी मंगळवारी बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची भेट घेऊन चर्चा केली

चिराग पासवान, जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांनी नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाला आधीच पाठिंबा जाहीर केला आहे. दरम्यान, जदयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री जदयूचे ललनसिंह यांनी मंगळवारी दिल्लीत गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची भेट घेत त्यांच्यासाबेत सरकार स्थापनेबाबत चर्चा केली.

भाजपाचे निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान पाटण्यात पोहोचले असून, ते चिराग पासवान, जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाह या मित्रपक्षांच्या नेत्यांना भेटणार आहे.

दरम्यान, २० नोव्हेंबरला पाटण्यातील गांधी मैदानावर होणाऱ्या नितीशकुमार यांच्या शपथविधी समारंभाची जोरदार तयारी सुरू आहे. नितीशकुमार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्याचाही शपथविधी होणार आहे. नितीशकुमार यांच्यासोबत भाजपाचे दोन उपमुख्यमंत्रीही शपथ घेतील, असे समजते. भाजपा उपमुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी आणि विजयकुमार सिन्हा यांना कायम ठेवते की, नव्या चेहऱ्यांना संधी देते, याकडे भाजपा गोटात उत्सुकता आहे. विधानसभेचे अध्यक्षपद भाजप स्वत:कडे ठेवणार असल्याचे समजते. (तभा वृत्तसेवा)

# प्रशांतकिशोर यांच्या जनसुराजची दाणादाण

## २३८ पैकी २३६ उमेदवारांची जमानत जप्त

**श्यामकांत जहागीरदार**

**नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

अन्य राजकीय पक्षांना आणि नेत्यांना निवडणूक जिंकून देण्याचा दावा करणारे निवडणूक व्यूहरचनाकार प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाची बिहारमध्ये दाणादाण उडाली, त्यांना एकही जागा जिंकता आली नाही.

नितीशकुमार यांनी विधानसभा निवडणुकी २५ पेक्षा जास्त जागा जिंकल्या तर, राजकारण संन्यास घेण्याची घोषणा प्रशांत किशोर यांनी केली होती. जदयूने या निवडणुकीत ८५ जागा जिंकल्या आहेत, त्यामुळे आता प्रशांत किशोर राजकारण संन्यास घेतात काय याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते.



पत्रपरिषदेत बोलताना जनसुराज पार्टीचे सर्वेसर्वा प्रशांत किशोर

पाटण्यात आयोजित एका पत्रपरिषदेत प्रशांत कशोर यांनी जनसुराज पक्षाच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारली आणि राजकारण संन्यासाचा स्पष्टपणे इन्कार केला. पक्षाच्या पराभवाचे प्रायश्चित्य म्हणून एकदिवसाचे मौन उपोषण करण्याची घोषणाही त्यांनी केली.

मी बिहार सोडणार नाही, बिहारमध्येच राहणार आणि बिहारच्या जनतेसाठी आवाज उठवणार, बिहार सोडणार असे मी कधीच म्हटले नव्हते, असे ते म्हणाले. माझ्याजवळ कोणतीही पद नाही, त्यामुळे मी राजीनामा कशाचा देऊ, अशी विचारणाही त्यांनी केली. राजकारणसंन्यास म्हणजे मी राजकारण करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रशांतकिशोर यांनी आपल्या जनसुराज पक्षाबाबत मोठमोठे दावे केले होते, माझ्या पक्ष १५० जागा जिंकेल, पक्षाला १२५ ते १३० जागा मिळाल्या तरी तो मी माझ्या पक्षाचा पराभव समजेल, अशी दर्पोक्तीही त्यांनी केली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पाकिस्तानात टीटीपीचे १५ दहशतवादी ठार

◆ **इस्लामाबाद, १८ नोव्हेंबर**

पाकिस्तानी लष्कर गोपनीय माहितीच्या आधारे खैबर पख्तुनख्वाच्या डेरा इस्माईल खान आणि उत्तर वझिरीस्तानमध्ये केलेल्या कारवाईत टीटीपीच्या १५ दहशतवाद्यांचा खात्मा केला. मारलेल्या गेलेल्यांमध्ये आलम मेहसूद नावाचा एक प्रमुख दहशतवादीही ठार झाला.

पाकिस्तानी लष्कराने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, खैबर पख्तुनख्वा भागात टीटीपीचे दहशतवादी हल्ला करण्याची योजना आखत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर अतिरिक्त सुरक्षा दल पाठवून डेरा इस्माईल खान आणि उत्तर वझिरीस्तानमध्ये व्यापक शोधमोहीम राबवण्यात आली.

यावेळी मोहिमेत सहभागी असलेल्या सुरक्षा दलावर गोळीबार झाला. त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. डेरा इस्माईल खानच्या कुलाची भागात दहा, तर वजिरिस्तानमध्ये पाच दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यश आले. मारले गेलेले सर्व जण विदेशी पुरस्कृत नेटवर्कशी संबंधित होते आणि त्यांचा यापूर्वी झालेल्या अनेक हल्ल्यात समावेश होता, असा दावा पाकिस्तानने केला. (वृत्तसंस्था)

# बांगलादेश न्यायाधीकरणाचा निर्णय न्यायसंगत नाही

### शेख हसीना यांच्या शिक्षेवर संयुक्त राष्ट्र-मानवाधिकार संघटनेचा निषेध

**निष्पक्ष खटला चालविण्याचा सल्ला**

◆ **न्यू यॉर्क, १८ नोव्हेंबर**

बांगलादेशातील हिंसक आंदोलनात नागरिकांची हत्या केल्याच्या आरोपाखाली माजी पंतप्रधान शेख हसीना यांना तेथील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरणाने सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षा न्यायसंगत नाही तसेच ती अन्यायकारक आहे. प्रकरणाचा निष्पक्ष तपास न करता आणि आरोपींची बाजू ऐकून न घेता सुनावलेली शिक्षा आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. आम्ही या निकालाचा निषेध करीत असल्याचे संयुक्त राष्ट्र संघ आणि आंतराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने म्हटले आहे.

मानवाधिकार संघटना ॲम्नेस्टी इंटरनॅशनलनेही हसीना यांना मृत्युदंड देण्याच्या निर्णयाचा निषेध केला आणि म्हटले की, हसीना आणि त्यांच्या कार्यकाळात गृहमंत्री असलेले असदुज्जमान खान यांना ठोठावलेली शिक्षा निष्पक्ष आणि न्यायाच्या आधारावर नाही. त्यांनी या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून खटला पुन्हा चालवण्याचा सल्ला न्यायाधीकरणाला दिला आहे.

संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस ॲग्नेस कॅलामार्ड यांनी बुधवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, शेख हसीना आणि असदुज्जमान खान यांना सुनावलेली मृत्युदंडाची शिक्षा आंतरराष्ट्रीय मानकांच्या आधारावर नाही. निष्पक्ष चौकशी न करता घाईत आणि दबावाखाली दिलेला हा निर्णय आहे. शिक्षेमुळे पीडितांना न्याय मिळणार नाही. याशिवाय आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या प्रवक्त्या प्रवक्त्या रवीना शामदासानी यांनी निवेदनात म्हटले की, जुलै आणि ऑगस्ट २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील झालेल्या हिंसक निदर्शनांध्ये मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी वैयक्तिकरीत्या जबाबदार असलेल्यांची निष्पक्ष चौकशी व्हायला हवी. एखाद्या अधिकाऱ्याच्या जबाबाच्या आधारे मृत्युदंडाचा आदेश देणे मानवी अधिकारांचे उल्लंघन आहे. (वृत्तसंस्था)




**बचाव पक्षाच्या वकिलाचे मुद्दे डावलले**

मानवाधिकार संघटनेने शेख हसीनाच्या खटल्यातील अनुपस्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, न्यायाधीकरणाच्या निर्णयावर शंका उपस्थित होत आहे. बचाव पक्षाच्या वकिलाला पुराव्याच्या उलटतपासणीची परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे संशय बळावला आहे. आम्हाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्याबद्दलही खेद आहे. त्याचा आम्ही सर्व परिस्थितीत विरोध करतो.

**भारत हसीनांचे प्रत्यार्पण करणार नाही**

न्यायाधीकरणाच्या निर्णयानंतर बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने शेख हसीनांच्या प्रत्यार्पणाची केलेली मागणी भारताने फेटाळून लावली. २०१३ चा प्रत्यार्पण करार आणि २०१६ मध्ये त्यात केलेल्या सुधारणेनुसार दोन्ही देशांना गुन्हा मान्य असला तरच, गुन्हेगाराचे प्रत्यार्पण करण्याची तरतूद आहे. मात्र, या प्रकरणात न्यायाधिकरणाने दोषी ठरवलेल्यांना भारताने अद्याप गुन्हेगार असल्याचे मान्य केलेले नाही, त्यामुळे प्रत्यार्पणाची मागणी फेटाळत आहोत, असे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.



नवी दिल्ली येथे मंगळवारी झालेल्या भारत आंतरराष्ट्रीय अंतराळ परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी अंतराळवीर आणि भारतीय वायुदलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला



दिल्लीतील न्यायालये आणि शाळांना मंगळवारी बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी मिळाली. त्यानंतर पतियाळा न्यायालयात सुरक्षा वाढवण्यात आली. यावेळी शीघ्र कृती दलाचे तैनात केलेले जवान

# रुग्णवाहिकेला आग; डॉक्टरसह चार ठार

◆ **अहमदाबाद, १८ नोव्हेंबर**

गुजरातमधील अरावली जिल्ह्यातील मोडासा भागात मंगळवारी पहाटे एका भरधाव रुग्णवाहिकेला अचानक आग लागली, या अपघातात एक डॉक्टर, परिचारिका, नवजात बाळ आणि त्याच्या वडिलाचा होरपळून मृत्यू झाला. रुग्णवाहिका चालक आणि एका नातेवाईकाला वाचवण्यात आले.

मोडासा नगरपालिकेचे अग्निशमन दलाचे अधिकारी हेमराज वाघेला यांनी सांगितले की, महिसागर जिल्ह्यातील लुणावाडा येथील रहिवासी जिग्नेश मोची यांच्या नवजात बाळाची प्रकृती बिघडल्याने त्याला मोडासा येथील एका रुग्णालयातून अहमदाबादमधील शासकीय रुग्णालयात नेत असताना टायर फुटला आणि रस्त्याच्या कडेला उलटलेल्या भरधाव रुग्णवाहिकेला आग लागली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दल अपघातस्थळी पोहोचले. (वृत्तसंस्था)

# 'डीजीसीए' तयार करणार निवृत्त अधिकाऱ्यांचा समूह

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

विमान वाहतूक नियामक डीजीसीए निवृत्त तांत्रिक अधिकाऱ्यांचा समूह तयार करण्याची योजना आखत आहे. या योजनेअंतर्गत निवृत्त अधिकारी विविध प्रमाणन प्रक्रियांमध्ये संस्थांना मदत करतील. यात एअर ऑपरेटर प्रमाणपत्रे जारी करणे आणि उड्डाण प्रशिक्षण शाळांचा परवाना देण्याचा समावेश आहे.




नुकत्याच जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) प्रमाणन प्रक्रियेवर सल्ला देण्यासाठी निवृत्त अधिकाऱ्यांचा समूह तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वेही तयार केली आहेत.

नियामक पाच-टप्प्यांच्या प्रमाणन प्रक्रिया अनुसरण करतो. अनेकदा असे आढळून आले आहे की अर्जदार आणि संस्थांना संपूर्ण प्रक्रिया समजून घेण्यात अडचणी येतात, ज्यामुळे विलंब होतो आणि अनुपालन आव्हाने निर्माण होतात. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, डीजीसीएने व्यापक संस्थात्मक ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव असलेल्या निवृत्त अधिकाऱ्यांचा समूह तयार करण्याचा प्रस्ताव दिला आहे. (वृत्तसंस्था)

**निवृत्त कर्मचाऱ्यांची जबाबदारी**

या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी, प्रमाणन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि सर्व आवश्यक पायऱ्या वेळेवर आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केले जाऊ शकते. हे निवृत्त तांत्रिक अधिकारी/(एअर ऑपरेटर सर्टिफिकेट/एअर ऑपरेटर परमिट), फ्लाईंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशनला लायसन्स देणे आणि इतर नियामक कार्यांमध्ये सल्लागार सहाय्य म्हणून करतील. हे सल्लागार पारदर्शकता, तांत्रिक अचूकता आणि (आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना) मानकांनुसार काम करतील आणि निर्णयांवर प्रभाव टाकणार नाहीत. वाढत्या हवाई वाहतुकीच्या मागणीला पूर्ण करण्यासाठी विमान कंपन्या त्यांच्या ताफ्यांचा विस्तार करीत आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या विमान वाहतूक बाजारपेठांपैकी एक आहे.

## केंद्र, सीबीआय, ईडी, अनिल अंबानींना नोटीस

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम,) त्यांच्या समूह कंपन्या, प्रवर्तकांशी संबंधित कथित मोठ्या बँकिंग आणि कॉर्पोरेट फसवणुकीची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्र, सीबीआय, ईडी, अनिल अंबानी आणि इतरांना नोटीस बजावली.

सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने जनहित याचिकाकर्ता आणि माजी केंद्रीय सचिव ईएएस शर्मा यांच्यावतीने उपस्थित असलेले वकील प्रशांत भूषण यांच्या युक्तिवादाची दखल घेतली आणि तीन आठवड्यांत उत्तर मागितले. न्यायासनाने आता या जनहित याचिकेवर तीन आठवड्यांनी पुढील सुनावणी ठेवली आहे. मोठ्या बँकिंग फसवणुकीत तपास संस्था बँका आणि त्यांच्या अधिकाऱ्यांच्या कथित सहभागाची चौकशी करीत नाहीत, असा आरोप भूषण यांनी केला. (वृत्तसंस्था)

# जागतिक स्थैर्यासाठी भारत-रशिया संबंध महत्त्वाचे

### ● जयशंकर यांचे प्रतिपादन ● नवीन करार, प्रकल्प अंतिम टप्प्यात

◆ **मॉस्को, १८ नोव्हेंबर**

भारत-रशियाचे संबंध केवळ दोन्ही देशांच्या विकासासाठीच नव्हे, तर जागतिक स्थिरतेसाठी महत्त्वाचे आहे. दोन्ही देशांमधील अनेक द्विपक्षीय करार, प्रकल्प आणि नवीन उपक्रम अंतिम टप्प्यात आहेत. यामुळे धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होणार असल्याचे भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले.



रशियाच्या दोन दिवसीय दौऱ्यावर असलेल्या जयशंकर यांनी मंगळवारी रशियाचे मंत्री सर्गेई लाव्हरोव्ह यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी जागतिक विषयासह द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासंदर्भात चर्चा केली. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना जयशंकर म्हणाले, भारत आणि रशियाचा विकास केवळ दोन्ही देशांच्या परस्पर हिताचा नव्हे, तर जगाच्या हिताचा आहे.

दोन्ही देशांत लवकरच ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, अवकाश, विज्ञान आणि संरक्षण क्षेत्रात द्विपक्षीय करार होणार आहे. याशिवाय काही प्रकल्प भागीदारीने सुरू करण्यावर आमचे एकमत झाले. युक्रेन संघर्ष, पश्चिम आशियातील परिस्थिती आणि अफगाणिस्तान यासारख्या जटिल जागतिक मुद्द्यांवर आम्ही चर्चा केली. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन भारताच्या दौऱ्यावर येणार असून ते २३ व्या वार्षिक भारत-रशिया शिखर परिषदेत सहभागी होणार आहे. त्यावेळी दोन्ही देशात महत्त्वाचे करार होणार असून, त्यासंदर्भात आम्ही चर्चा केली, असे जयशंकर यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# अमेरिका सौदी अरबला देणार एफ-३५ विमाने

### ट्रम्प यांची माहिती, लवकरच होणार करार



◆ **वॉशिंग्टन, १८ नोव्हेंबर**


जगातील सर्वांत प्रगत मानली जाणारी एफ-३५ लढाऊ विमाने सौदी अरबला देणार असल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी व्हाईट हाऊसमध्ये प्रसार माध्यमांना दिली. यासंदर्भात दोन्ही देशांत लवकरच करार होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सौदीचे क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान मंगळवारी अमेरिकेच्या दौऱ्यावर आले आणि त्यांची बुधवारी ट्रम्प यांच्यासोबत बैठक होणार आहे. त्यावेळी एफ-३५ लढाऊ विमानासंदर्भात कराराची घोषणा होणार आहे. ट्रम्प म्हणाले, सौदी अरेबिया अमेरिकेचा सर्वांत महत्त्वाचा भागीदार आहे. दोन्ही देशांची अनेक क्षेत्रांत भागीदारी आहे आणि द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्यासाठी संरक्षण कराराचा निर्णय घेण्यात आला. सलमान यांच्यासोबत व्यापार आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्द्यांवर चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सध्या मध्यपूर्वेत केवळ इस्रायलकडेच एफ-३५ विमाने आहेत. एफ-३५ हे अमेरिकेचे पाचव्या पिढीतील लढाऊ विमान आहे आणि ते लॉकहीड मार्टिन कंपनीने २००६ मध्ये विकसित केले. पेंटॅगॉनच्या इतिहासातील सर्वांत महागडे विमान तीन प्रकारांमध्ये येते. याची किंमत ७०० कोटी ते ९४४ कोटीदरम्यान आहे. याशिवाय एफ-३५ चालवण्यासाठी प्रति तास अतिरिक्त ३१.२० लाख खर्च येतो. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'धुरंधर'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित





**मुंबई** : रणवीरसिंहचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'धुरंधर'चा ट्रेलर मंगळवारी प्रदर्शित झाला. ४ मिनिट ७ सेकंदांचा हा धमाकेदार ट्रेलर ॲक्शन सीन्स, संवाद आणि रक्तपाताने भरलेला आहे. ट्रेलरमध्ये अर्जुन रामपालचा इंटेन्स लूक स्पष्ट दिसतो. ट्रेलरची सुरुवात अर्जुन रामपालच्या संवादाने होते, मेजर इकबाल जिस पर मेहरबान हो जाएं, उनका मुस्तकबिल बदल जाता है.. अर्जुन रामपालचा कधीही न पाहिलेला लूक चित्रपटात पाहायला मिळणार आहे. ट्रेलरमधील पुढची ओळख रणवीरसिंहची आहे, जो चित्रपटात एका गुप्तहेराची भूमिका साकारतो आहे. या कलाकारांव्यतिरिक्त आर. माधवन, संजय दत्त, अक्षय खन्ना अशीही दमदार मंडळी यात आहेत. 'धुरंधर' हा चित्रपट आदित्य धर यांनी दिग्दर्शित केला आहे, ज्यांनी यापूर्वी 'उरी: द सर्जिकल स्ट्राईक' हा चित्रपट दिग्दर्शित केला होता. जिओ स्टुडिओजच्या बॅनरखाली निर्मित हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

### वयाच्या ७१ व्या वर्षी रेखाचे पुनरागमन



**मुंबई** : हिंदी सिनेसृष्टीतील अभिनेत्री रेखा पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर दिसणार, अशा चर्चा रंगत आहेत. यासंदर्भातील माहिती तिचा जवळचा मित्र डिझायनर मनीष मल्होत्राने दिली आहे. त्याने सांगितले की, वयाच्या ७१ व्या वर्षीही रेखाला काम करण्याची इच्छा आहे. 'गुस्ताख इश्क' या चित्रपटात रेखा यांना घेण्याचा विचार होता. मात्र, यापुढील चित्रपटात त्या नक्की असणार आहेत. त्यांच्या अभिनय क्षमतेला साजीशी भूमिका मिळाल्याशिवाय त्यांनी काम करणेही योग्य नाही. चांगली कथा मिळताच त्यांना नवीन प्रोजेक्टमध्ये नक्कीच स्थान मिळेल. मी स्वत:देखील त्यांच्या पुनरागमनासाठी उत्सुक आहे, असे मनीष मल्होत्रा म्हणाला.

### पुन्हा येणार दबंग चुलबुल पांडे



**मुंबई** : सलमान खानच्या 'दबंग' सीरिजमधील सर्व चित्रपट सुपरहिट ठरले. आतापर्यंत याचे तीन भाग आले आहेत. आता चौथा भाग येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. अभिनेता-निर्माता अरबाज खानने 'दबंग-४'ची अधिकृतपणे पुष्टी केली आहे. याचा अर्थ पुन्हा एकदा चुलबुल पांडे दबंग अवतारात प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी अवतरणार आहे. याविषयी अरबाज म्हणाला, चित्रपट आम्ही करणार हे निश्चित, पण चित्रीकरण कधी सुरू होणार, हे अद्याप सांगता येणार नाही. सध्या याच्या कथानकावर काम सुरू आहे.

# 'गेमझक्राफ्ट'वर ईडीची छापेमारी

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

अंमलबजावणी संचालनालय अर्थात् विन्झो आणि गेमझक्राफ्टच्या कार्यालयांवर छापे टाकले आहेत. फसवणूक, हेराफेरी आणि संभाव्य मनी लॉण्ड्रिंगच्या आरोपांप्रकरणी ईडीच्या बंगळुरू येथील प्रादेशिक कार्यालयाने मंगळवारी दोन ऑनलाईन गेमिंग कंपन्यांविरुद्ध छापे टाकले. अधिकाऱ्यांनी सांगितले की एकूण ११ ठिकाणी छापे टाकले जात आहेत त्यात बंगळुरूमध्ये पाच, दिल्लीमध्ये चार आणि गुरुग्राममधील दोन ठिकाणांचा समावेश आहे.

मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) टाकण्यात आलेल्या या छाप्यांमध्ये कंपन्यांच्या कॉर्पोरेट कार्यालये तसेच त्यांच्या प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा समावेश आहे, ज्यात त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य वित्तीय अधिकारी यांचा समावेश आहे.

**गेमिंग अल्गोरिदममध्ये हेराफेरीचे आरोप**

ही कारवाई अनेक पीडितांनी दाखल केलेल्या एफआयआरनंतर झाली आहे ज्यात आरोप करण्यात आला आहे की, या प्लॅटफॉर्मने त्यांच्या गेमिंग अल्गोरिदममध्ये फेरफार करून खेळाडूंना अन्याय्यपणे नुकसान पोहोचवले आहे, ज्यामुळे कंपन्यांना बेकायदेशीरपणे नफा मिळू शकला आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, चालू असलेल्या शोधमोहिमेदरम्यान, असे आढळून आले की प्रवर्तकांकडे क्रिप्टो वॉलेट आहेत, जे क्रिप्टोकरन्सीद्वारे मनी लॉण्ड्रिंग दर्शवितात. हे डिजिटल मालमत्तेद्वारे मनी लाँड्रिंगचे संभाव्य मार्ग दर्शवते. मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याचे (पीएमएलए) संभाव्य उल्लघन मूल्यांकन करण्यासाठी एजन्सी तपासणी करत आहे. (वृत्तसंस्था)

# आता येणार पर्यावरण पूरक प्रवासी विमान

**भाडेही स्वस्त राहणार**

◆ **नवी दिल्ली, १८ नोव्हेंबर**

सध्या विमान प्रवास सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. मात्र, येत्या पाच वर्षांत हे चित्र बदलणार आहे. पुढील पाच वर्षांत आकाशात उडण्यासाठी सज्ज असलेले एक पूर्णपणे नवीन प्रवासी विमान विकसित केले जात आहे. त्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची 'ब्लेंडेड विंग' डिझाईन, म्हणजे विमानाचे पंख आणि मुख्य भाग एकाच, गुळगुळीत आकारात जोडलेले आहेत.

या नवीन तंत्रज्ञानामुळे इंधनाचा वापर निम्म्याने कमी होईल आणि विमानतळांभोवतीचा आवाज लक्षणीयरीत्या कमी होईल. हे विमान केवळ स्वस्तात उड्डाण करणार नाही तर, पर्यावरणाचे नुकसान देखील लक्षणीयरीत्या कमी करेल.

या डिझाईनची कल्पना प्रत्यक्षात १०० वर्षांहून अधिक जुनी आहे. रशियन पायलट निकोलाई व्होएवोडस्की यांनी प्रथम १९२० च्या दशकात मिश्रित विंग संकल्पना मांडली. आतापर्यंत, हे तंत्रज्ञान बहुतेक लष्करी विमानांमध्ये वापरले जात होते, परंतु आता पहिल्यांदाच ते सामान्य प्रवासी विमानात सादर केले जात आहे.



सामान्य विमानांमध्ये लांब, नळीच्या आकाराचे शरीर असते ज्याचे पंख बाजूंना जोडलेले असतात. तथापि, या नवीन डिझाइनमध्ये पंख आणि शरीर एकाच, सपाट, रुंद संरचनेत एकत्र केले जाते. यामुळे विमानाचे वजन कमी होते, हवेचा प्रतिकार (ड्रॅग) कमी होतो आणि उड्डाण करणे सोपे आणि अधिक किफायतशीर होते.

**अमेरिकन कंपनी जेटझिरोचे प्रयत्न**

हे क्रांतिकारी विमान अमेरिकन कंपनी जेटझिरो विकसित करीत आहे. कंपनीचा दावा आहे की, त्यांचे विमान एका वेळी २५० प्रवासी वाहून नेण्यास सक्षम असेल आणि ९,२५० किलोमीटरपर्यंत उड्डाण करू शकेल. याचा अर्थ दिल्ली ते लंडन किंवा मुंबई ते सिंगापूर असे लांब मार्ग सहजपणे पार करता येतील. (वृत्तसंस्था)

**हायड्रोजनवरही उड्डाण शक्य**

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, हे विमान पारंपरिक जेट इंधन आणि शाश्वत विमान इंधन दोन्हीवर चालवता येते. भविष्यात, ते हायड्रोजनवरही चालवता येईल, ज्यामुळे कार्बन उत्सर्जन शून्यावर येईल.

**पर्यावरणासाठी वरदान**

हे विमान पर्यावरणासाठी वरदान आहे. आजच्या विमानांच्या तुलनेत, ते अर्धे इंधन जाळेल, म्हणजेच कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन निम्म्याने कमी होईल. शिवाय नवीन डिझाईन आणि लहान इंजिन उड्डाण, लँडिंग आणि टेकऑफ दरम्यान आवाज लक्षणीयरीत्या कमी करतील. यामुळे विमानतळाजवळ राहणाऱ्यांना दिलासा मिळेल. प्रवाशांनाही फायदा होईल. यात तिकिटांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे, कारण इंधन हा विमान कंपन्यांसाठी सर्वात मोठा खर्च आहे.

## अग्रलेख...

# शेख हसीना, भारत आणि दक्षिण आशिया

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाने मृत्युदंड ठोठावल्याची घटना ही केवळ एका व्यक्तीच्या किंवा देशाच्या भविष्यापुरती नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियाच्या भविष्याशीही संबंधित आहे. अफगाणिस्तानातील तालिबान्यांचे शासन, पाकिस्तानात लष्कराच्या तालावर चालत असलेले सरकार, नेपाळ-श्रीलंकेतील अनागोंदी या पृष्ठभूमीवर लवादाच्या या निर्णयाकडे पाहावे लागते. चीनचा दांडगेपणाही लक्षात घ्यावा लागतो. गेल्या वर्षी जुलै महिन्यात बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांतील आरक्षणावरून विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. हे आंदोलन फार तीव्र झाले तेव्हा शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी उफाळून आली. शेख हसीना यांचा अवामी लीग पक्ष, सुरक्षा यंत्रणा आणि विद्यार्थी-आंदोलक असे संघर्ष झडले. आंदोलकांवर सुरक्षा यंत्रणांनी कारवाई केली आणि त्यात शेकडो लोक मारले गेले. त्यानंतर परिस्थिती इतकी चिघळली की, शेख हसीना यांना देश सोडून पळून जावे लागले आणि भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यानंतर बांगलादेशात नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली अंतरिम सरकार आले. त्या सरकारने लवादाची पुन:स्थापना केली आणि १७ नोव्हेंबरला त्या लवादाने शेख हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली. हत्या, हत्येचा प्रयत्न, घातक शस्त्रांच्या वापराची परवानगी इत्यादी प्रकारचे आरोप शेख हसीना यांच्यावर आहेत. त्यांनी अर्थातच हे आरोप फेटाळले आहेत आणि ही शिक्षा अनिवार्चित सरकारच्या पुढाकाराने राजकीय हेतूने ठोठावली गेली असल्याचे म्हटले आहे. मूलतत्त्ववादी विचारसरणीचे प्राबल्य असलेल्या देशांचे काय होते, याचे हे आणखी एक उदाहरण म्हटले पाहिजे. पाकिस्तानसारखा बांगलादेशचाही इतिहास रक्तरंजितच आहे. भारतासोबत स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानची स्थिती आपण पाहतोच आहोत. बांगलादेशची निर्मिती पाकिस्तानच्या विभाजनातून झाली होती, हा इतिहास आहे. परंतु, एकसंघ वा विभाजित पाकिस्तानी प्रदेश हा मुस्लिमबहुल आणि इस्लामी मूलतत्त्ववाद्यांचा प्रभाव असलेला प्रदेश आहे, हे नाकारता येत नाही. शेख हसीना यांचे पिताश्री आणि बांगलादेशचे संस्थापक राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबूर रहमान यांनी बांगलादेशला प्रगतिशील चेहरा देण्याचा प्रयत्न केला. त्या देशाच्या राज्यघटनेत 'सेक्युलर' शब्दाचा समावेश केला. पण, मूलतत्त्ववाद्यांनी त्यांना सतत त्रास दिला. अखेर शेख मुजीबूर रहमान यांची १९७५ साली त्यांच्या कुटुंबीयांसह हत्या झाली. शेख हसीना म्हणजे त्या शेख मुजीबूर रहमान यांच्या कन्या. त्यांच्या विरोधक आहेत बेगम खालिदा झिया. बेगम खालिदा या माजी राष्ट्राध्यक्ष झिया ऊर रहमान यांच्या पत्नी. खालिदा झिया ज्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या प्रमुख आहेत, त्या पक्षाची स्थापना झिया ऊर रहमान यांनी केली होती. हा पक्ष तितकासा प्रगतिशील विचारसरणीचा नाही. उलट तो मूलतत्त्ववाद्यांच्या जवळचा आहे. शेख मुजीबूर रहमान यांची हत्या झाली तशी झिया ऊर रहमान यांचीही हत्या झाली. झिया ऊर रहमान हे लष्करी अधिकारी होते. त्यांचा जीव लष्करानेच घेतला. एकुणात हा इतिहास फार मोठा आहे. या इतिहासाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे आहे की, तो रक्तरंजित आहे, कौटुंबिक वैराचा आहे आणि देशाचे भविष्य पणाला लावण्याचाही आहे. गेली किमान चार दशके बांगलादेश प्रगतिपथावर होता. गारमेंट उद्योगात तर त्याचे जगात नाव झाले होते. जगाच्या कोणत्याही भागात जाऊन रेडिमेड कपडे घेतले तरी ते प्रामुख्याने मेड इन बांगलादेश असायचे, इतका हा व्यवसाय तेजीत होता. इतरही क्षेत्रांत प्रगती होत होती. शिक्षणात चांगले काम होत होते. आरोग्याच्या सोयी वाढत होत्या. गतवर्षी अचानक उफाळलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनामागे असलेल्या शक्तींनी या विकासाला खीळ घातली. काही दोष शेख हसीना यांचाही होताच. पण, त्यातून उद्भवलेल्या संघर्षात बांगलादेशचे फार मोठे नुकसान झाले. प्रगतीच कुंठित झाली. अजूनही बांगलादेशातील लोकांना नेमके काय चालले आहे आणि उपाय म्हणून काय करायचे, हे लक्षात आलेले नाही. नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस हे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार असले तरी त्यांना या संकटातून देशाला कसे तारायचे याचे भान आलेले दिसत नाही. त्यामुळेच त्यांनी शेख हसीना यांना झालेल्या मृत्युदंडाचे उठवळपणे स्वागत करून टाकले. एकप्रकारे त्यांनी खालिदा झिया यांच्या सुरात सूर मिळविला. बांगलादेशात पुढच्या वर्षी फेब्रुवारीत निवडणुका व्हायच्या आहेत. त्या होतात की नाही, हे आताच सांगता येत नाही.

गतवर्षीपासून सारेच अनिश्चित बनले आहे. आता शेख हसीना यांना ठोठावलेल्या शिक्षेमुळे ही अनिश्चितता वाढलेली आहे. आताच्या स्थितीत भारताची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. शेख हसीना यांना बांगलादेशला परत पाठवावे अर्थात त्यांचे प्रत्यार्पण करावे, अशी मागणी अंतरिम सरकारच्या वतीने भारत सरकारला करण्यात आली आहे. आम्ही स्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि सर्व संबंधितांशी बोलत आहोत, असे भारताने म्हटले आहे. मात्र, शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करणार किंवा करणार नाही, यातले काहीही अद्याप भारताने म्हटलेले नाही. यासंबंधीचा निर्णय इतका सोपाही नाही. भारताचा बांगलादेशशी प्रत्यार्पणाचा करार आहे. या करारानुसार प्रत्यार्पण बंधनकारक असले तरी आरोप किंवा गुन्हा हा राजकीय पृष्ठभूमीचा असेल तर प्रत्यार्पण नाकारले जाऊ शकते, ही बाब शेख हसीना यांच्या पथ्यावर पडणारी आहे. ती सध्या भारताच्याही सोयीची आहे. तरीही भारताला या किंवा त्या टोकाचा निर्णय लगेच घेता येणारा नाही. बांगलादेशातीलच नव्हे तर दक्षिण आशियातील गुंतागुंत आणि आंतरराष्ट्रीय घटकांच्या या नाट्यातील भूमिकाही विचारात घ्याव्या लागणार आहेत. शेख हसीना यांना बांगलादेशच्या सरकारच्या स्वाधीन करण्यास सरसकट नकार दिला तर प्रत्यार्पण कराराचा भंग केला असा आरोप होऊ शकतो. सरसकट होकार भरला तर मूलतत्त्ववाद्यांपुढे भारताचे सरकार नमले, असा अर्थ काढला जाऊ शकतो. शेख हसीना यांना या निकालाविरुद्ध भारतात राहून अपील करण्याची सोय नाही. त्यांना अपील करायचे असेल तर बांगलादेशात परत जावे लागेल. पण, त्या तिकडे गेल्या तर जिवंत राहतील की नाही, याची खात्री नाही. त्यांच्या पक्षाला अर्थात अवामी लीगला निवडणूक लढविण्याची मनाई आहे. त्यामुळे गुंता आणखीनच वाढलेला आहे. शेख हसीना यांनी देश सोडल्यावर बांगलादेशात अल्पसंख्यकांवर अनन्वित अत्याचार झाले. ते रोखावेत यासाठी भारत सरकारने अंतरिम सरकारकडे किती तरी वेळा विनंती केली. पण, मोहम्मद युनूस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असलेल्या अंतरिम सरकारने अल्पसंख्यकांच्या संरक्षणासाठी काहीही केले नाही. उलट, गेल्या वर्षभरात बांगलादेशचे वर्तमान सत्ताधारी लोक हे पाकिस्तानशी जवळिक साधताना दिसत आहेत.

ज्या पाकिस्तानचे आपल्यावरील वर्चस्व बांगला भूमीतील लोकांना खपत नव्हते, त्यांचेच विद्यमान राज्यकर्ते पाकिस्तानच्या मांडीला मांडी लावून चर्चेची गुऱ्हाळे भरत आहेत. थोडक्यात, शेख हसीना यांना परत पाठवण्यातला धोका आणि त्यांना आश्रय देण्यामुळे निर्माण होऊ शकणारी गुंतागुंत याचा अंदाज घेऊनच भारताला पावले उचलावी लागणार आहेत. या निर्णयाला भू-राजकीय आयाम आहेत. वरकरणी एका व्यक्तीला ठोठावलेल्या मृत्युदंडाचा विषय दिसत असला तरी त्याची रक्तरंजित पृष्ठभूमी पाहिली तर बांगलादेशला मूलतत्त्ववाद्यांच्या हातात सोपवण्यास मदत होईल, अशी भूमिका घ्यायची की हा विषय हाताळण्यासाठी वेगळे कौशल्य पणाला लावायचे, हे भारताला ठरवावे लागणार आहे. भारताचे सरकार समर्थ आहे. अशी गुंतागुंत हाताळण्यासाठीही ते सक्षम आहे. भारताकडे दक्षिण आशियातील राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय समुदाय देखील आशेने पाहतो. अशा वेळी जसे काही अधिकार येतात, तशा अनेक जबाबदाऱ्याही वाढतात. भारताने सदैव आपल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहन निगुतीने केलेले आहे. त्यामुळे भारत यावेळीही आपल्या देशाचा, दक्षिण आशियाचा आणि एकूण जगाच्या भविष्याचा विचार करूनच निर्णय घेईल, यात शंका नाही. ▮

## विशेष

# विमानतळाजवळ रिअल इस्टेटचे चांगभले

**प्रा. सुखदेव बखळे**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे आजूबाजूच्या परिसरात जमीन आणि घरांची मागणी वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्‌घाटन झाले. त्यानंतर या विमानतळाच्या बाकी राहिलेल्या कामांना गती आली. सध्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. अजून काही टप्पे पूर्ण होणे बाकी आहे. हे विमानतळ मुंबईच्या दोन्ही जुन्या विमानतळांशी जोडले जाणार आहे. नवी मुंबई विमानतळावरून पुण्याच्या दिशेने येणारा साडेतीन हजार कोटी रुपयांचा आणखी एक रस्ता तयार होत आहे. याशिवाय विमानतळाला जोडणारे कल्याणसह अन्य ठिकाणचे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. बुलेट ट्रेन विमानतळाजवळील परिसरातून जात आहे. त्यामुळे एकात्मिक गतिमान वाहतुकीचा कॉरिडॉर नव्या मुंबईत तयार होत आहे. या सर्वांचा परिणाम नवी मुंबई परिसराच्या विकासावर होत आहे. त्यामुळे रिअल इस्टेटलाही चांगले दिवस आले आहेत. पहिल्या व्यावसायिक उड्डाणापूर्वीच रिअल इस्टेटच्या किमती गगनाला भिडत आहेत. 'ॲनारॉक रिसर्च' या संस्थेच्या अभ्यासानुसार उळवे, पनवेल, तळोजा आणि खारघरमधील जमिनीच्या किमती गेल्या काही काळात ५०-६० टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर घरांच्या किमती २०-४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. विमानतळाची उभारणी सुरू असल्यापासून निवासी आणि व्यावसायिक जागांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. विमानतळ असलेल्या उळवेमध्ये निवासी किमतींमध्ये सर्वाधिक ४० टक्के वाढ झाली आहे, तर खारघरमध्ये या कालावधीत २० टक्के वाढ झाली आहे.

ॲनारॉक प्रॉपर्टी कन्सल्टंट्सचे अध्यक्ष अनुज पुरी यांच्या म्हणण्यानुसार, पुढील दोन वर्षांमध्ये जमिनीच्या किमतीमध्ये ३० ते ४० टक्के अतिरिक्त वाढ होण्याची शक्यता आहे. बहुतेक कॉर्पोरेट कंपन्यांनी नवी मुंबई विमानतळाजवळील जमिनी आधीच विकत घेतल्या असल्याने जमिनीच्या किमतीत आणखी वाढ झाल्यास विमानतळाच्या प्रभावक्षेत्रातील एकूण मालमत्तेच्या किमतींवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. 'स्क्वेअर यार्ड्स' या रिअल इस्टेट कंपनीचे प्रमुख भागीदार आणि मुख्य विक्री अधिकारी दीपक खंडेलवाल यांनी या परिसरातील किमतीत वाढ आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. राज्य सरकारने नवी मुंबई परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. तिसरी मुंबई नवी मुंबईनजीक असल्याने अगोदर नवी मुंबई परिसरात विकासाचा वेग वाढला आहे. राज्य सरकारबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांनी या परिसराच्या विकासाचा नियोजनबद्ध आराखडा तयार करून व्यवस्थित अंमलबजावणी केल्यामुळे शहराच्या अंतर्गत भागात वाहतुकीच्या



कोंडीसह अन्य समस्या येत नाहीत. आर्थिक वर्ष २०२१ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान पनवेल परिसरातील घरांच्या किमती सुमारे ७४ टक्क्यांनी वाढून दहा ते बारा हजार रुपये प्रति चौरस फूट झाल्या आहेत, तर नवी मुंबईतील उर्वरित भागात घरांच्या किमतीत ४५ टक्के वाढ झाली आहे. या भागात मालमत्तेची किंमत १९ ते वीस हजार रुपये प्रति चौरस फूटपर्यंत गेली आहे. नवी मुंबईबरोबरच विकसित झालेल्या अन्य उपनगरांच्या आणि मालमत्तांच्या किमतीपेक्षा या किमती जास्त आहेत. पनवेल भागाचे उदाहरण घेतल्यास भूखंडाचे दर सरासरी ऐंशी हजार ते ८५ हजार रुपये प्रति चौरस यार्डपर्यंत पोहोचले आहेत. त्यात झालेली ९३ टक्के वाढ ही सर्वाधिक आहे. नवी मुंबईच्या इतर भागांमधील दरांमध्ये ५८ टक्के वाढ झाली आहे. तिथे किमती जास्त आहेत. पूर्णपणे कार्यरत झाल्यावर देशातील सर्वांत मोठे विमानतळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई विमानतळाचे उद्‌घाटन जवळ येताच प्रॉपर्टी डेव्हलपर्सनी अनेक प्रकल्प सुरू केले. गेल्या तीन वर्षांमध्ये नवी मुंबईत सुमारे ४५ दशलक्ष चौरस फूट निवासी जागा सुरू करण्यात आल्या. त्यापैकी सुमारे ६७ टक्के जागा फक्त चार प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांनी दिल्याचे ॲनारॉकने म्हटले आहे. या कालावधीत मुंबईत २८२ दशलक्ष चौरस फूट जागेवरील नव्या प्रकल्पांना सुरुवात झाली आहे. 'अनेक मोठे विकासक या भागात महत्त्वाकांक्षी निवासी प्रकल्प सुरू करत आहेत. त्यामुळे खारघर, पनवेल, उळवे आणि तळोजा ही प्रमुख निवासी केंद्र बनली आहेत', असे पुरी यांनी सांगितले. द गार्डियन्स रिअल इस्टेट ॲडव्हायझरीचे सह-संस्थापक आणि सीईओ राम नाईक यांना उळवेसारख्या प्रमुख सूक्ष्म बाजारपेठांमध्ये मालमत्तेच्या मागणीत अनेक पटींनी वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे म्हटले आहे. पूर्वी संभाव्य विकसनशील क्षेत्र म्हणून गणला जाणारा हा परिसर आता उच्च-मागणीच्या कॉरिडॉरमध्ये रूपांतरित होईल. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, आगामी मेट्रो लाईन्स आणि सायन-पनवेल महामार्ग विस्ताराद्वारे सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे संपूर्ण पट्ट्याला दक्षिण मुंबई आणि ठाणे या दोन्ही ठिकाणी जलद प्रवेशाचा फायदा होईल. गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून, नवी मुंबई त्याच्या सुवर्ण टप्प्यात प्रवेश करत आहे, असे ते म्हणाले.

पुढील काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात निवडक ठिकाणी २० ते ३० टक्के भांडवलवाढ होऊ शकते. दर्जेदार प्रकल्प आणि वेळेवर अंमलबजावणीची क्षमता असलेले विकासक त्याचा सर्वाधिक फायदा घेऊ शकतात, तर खरेदीदारांना मुंबईतील संतृप्त बाजारपेठांच्या तुलनेत दीर्घकालीन मूल्य जास्त मिळेल. सीबीआरईचे भारत, आग्नेय आशिया, मध्य पूर्व आणि आफ्रिकाचे अध्यक्ष आणि सीईओ अंशुमन मॅगझिन यांच्या माहितीनुसार नवी मुंबई विमानतळाचा शहराच्या रिअल इस्टेटवर, विशेषतः विमानतळाच्या आसपासच्या भागात, परिवर्तनकारी परिणाम होईल. विमानतळ कर्मचारी, कार्यरत व्यावसायिक आणि विमान वाहतूक कर्मचाऱ्यांच्या गरजांमुळे विमानतळाभोवती निवासी जागांची मागणी वाढण्याची शक्यता आहे, तर लॉजिस्टिक्स पार्क, कार्यालये आणि हॉटेल्सच्या विकासामुळे व्यावसायिक मागणी वाढण्याची शक्यता आहे. मालमत्ता विकासक किमती वाढण्याबाबत तितकेच उत्साही आहेत. किमती स्थिर होण्यापूर्वी नजीकच्या भविष्यात त्या आणखी २०-२५ टक्के वाढतील. नवी मुंबई परिसरात ज्या भागात किमती वाढल्या नाहीत, त्या आता वाढतील. वाधवा ग्रुपचे एमेरिटस अध्यक्ष विजय वाधवा म्हणाले की, खारघरसारखी ठिकाणे आता महाग झाली आहेत. अलिकडेच अदानी एअरपोर्ट होल्डिंगद्वारे संचालित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने पनवेलमधील वाधवा वाईज सिटी या टाऊनशिप प्रकल्पात वाधवा ग्रुपकडून ४०५ 'रेडी टू मूव्ह इन' फ्लॅट्स भाड्याने घेतले आहेत. नवी मुंबईचे ऑफिस मार्केट म्हणून असलेले धोरणात्मक स्थान, विमानतळाद्वारे वाढलेली कनेक्टिव्हिटी आणि जागतिक प्रवेश यामुळे पुढील काही वर्षांमध्ये या भागात ऑफिस भाडेपट्ट्याने देण्याचा व्यवसाय आणि भाडीही वाढण्याची शक्यता आहे. विमानतळाशेजारी प्रस्तावित ६६७ एकर नवी मुंबई एरोसिटी कारकीर्दीच्या संधी आणि जीवनशैलीचे मिश्रण करणारी एक नवी शहरी परिसंस्था वाढवेल. नवी मुंबई विमानतळ या परिसरातील पाच-दहा किलोमीटर भागाच्याच विकासाला हातभार लावेल असे नाही, तर शेजारच्या रायगड जिल्ह्यातील काही भागांच्या आणि प्रामुख्याने तिसऱ्या मुंबईच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अमरावतीत स्वबळाची व बंडखोरीची भाषा

अमरावती जिल्ह्यात १० नगरपरिषद व २ नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या सोमवार १७ नोव्हेंबर या शेवटच्या दिवसापर्यंत अध्यक्षपदासाठी १२७ तर सदस्यपदासाठी १८२१ नामांकन अर्ज दाखल झाले होते. महायुती व महाविकास आघाडीतल्या घटकपक्षांनी बहुतांश ठिकाणी स्वबाळाचा नारा दिला आहे. सध्याच्या स्थितीत अन्य पक्षांच्या तुलनेत भाजपात सर्वाधिक बंडाखोरी दिसत आहे. भाजपाच्या अनेक नाराज मंडळींनी दुसऱ्या म्हणजे महायुतीत घटक पक्ष असलेल्या पक्षाचीच वाट धरली आहे. जवळपास सर्वच ठिकाणी उमेदवारी देताना निष्ठावंतांना डावलल्याची भावना तयार झाली आहे. भाजपात त्याचे प्रमाण जास्त असल्याने नाराजी व असंतोष जास्त आहे. त्याचे एक प्रमुख कारण भाजपाची उमेदवारी मागणाऱ्यांची संख्याही भरपूर होती आणि मलाच उमेदवारी मिळणार हा विश्वास अनेकांना होता. पण, उमेदवार याद्या जाहीर झाल्यानंतर त्यांच्या तोंडातून खदखद शब्दरूपाने वेगाने बाहेर पडत आहे.

जिल्ह्यात ९ वर्षांपूर्वी जेव्हा नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका झाल्या होत्या तेव्हा भाजपाचे वरूड, मोर्शी, शेंदूरजना घाट, चांदूर बाजार, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, अंजनगाव सुर्जी, नांदगाव खंडेश्वर येथे अध्यक्षपदाचे उमेदवार विजयी झाले होते. विजयी सदस्यांची संख्या भाजपाचीच जास्त होती. या कार्यकाळ नैसर्गिक न्यायाने सत्ताधाऱ्यांच्या विरोधात नाराजी वाढली होती. नव्या निवडणुकांची चाहूल लागत असतानाच कोरोना महामारीमुळे जिल्ह्यासह राज्यातल्या सर्वच नगरपरिषद व नगरपंचयातींवर प्रशासक राज आले. तेव्हापासून जिल्ह्याच्या राजकारणाच्या नदीतून बरेच पाणी वाहून गेले. काही ठिकाणी राजकीय पूर आले. दरम्यानच्याच काळात लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. वातावरण स्थिरसावर झाल्यावर या निवडणुका होत आहे. नेहमीप्रमाणे निवडणुका होतील, ही अपेक्षा बाळगून असलेल्यांना धक्का देत निवडणूक आयोगाने अत्यंत कमी वेळेतली निवडणूक प्रक्रिया जाहीर केली. त्यात काहींचे जमले तर काही हिरमुसले. त्यात आता जिल्ह्यातल्या राजकीय घराण्यातल्या काही व्यक्तींना उमेदवारी मिळाल्या आहे. अकोट मतदारसंघाचे भाजपाचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नीला दर्यापूर नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. नलिनी भारसाकळे असे त्यांचे नाव आहे. त्याच प्रमाणे भाजपाचे धामणगाव रेल्वे मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड यांच्या भगिनी डॉ. अर्चना रोठे - अडसड यांना धामणगाव रेल्वे नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेना उबाठाचे आमदार गजानन लवटे यांनी पुत्र यश लवटे यांच्यासाठी अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अध्यक्षपदाची उमेदवारी खेचून आणली आहे. आल्हाद कलोती यांनी चिखलदरा नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपातून नामांकन दाखल केल्याने त्याकडे अनेकांचे लक्ष आहे. या उमेदवारींची चर्चा तर होतच आहे आणि संपूर्ण निवडणूक काळात होत राहील. इतर पक्षांतून आलेल्यांना भाजपाने काही ठिकाणी अध्यक्ष व सदस्यपदाची उमेदवारी दिल्याने नाराजी आहे. काही ठिकाणी तर नवख्या उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. काँग्रेसने स्वपक्षातल्याच उमेदवारांना संधी देताना मुस्लिम समाजाला प्राधान्य दिले आहे. इतर पक्षांमध्ये स्वतःचे व आयातीत उमेदवार आहेत. असंतोष दोन्ही बाजूने आहेच, फक्त प्रमाण कमी जास्त आहे. आता जिल्ह्यात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. महायुती व महाविकास आघाडीचे घटक पक्ष स्वबळावर निवडणूक जिंकण्याच्या तोऱ्यात आहे. त्यात त्यांना किती फायदा होईल, हे सांगता येत नाही. भाजपा फायद्यात राहू शकते पण, त्यासाठी ठिकठिकाणी उफाळलेला असंतोष त्यांना शमवावा लागेल. इतर पक्ष भाजपातील कार्यकर्त्यांच्या खदखदीवरच अवलंबून आहे. ती शेवटपर्यंत कायम राहिली तर आपले नशीब उजळू शकते, असे काहींना वाटते. त्यात काही प्रमाणात का होईना सत्यता निश्चित आहे. हा सर्व अंदाज घेऊनच भाजपाला निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. काही ठिकाणी भाजपाविरुद्ध इतर सर्व असेही प्रयत्न होत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यापर्यंत बरीच उलथापालथ होऊ शकते. भाजपाने त्यावर काम सुरू केले असेलच. त्यात त्यांना किती यश मिळते यावरच अपेक्षित निकालाचे गणित आहे. मागच्या निवडणुकीपेक्षाही भाजपाला चांगली कामगिरी करायची असेल तर चक्रव्यूह भेदावा लागेल. ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - मोक्षसंन्यास योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा १८ वा अध्याय मोक्षसंन्यास योग आहे. श्रीगीतेचा हा अंतिम अध्याय आहे. या अध्यायाला कळसाध्याय असेही म्हणतात. हा अध्याय म्हणजे संपूर्ण गीतेचा अर्क आहे. एका अर्थाने ही अवतरणिकाच आहे. या अध्यायात गीतेचे सर्व अध्याय समाविक्ती आहेत. 'ज्ञानदेवा सार चोजविले' असा हा अध्याय. सिंहावलोकन करणारा हा अध्याय आहे. या अध्यायात मोक्षप्राप्तीचे गुह्यज्ञान सांगितले आहे. संपूर्ण गीतेमध्ये आपण वारंवार कर्मसंन्यास आणि कर्मफलत्याग हे दोन शब्द वाचले आहेत. त्यांना यथार्थ जाणण्याच्या दृष्टीनेच अर्जुनाने प्रश्न केला-

अर्जुन उवाच - 'सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥'

हे महाबाहो, हे हृषीकेश, संन्यास आणि त्याग या शब्दांचे सांगोपांग चिंतन ऐकण्याची इच्छा आहे. भगवंत सांगतात की, अर्जुना! काही विद्वान सर्वकर्म त्यागाला संन्यास म्हणतात तर काही सर्वकर्म त्यागालाच त्याग म्हणतात. काही विद्वान म्हणतात की, कर्म दोषयुक्त असल्यामुळे त्याचा त्याग करणे योग्य आहे तर काही म्हणतात की यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा अजिबात त्याग करू नये. भगवंत म्हणतात, अर्जुना! विद्वान काय म्हणतात ते जाऊ दे. मी काय म्हणतो ते नीट ऐक-

'यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥'

यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा त्याग करणे योग्य नाही; उलट या तिन्ही कर्मांचे अनुष्ठान करावे. कारण ते चित्तशुद्धीचे साधन आहेत, पण हे तिन्ही कर्म आसक्तीने नकोत.

'एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥'

यज्ञ, दान आणि तप कर्मफळाचा त्याग करून करावीत, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यागही तीन प्रकारचा आहे. सात्त्विक, राजसिक आणि तामसिक.

'नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥'

मोहाने केलेला त्याग तामसिक त्याग आहे.

'कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ॥'

आसक्ती न ठेवता कर्मफळाचा त्याग करून केलेला त्याग हा सात्त्विक त्याग होय. खरं तर आपण देहधारी आहोत. त्यामुळे आपल्याकडून संपूर्ण कर्मांचा त्याग केवळ अशक्य आहे. जो फळाची अपेक्षा ठेवतो त्याला इष्ट, अनिष्ट किंवा संमिश्र फळ मृत्यूनंतर प्राप्त होईल. म्हणजे देवलोक, नरक किंवा पुन्हा मनुष्य लोक प्राप्त होईल; परंतु फळाची अपेक्षा न ठेवणाऱ्या पुरुषाला यातील काहीही न मिळता फक्त मोक्ष मिळतो. कर्मांच्या सिद्धीसाठी भगवंतांनी वेदांतात पाच घटक सांगितले आहेत-

'अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥'

अधिष्ठान, कर्ता, इंद्रिये, इंद्रिय व्यापार आणि दैव हे ते पाच घटक आहेत. आपण जेव्हा शास्त्राला धरून किंवा शास्त्राविरुद्ध कर्म करतो त्यालाही हेच पाच घटक कारणीभूत आहेत. अजून एक सांगतो-

'यस्य नाहङ्‌कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥'

अर्जुना! जो पुरुष 'मी कर्ता' नसून 'कर्ता करविता परमेश्वर' असा शुद्ध भाव ठेवतो तो पुरुष बद्ध होत नाही. तू युद्धात सर्वांना मारले तरीही त्यांना तू मारले नाही तर त्यांना मारणारा किंवा तारणाराही मीच आहे, याची आठवण सहज भगवंत देतात. यासाठी कर्ता, कर्म आणि करण हा कर्मसंग्रह आणि ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान हे कर्मप्रेरक यावर प्रतिपादन करतात. यामध्ये ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे सात्त्विक, राजसिक आणि तामसिक असे तीन प्रकार भगवंत सांगतात.

'सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥'

ज्या ज्ञानाने मनुष्य चराचरात भगवंत पाहतो ते ज्ञान म्हणजे सात्त्विक ज्ञान.

'पृथक्तवेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥'

ज्या ज्ञानाने माणूस भूतमात्रामध्ये भेद करतो ते ज्ञान राजसिक ज्ञान.

'यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥'

कर्मांचेही भेद भगवंत सांगतात- जे कर्म शास्त्राला धरून, फळाची अपेक्षा न ठेवता केले जाते ते सात्त्विक कर्म आहे. जे कर्म ऐहिक सुखासाठी फळाची अपेक्षा ठेवीन परिश्रमपूर्वक केले जाते ते राजसिक कर्म. जे कर्म परिणाम, हानी, हिंसा, आपल्या सामर्थ्याचा विचार न करता अविचाराने केले जाते ते तामसिक कर्म होय. भगवंत कर्त्याचे प्रकार स्पष्ट करतात-

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥'

आसक्तीरहित धैर्य आणि उत्साहाने युक्त, हर्ष किंवा शोकात निर्विकार असणारा कर्ता सात्त्विक कर्ता असतो.

'रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥'

आसक्ती ठेवणारा, दुसऱ्यांना पीडा देणारा, अशुद्ध, हर्ष आणि शोकाने परिणाम होणारा कर्ता राजसिक कर्ता आहे.

'अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥'

संस्कारशून्य, उद्धट, कपटी, विध्वंसक, आळशी असा कर्ता तामसिक कर्ता असतो. यापुढे भगवंत बुद्धी आणि धृतीचेही याच तीन प्रकारात वर्णन करतात. सात्त्विक बुद्धी ती की जिला प्रवृत्ती आणि निवृत्ती, कर्तव्य आणि अकर्तव्य, भय आणि अभय किंवा बंध आणि मोक्ष यांच्या स्वरूपाची जाण असते. ज्या बुद्धीला वरील बाबींची जाणीव नसते ती राजसिक बुद्धी. जी बुद्धी अधर्माला धर्म मानते ती तामसिक बुद्धी होय. आता धृतीसंबंधात विचार मांडला आहे. धृती म्हणजे धैर्य. धृती ही बुद्धीची प्रवृत्ती आहे. ज्या धृतीने मन, प्राण आणि इंद्रिय धारणा संयमित केल्या जातात ती सात्त्विक धृती होय. ज्या धृतीने धर्म, अर्थ आणि काम यांना धारण करून मनुष्य फळाची आकांक्षा ठेवतो ती राजस धृती होय. ज्या धृतीत निष्ठा, भय, शोक, विषाद आणि उन्माद असतो ती तामस धृती होय. भगवंताने याच अध्यायात सुखाचे तीन प्रकार सांगितले आहेत. जे सुख सुरुवातीला विषासारखे वाटते, पण त्याचा परिणाम अमृतासम असतो, ते सात्त्विक सुख आहे. जे सुख विषयभोगामुळे अमृतासमान वाटते, पण त्याचा परिणाम विषासारखा दुःखद असतो ते राजसिक सुख आहे. जे सुख झोप, आळस, प्रमाद यामुळे वाटते ते तामसिक सुख आहे.

'न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिःस्यात्त्रिभिर्गुणैः ॥'

हे अर्जुना, या त्रिलोकात एकही जीव असा नाही की, जो प्रकृतीच्या त्रिगुणातून (सत्त्व-रज-तम) मुक्त आहे. या अध्यायाच्या प्रथम लेखात एकूण ४० श्लोकांचा विचार केला असून त्यात संपूर्ण कर्मांचा त्याग किंवा संन्यास योग्य किंवा हितकारक नाही. वेदप्रतिपाद्य यज्ञ, दान, तप इत्यादी कर्म, त्याचे अनुष्ठान करणे आपले इष्ट कर्तव्य आहे. अध्यायाचा दुसरा भाग पुढील भागात... ▮

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-४७

बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

### नौजवान सैनिका उचल पाउला

नौजवान सैनिका उचल पाउला
पुढे चला पुढे चला ध्वनि निनादला ॥धृ.॥

मायदेश आपुला स्वतंत्र जाहला
उच्च कीर्तिशिखरिं चढविण्यास त्याजला
व्हा तयार! व्हा हुशार! घोष जाहला ॥१॥

शिवाजि शूर बाजि वीर बापू गोखले
प्रताप थोर समरवीर अमर जाहले
ती उदात्त भव्य दिव्य स्मर परंपरा ॥२॥

टिळक केशव नरेन्द्र थोर अग्रणी
रंगले स्वदेशकार्यि स्वार्थ त्यागुनी
त्यासमान देव मान देश आपुला ॥३॥

मार्ग तव तुला जरी भयाण वाटला
विपत्तिचा गिरी जरी समोर ठाकला
बेधडक तू दे धडक नि फोड त्याजला ॥४॥

### वातावरणातील बदल

दिवाळी, तुळशीचे लग्न झाले तरी बाजारपेठेतील उत्सवी वातावरण काही कमी झाले नाही. आता लग्नसराईचे दिवस सुरू झाले आहेत त्यामुळे सगळीकडे लगबग दिसू लागली आहे. आजकाल दिवाळीत थंडीची हजेरी न लागता थोडी उशिराने म्हणजे आताशी जाणवायला लागली आहे. त्यामुळे सकाळी सगळीकडे आल्हाददायक वातावरण आहे. सकाळी फिरायला गेल्यावर गरम आल्याच्या चहाचा, बुचीच्या फुलांचा दरवळ आसमंतात दरवळतो. सगळीकडे थंडीच्या कपड्यांचे सेल सुरू झाले आहेत. तिबेटीयन मार्केटमध्ये विविधरंगी ऊबदार कपड्यांचे प्रदर्शन लागले आहे. आपण नुसता फेरफटका मारला असता अनेकविध स्टायलिश तसेच पारंपरिक वूलन कपड्यांचे दर्शन होते.

आहाराची विविधता तर याच दिवसांत अनुभवण्यास मिळते. याच दिवसात अनेक समारंभाचे आयोजन केले जाते. त्यातील चटकदार गरम खाद्यपदार्थांवर जास्त भर दिला जातो. या दिवसात बाजारात फेरफटका मारणे हा अनुभव नेत्रसुखद असतो. भाज्यांच्या किमती जरा घसरल्या असतात. नानाविध हिरव्यागार भाज्यांनी गाड्या/दुकाने सजली असतात. कोथिंबीरीच्या जुड्यांना पुडाच्या वडीचे वेध लागतात. गर्मीचा प्रभाव कमी झाल्यामुळे सगळीकडे एकदिवसीय सहलीचे कार्यक्रम आखले जातात आणि निसर्गाचा आनंद घेतला जातो. मार्गशीर्ष महिन्यात गुरुवारचे महत्त्व अधिक असते. तसेच श्री मल्हारी मार्तंड षडरात्र उत्सव, नागदिवाळी, दत्त सप्ताह याच महिन्यात असतो. कफ, वात प्रवृत्ती असणाऱ्यांनी मात्र स्वतःची काळजी घ्यावी तसेच प्रत्येकाने गरजू लोकांना गरम कपडे दान करून समाजाचे ऋण फेडावे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### नरेंद्र मोदी नावाचे गारूड

नुकतेच आम्ही सर्व कुटुंबीय गुजरातमध्ये सहलीसाठी गेलो होतो. अहमदाबादमधील सर्व प्रेक्षणीय स्थळे, अटल ब्रिज, तेथील जवळपास शंभराहून अधिक असलेल्या १९व्या शतकातील जुन्या कार्सचे प्रदर्शन, बारा ज्योतिर्लिंगांपैकी सर्वांत प्रथम असलेले श्री सोमनाथ मंदिर, तेथील उत्कृष्ट लाईट शो, गीरचे अभयारण्य, श्रीकृष्णाने अंतिम श्वास घेतला ते भालका तीर्थ, सरदार सरोवर, धरणाच्या बाजूला उभारलेला सरदार पटेल यांचा जगातील सर्वांत उंच असलेला प्रचंड मोठा पुतळा, जुनागडचा किल्ला, किल्ल्यावरून घेतलेले गिरनारचे दूरदर्शन अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. या सहलीमध्ये सर्वांत जास्त जाणवले ते नरेंद्र मोदी नावाचे गारूड ! सरदार सरोवर परिसरात तर पटेलांच्या पुतळ्यापेक्षाही, सर्वच बाबतीत, पंतप्रधान नरेंद्र मोदींची जास्त जाहिरात आणि प्रसिद्धी केली आहे. यात एका शब्दाचीही अतिशयोक्ती नाही. अर्थात जनताही मोदींना मनमोकळेपणाने मान देते हेही जाणवले. सरदार सरोवराजवळ असलेल्या प्राणी संग्रहालय दाखवण्यासाठी असलेल्या ई- रिक्षा फक्त महिलाच चालवतात. नरेंद्र मोदींनी आपल्या कारभारातून हा सन्मान मिळवला आहे हे वादातीत आहे. सगळीकडे प्रशस्त रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक, उत्तम शहर बस व्यवस्था, सर्वच गोष्टींमध्ये असलेली स्वस्ताई, खाद्यपदार्थांची रेलचेल, सार्वजनिक स्वच्छता, मोठी पात्रे असलेल्या स्वच्छ आणि वाहत्या नद्या, भरपूर वनराई, स्वच्छ समुद्रकिनारे अशा अनेक गोष्टींनी आमची सहल अविस्मरणीय केली. मोदी नावाच्या जादूगाराचे हे गारूड गुजराती जनतेच्या मनातून जाण्याची कोणतीही शक्यता नाही आणि भारतभर ते पसरले यातही काहीही आश्चर्य नाही. ▮

**शिवराम वैद्य** /९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## मोहंम्मद अयाज यांचा राष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्काराने सन्मान

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

सोलापूरचे गायक मोहम्मद अयाज यांना राष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. हा पुरस्कार ऊर्जा मंत्री श्रीपाद नाईक व प्रख्यात निर्माता दिग्दर्शक मेहूल कुमार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी उद्योगपती शाम सिंघानिया तसेच चित्रपट सृष्टीतील दिग्गज मान्यवर उपस्थित होते. स्वदेश फाऊंडेशन त्यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्कार २०२५ हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. हा भव्य सोहळा रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील पंचतारांकित हॉटेल रेडिसन येथे पार पडला. यावेळी अभीनेत्री अंकीता रावल, नताशा फर्नांडिस, दिग्दर्शक टिनू वर्मा, स्वदेशचे संजीव कुमार, आदित्य देशमुख, वैभव शर्मा, युसुफ शाकीर उपस्थित होते.



## बाळासाहेब ठाकरे यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक संतोष बुलबुले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक रजनी राऊळ, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, नंदकुमार फुलारी,अविनाश शिंदे, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, ताहीर बिराजदार, भालचंद्र साखरे, नाशिर खान, सायली ढोले उपस्थित होते.



## डॉ. कोटणीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये बालदिन साजरा

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने बालकांच्या कल्याणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी वचनबद्धतेची पुष्टी करत डॉ. कोटनीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलमध्ये बालदिन साजरा केला. ८ ते १२ वयोगटातील मुलांसाठी आयोजित क्विझ स्पर्धेत त्यांचे ज्ञान आणि टीमवर्कची चाचणी घेण्यात आली तर पिक अँड स्पीक स्पर्धेत सहभागींना त्यांचे संवाद कौशल्य दाखवता आले. ८ वर्षांखालील मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेने उत्सवात आकर्षण निर्माण केले. मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंजुनाथ आणि अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. कृष्णा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे प्रभारी डॉ. विनोद यांच्या समर्पित प्रयत्नांसह, मुख्य परिचारिका अधीक्षक राहुल गंबारे आणि मुख्य आरोग्य निरीक्षक सागर नळ यांच्या सहकार्याने कार्यक्षमतेने समन्वय साधण्यात आला. स्पर्धांचे मूल्यांकन डॉ. देवीलाल आणि डॉ. मेघना यांनी केले, त्यांनी मुलांच्या उत्साह आणि प्रतिभेचे कौतुक केले. प्रत्येक श्रेणीतील विजेत्यांना डॉ. मंजुनाथ आणि डॉ. रतन यांनी सन्मानित केले, त्यांनी सहभागींचे अभिनंदन केले.

# झटपट प्रसिद्धीसाठी समाजमाध्यमांवर नवनवीन फंडे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

प्रसिद्धी मिळिवण्यासाठी रील बनवणे ते सोशल मीडिया, इन्स्टाग्राम, फेसबुक आदी माध्यमांवर अपलोड करण्याचा फंडा विशेषता तरुणांमध्ये लोकप्रिय होऊ लागला. यामध्ये जिवाशी खेळ खेळणारे, स्टंटबाजी करून दुसऱ्याला त्रास देणे आणि बदनामी करणाऱ्या गुन्हेगारी रिल्समुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. उरण परिसरातील स्टंटबाजी होत असली तरी याप्रकरणी अद्याप एकही गुन्हा दाखल झाला नसल्याचे पोलिसांकडून सांगितले जात आहे. दिवसेंदिवस हौशी रील स्टारची संख्या वाढत आहे.

रील्सला मोठ्या संख्येने लाईक्स, कमेन्ट मिळाव्यात, व्हिडिओ व्हायरल व्हावेत यासाठी काहीजण दररोज सोशल मीडियावर व्हिडीओ अपलोड करीत असतात. यापैकी बहुतांश रिल्स प्रसिद्धी मिळिवण्यासाठी तर काही गुन्हेगारी रील्स कुणाची तरी बदनामी करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावर टाकले जातात. रील्स करण्याच्या नादात सामाजिक प्रतिष्ठा पणाला लावण्याचे प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहेत .

गुन्हेगारीची पार्श्वभूमी रील्सचे व्हिडिओ व्हायरल करण्यासाठी दिवसेंदिवस गुन्हेगारीने कळस गाठला आहे. सध्या रस्त्यावर, गल्लीत चौकात होणारी अनेक गुन्हेगारी स्वरूपाची कृत्य सोशल मीडियावर दिसून येऊ लागली आहेत. आक्रमक भाषणे, अफवांमुळे सामाजिक वातावरण गढूळ होण्याचे प्रकार वाढले आहेत. आता तर सोशल मीडिया, इन्स्टाग्रामच्या माध्यमातून तरुणांकडून खुलेआम गुन्हेगारीला प्रवृत्त करणारे रिल्स अपलोड केले जात आहेत.

रिल्सच्या दुनियेत चांगले व वाईटांची जाण नसल्याने भरकटणारा एक खूप मोठा वर्ग उदयास आला आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील अपलोड होणाऱ्या रिल्सवर वचक कुणाचा, असा प्रश्न या निमित्ताने नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### नियमावली आवश्यक

कोणाच्या जिवाची पर्वा न करता रिल्स बनवताना दिसत आहे. सोशल मीडियावर रिल्स बनवून प्रसिद्ध होणाऱ्यांची संख्या फार आहे. काहीतरी स्टंट करायचा किंवा हुल्लडबाजी करुन प्रसिद्ध होण्याचं फॅड वाढत आहे. अनेकदा जिवाला धोका असूनही अनेक लोक प्रसिद्धीसाठी असे घातक असणारे रिल्स करतात. त्यांच्यावर ठोस कारवाईसाठी नियमावली आवश्यक असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. रील बनवणे आणि गुन्हेगारी कृत्ये या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. रील बनवण्याचे वेड हे गुन्हेगारी कृत्यांना प्रोत्साहन देऊ शकते. समाजात वाढते प्रकार चिंता वाढविणारे आहेत.



## दादाई व गुरूकृपा सामाजिक संस्थेतर्फे टकारी समाजातील सुपुत्रांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

टकारी समाजातील सुपुत्र दत्तात्रय गायकवाड यांची तहसीलदार पदी पदोन्नती होऊन धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालय येथे नेमणूक झाल्याने दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था व गुरूकृपा बहुउद्देशीय सेवा भावी संस्था मित्र परिवाराच्या वतीने गुरूकृपा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश जाधव यांच्या हस्ते मानाचा फेटा शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

प्रशांत जाधव यांची देखील उपअधीक्षक सिटीसर्वे धाराशिव (उस्मानाबाद)येथे पदोन्नती मिळाल्याने त्यांचा सत्कार दादाई संस्थेचे संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव यांच्या हस्ते मानाचा फेटा शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लाभलेले विभाग जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील सहाय्यक महसूल गजानन गायकवाड यांचा सत्कार शिवाजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. कबड्डी महाराष्ट्र राज्य निवड समिती सदस्य पदी अंबादास मारुती गायकवाड यांची निवड झाल्याबद्दल छायाप्पा चव्हाण यांच्या हस्ते त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी अक्कलकोट तालुका जेऊर ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच सुनील जाधव, बाबासाहेब शेख, रवींद्र गायकवाड, बालाजी जाधव, यल्लाप्पा जाधव, निलेश गायकवाड, विवेक जाधव, नागेश कलाल, शंकर लांडगे, ऋषिकेश जाधव, श्रेयस गायकवाड, सुजल गायकवाड, समर्थ जाधव, अनिकेत गायकवाड, पृथ्वी जाधव आदी उपस्थित होते.

## बहुजन शिक्षक महासंघाच्या स्नेह मेळाव्यात देवकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचा स्नेहमेळावा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर महानगरपालिकेच्या हिरवळीवर संपन्न झाला.

महासंघाचे सोलापूर जिल्हा सचिव आणि बहुजन शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे खजिनदार रवी देवकर यांना पुणे येथे तिसरे अखिल भारतीय वडार बोली साहित्य संमेलन यांच्यावतीने राष्ट्रीयस्तरीय क्रांतिवीर वड्डे ओबाण्णा समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यानिमित्त महासंघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर आणि राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड यांच्या हस्ते रवी देवकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रवी देवकर यांच्या कार्यावर प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर, राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश शिंदे, निर्मला मौळे आदींनी प्रकाश टाकला. तसेच प्रा. अभिजीत भंडारे यांनी देवकर यांच्या कार्याची महती स्वरचित कवितेतून व्यक्त केली. प्रारंभी संविधान बचाव समिती यांच्यावतीने आयोजित दि. २६ नोव्हेंबर रोजीच्या मोर्चात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश शिंदे, जिल्हाध्यक्ष प्रा. युवराज भोसले, मोहोळ तालुकाध्यक्ष शिवाजी जगताप, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष नितीन गायकवाड, प्रिया कदम, पृथ्वी शिंदे, रिजवाना बेलीफ, मेहबूब तांबोळी, एकोराम चौगुले, रवींद्र चौगुले, फरीदा बेलीफ, जयदीप गायकवाड, स्वप्नजा कसबे, इन्नुस बाळगी, नागेश सातपुते, भीमराव माने, संदीप निस्ताने, डॉ. श्रुतिका उडाणशिव, राजेंद्र सोरटे, महानंदा शिंदे, इरफान शेख उपस्थित होते. प्रास्ताविक इन्नुस बाळगी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. युवराज भोसले यांनी केले तर निर्मला मौळे यांनी आभार मानले.



## राजे गणपती सांस्कृतिक मंडळाच्या वतीने बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त राजे गणपती सांस्कृतिक मंडळाच्या वतीने बाळासाहबे ठाकरेंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेनेचे सोलापूर लोकसभा प्रमुख पुरुषोत्तम बरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिवसेनेचे शहर संघटक सुरेश जगताप, लहु गायकवाड, तुषार आवताडे, महिला आघाडीच्या स्वाती रुपणर, वैशाली सातपुते, दत्ता खलाटे, दीपक दळवी, विभागप्रमुख आबा सावंत, संजय साळुंखे, महेश गवळी, सुभाष सातपुते, राहुल परदेशी, वैभव पाटील, मंगेश क्षीरसागर, तानाजी पाटील, राजेश पानकर, विशाल दंगेकर, बाळासाहेब बेंडकाळे, ज्ञानदेव वाघमोडे, ज्ञानदेव सुरवसे प्रशांत गुंड, विवेक रुपनर, मल्लू चौगुले, सुनील इसड, सुहास लोंढे उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय साळुंखे यांनी केले तर आभार सुरेश जगताप यांनी मानले.



## अक्कलकोट रोड परिसरातील नगरांमध्ये अर्धवट विकास कामे

### महिलांनी केली सुविधा मिळण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

येथील अक्कलकोट रोड परिसरातील विविध नगारांमध्ये पाणी ड्रेनेज आणि रस्त्यांची वेगवेगळी विकास कामे महापालिका प्रशासनाने हाती घेतली आहेत. मात्र ही कामे अर्धवट स्वरूपात करण्यात आल्याने याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

ही कामे तातडीने पूर्ण करण्यात येऊन यासह विविध सोयी सुविधा नगरातील नागरिकांना उपलब्ध करून द्यावीत अशी मागणी सोलापूर महापालिकेत मोर्चा स्वरूपात आलेल्या महिलांनी जनता दरबारात केली.

अक्कलकोट रस्त्यावरील तसेच एमआयडीसी परिसरातील अंबिका नगर, ईश्वर नगर, गंगा नगर, विश्वास नगर, तिरूपती नगर, कमलेश्वर नगर, हिमगिरी नगर भाग २-३, कामाक्षी नगर आदी नगरे असून या नगरांमधील नागरिक अनेक सुविधांपासून वंचित आहेत. या ठिकाणी सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले. मात्र ही पाईपलाईन हिमगिरी नगरापर्यंतच येऊन काम अर्धवट राहिले आहे. अनेकवेळा महापालिकेत तक्रार करण्यात आली. नगरात नळ, ड्रेनेज व पोलची सुविधा करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आले. पण बजेट नसल्याचे सांगण्यात येते.

आजपर्यंत ट्रॅक्टरव्दारे पाणीपुरवठा केला जातो. असे किती दिवस चालणार अशी विचारणा करत महिलांनी जनता दरबारात महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांचे लक्ष वेधून घेतले. या भागातील विविध विकास कामे तातडीने करण्यात यावीत अन्यथा महापालिकेवर मोर्चा आणण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी विविध नगारांमधील अंबिका देवकर, सुवर्णा विटकर, रेखा पवार, कमलाबाई पवार, आसमा शेख, मुमताज सय्यद, सविता बंदपट्टे, अन्नपूर्णा देशमुख, कमळाबाई मंजुळकर, महादेवी जाधव, अंबाबाई पवार, यल्लमा अलकुंटे, सुनिता बटोने, सुशाबाई केंगरे, वनमाला बंदपट्टे, लक्ष्मी शिंदे, सुनिता चौगुले आणि चंदा शिंदे आदी महिला उपस्थित होत्या.

## नतमस्तक या मराठी चित्रपटाची पोस्टर लाँचद्वारे घोषणा

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

नवनवीन विषयांवरील प्रयोगशील चित्रपटांची थोर परंपरा लाभलेल्या मराठी सिनेसृष्टीत आणखी एका अनोख्या विषयावर आधारलेला चित्रपट बनविण्यात येत आहे. समाजाभिमुख चित्रपटांना नेहमीच प्रेक्षकांचा कौल मिळाला आहे. त्यामुळेच समाजाला आरसा दाखविणाऱ्या चित्रपटांची निर्मिती होत असते. नुकतीच घोषणा करण्यात आलेला नतमस्तक हा मराठी चित्रपट याच वाटेवरील पुढचे पाऊल आहे. या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळेल याची उत्सुकता वाढविण्याचे काम पोस्टर करीत आहे.निर्माते रमेश वामनराव शिंदे यांनी आर. एस. गोल्डन ग्रुप मुव्ही मेकर्सच्या बॅनरखाली नतमस्तक चित्रपटाची निर्मिती केली आहे. रमेश शिंदे यांची ही पहिलीच चित्रपट निर्मिती आहे. महेश रावसाहेब काळे याचे दिग्दर्शन करीत आहेत. दिग्दर्शक महेश काळे यांच्याबाबत सांगायचे तर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या रुपया या लघुपटाने राष्ट्रीय पुरस्कारावर मोहोर उमटवली आहे. याखेरीज त्यांच्या घुमा चित्रपटाने महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार पटकावला आहे. ललित प्रभाकर अभिनीत टर्री या टेरबाज मराठी चित्रपटानंतर काळे यांचा नतमस्तक हा एका वेगळ्या विषयावरील चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-24. तारीखः 18.11.2025. DRM(ST) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि इंडला अध्यक्षांच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ठेकेदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेः- कामाचे नाव त्याच्या परिसरासहः मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात सर्ज प्रोटेक्शन डिव्हाइसेसची तरतूद आणि पृथ्वी कनेक्शनचे बंधन असलेल्या ST प्रतिष्ठानांमधील मातीचे अपग्रेडेशन आणि संवर्धन. कामाची अंदाजे किंमतः 4,65,94,816.74/-. निविदा किंमत फॉर्मः शून्य. जमा करावयाची बयाणा रक्कम रू. 3,83,000/-. काम पूर्ण होण्याचा कालावधीः 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळः 10.12.2025 15.30 तासांनतर. तपशील आयरेप्स वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती जर काही असेल तर ते फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केले जातील, फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/ पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आणि ते www.ireps.gov वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (EMD) च्या देयकात फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या

Akar/Sur-72 — DRM-ST शाखा CR, सोलापूर

तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-25. तारीखः 18.11.2025. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने DRM(ST) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर रॉलवेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहेः- त्याच्या परिसरासह कामाचे नावः मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील वाडी जंक्शन आणि सोलापूर स्टेशनवर MSDAC ची ड्युअल डिटेक्शन म्हणून तरतूद. कामाची अंदाजे किंमतः 15,62,85,667.11/-. निविदा फॉर्मची किंमतः शून्य. जमा करायची बयाणा रक्कमः 9,31,400/-. काम पूर्ण करण्याचा कालावधीः 12 महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः 12.12.2025 15.30 तासानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील, फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. पेमेंट ऑफ अर्नेस्ट मनी (EMD) फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

Akar/Sur-71 — DRM-ST शाखा CR, सोलापूर

तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**IDFC FIRST Bank Limited**

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 85664836 | मालमत्तेवर कर्ज | १. अमर दादासाहेब यादव<br>२. अनुजा अमर यादव | 30/10/2025 | रुपये 8,82,165.22/- |

**मालमत्तेचा पत्ता :** जीपी मिलकत क्रमांक ७३/१, त्याचा जुना नंबर ७३, परिसर ११७८ चौ. फूट, उपविभाग पंढरपूर, पुलुजवाडी, सोलापूर, महाराष्ट्र, आणि सदर मालमत्तेची सीमा पूर्वः मिलकट क्रमांक ७२, पश्चिमः रस्ता, उत्तरः रस्ता, दक्षिणः मिलकट क्रमांक ८० अशी आहे.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 120044940 | मालमत्तेवर कर्ज | १. श्रीराम पंडीत वाघमारे<br>२. पंडीत सोपान वाघमारे | 24/10/2025 | रुपये 7,91,675.82/- |

**मालमत्तेचा पत्ता :** दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, ज्याचे क्षेत्रफळ ९००.०० चौ.फूट आहे, एकूण बांधलेले क्षेत्रफळ ९००० चौ.फूट आहे, गोपाळपूर गावात स्थित आहे, तालुकाः पंढरपूर, जिल्हाः सोलापूर आणि ग्रामपंचायत गोपाळपूरच्या रजिस्टरमध्ये मालमत्ता क्रमांक १७८/२ मध्ये नोंदणीकृत आहे, एकूण जमीन क्षेत्रफळ २००० चौ.फूट आहे आणि सीमा अशी आहेः - पूर्वः रस्ता, पश्चिमः आनंदा माने, उत्तरः रस्ता, दक्षिणः वासुदेव कोळी

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 125345746 | मालमत्तेवर कर्ज | १. उमेश बाळू गायकवाड<br>२. नंदाबाई बाळासाहेब गायकवाड | 30/10/2025 | रुपये 7,36,035.80/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत चाळेच्या रजिस्टरमध्ये मालमत्ता क्रमांक ५७० मध्ये नोंदणीकृत घर/मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ २००० चौरस फूट आणि दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ १२०० चौरस फूट आहे, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १२००.०० चौरस फूट, गावः चाळे, उपविभागः पंढरपूर, विभागः सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे स्थित आहे आणि पूर्वः किसन माने, पश्चिमः बालाजी वाघमारे, उत्तरः रस्ता, दक्षिणः अतुल बर्डे

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : १९/११/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

**जाहिर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली ता. २२/१२/२०२५
क्रि. अर्ज नं. २७६/२०२१

**बार्शी येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

**कल्याण सोमनाथ शिंदे,** वय ४२ वर्षे,
धंदा-शेती, रा. तांदुळवाडी, ता. बार्शी,
जि. सोलापूर -- **अर्जदार**

**विरुध्द**

**ग्रामपंचायत मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी** -- **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हा त्याचे आई बाई सोमनाथ शिंदे हिचेसह मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी येथील घरी राहत होती. अर्जदाराची आई बाई सोमनाथ शिंदे या दि. २०/१०/२०१८ रोजी अर्जदाराचे मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी येथील राहते घरी मयत झाली. अर्जदाराचे आईची देखभाल अर्जदार हाच करत होता व सदर बाई सोमनाथ शिंदे मयत झालेवर तिचे मृत्यूची नोंद रितसर सा.वाला तांदुळवाडी, ता. बार्शी ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिष्टरला करावी. परंतु अर्जदार व त्याचे कुटूंबातील व्यक्तीचे अडाणीपणामुळे सदर मृत्यूची नोंद सा. वालाचे जन्म मृत्यूचे रजिष्टरला झाली नाही, अर्जदारानेहि आजपावेतो त्याबाबत चौकशी केली नाही परंतु हल्ली अर्जदारास त्याचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता आईचे मृत्यूचे दाखल्याची गरज भासलेने अर्जदाराने सा.वाला ग्रामपंचायतीकडे तशी मृत्यूचे दाखल्याची मागणी केली असता सदर तांदुळवाडी ग्रामपंचायतीने त्यांचेकडील उपलब्ध रजिष्टरचा शोध घेतला परंतु त्यांना बाई सोमनाथ शिंदे यांचे मृत्यूची नोंद केली गेलेचे दिसून आले नाही म्हणून त्यांनी दाखला/पत्र दिले. अशाप्रकारे अर्जदाराची आई बाई सोमनाथ शिंदे ही मौजे तांदुळवाडी, ता. बार्शी येथे राहते घरी ता. २०/१०/२०१८ रोजी मयत होवूनहि त्यांचे मृत्यूचा दाखला मिळत नाही त्यास्तव बाई सोमनाथ शिंदे यांचे मृत्यूची सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिष्टरला करणेबाबत त्यांना मे. कोर्टाचे जरुर ते आदेश व्हावेत असे कथन करुन अर्जदारानी हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे कांही आक्षेप असतील तर संबंधीतानी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीखेस मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर में कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण, आमचे सहीनिशी व में कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. १७/११/२०२५

सही/- कनिष्ठ लिपीक, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी
सही/- सहा. अधिक्षक, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी

**जाहिर प्रसिध्दीकरण**

दि.कि. अर्ज नं. ११७/२०२५
पुढील नेमलेली दि. २०/१२/२०२५
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात (४ थे कोर्ट)**
**(मा. आर.पी.बागडे सो)**

१) **समाधान बाबु उर्फ बाबुराव यादव,** वय-३७ वर्षे, धंदा- शेती, रा. कारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **मंगल बाबुराव उर्फ बाबुशा यादव,** वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर
३) **निर्मला बाळु जगदाळे** वय-३९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर
४) **दैवशाला रमेश सारंग,** वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. चौंडेश्वरी कराड, ता. कराड, जि. सातारा -- **अर्जदार**
५) **रेश्मा राजेंद्र काशीद,** वय-३४ वर्षे धंदा-घरकाम, रा. सदर
६) **सिमा किसन देशमुख,** वय-३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गायकवाड गल्ली मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर
७) **अर्चना समाधान देशमुख,** वय-३२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

**विरुध्द**

कोणीही नाही -- **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. १,३ ते ७ यांचे वडिल बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव हे दि. ३०/११/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. तसेच मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांची आई अनुसया ज्योती यादव हे देखील दि. ०१/०८/२००७ रोजी मयत झालेली आहेत. व वडिल ज्योती मारुती यादव हे पूर्वीच मयत झालेले आहेत. यातील मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता गेले असता त्यांना मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांचे वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले असता यातील अर्जदार यांनी वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत बाबु उर्फ बाबुराव ज्योती यादव यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २०/१२/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. १२/११/२०२५

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी
शिक्का
सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क स्तर बार्शी

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रणजी सामन्यात विदर्भाचा विजय निश्चित

## अतित सेठचे ५ • दर्शन नळकांडेचे ४ बळी • यश राठोडचे शतक हुकले

◆ **नागपूर, १८ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत एलिट अ गटात बडोदाविरुद्धच्या सामन्यात तिसऱ्या दिवशी गोलंदाजांचे वर्चस्व राहिले. मंगळवारी दिवसभरात १२ फलंदाज बाद झाले. त्यात बडोद्याच्या अतित सेठने ५ आणि विदर्भाच्या दर्शन नळकांडेने ४ असे सर्वाधिक गडी बाद केले. तिसऱ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा बडोदा संघाने ५ गडी गमावून ७३ धावा केल्या होत्या. त्यांना विजयासाठी २०३ धावांची गरज असून, सामन्यावर विदर्भाचे वर्चस्व आहे. सामन्यात विदर्भ विजयाच्या समीप आहे. यश राठोडचे थोडक्यात शतक हुकले. त्याने ९१ धावा केल्या.



शंभर धावांची भागीदारी करून विदर्भाला मजबूत स्थितीत आणणारे यश राठोड आणि रविकुमार समर्थ

तिसऱ्या दिवशी विदर्भाचे यश राठोड नाबाद १५ आणि रविकुमार समर्थ नाबाद ८ यांनी खेळ सुरू केला. काल विदर्भाची ३ बाद १२६ धावसंख्या होती. या दोघांनी शंभर धावांच्या वर भागीदारी केली. विदर्भाची धावसंख्या २३१ असताना रविकुमार समर्थला (४५) राज लिम्बानीने बाद केले. १२ धावांची भर पडताच त्याचा सहकारी यश राठोड ९१ धावांवर बाद झाला. त्याला भार्गव भटने बाद केले. त्यानंतर विदर्भाचे खेळाडू ठरावीक अंतराने बाद होत गेले. कर्णधार अक्षय वाडकर फार प्रभावी कामगिरी करू शकला नाही. तो १० धावा काढून अतित सेठचा बळी ठरला. ९ धावांची भर पडताच पार्थ रेखडे अतितच्या गोलंदाजीत बाद झाला. पार्थने १२ धावा केल्या. तोपर्यंत विदर्भाच्या ७ बाद २६६ धावा होत्या. त्यानंतर याच धावसंख्येवर नचिकेत भुते आणि दर्शन नळकांडे बाद झाले. त्यामुळे विदर्भाचे मोठी धावसंख्या उभारण्याचे स्वप्न भंगले. प्रफुल्ल हिंगे ५ धावा काढून बाद झाला आणि विदर्भाचा डाव २७२ धावांवर संपला. गणेश भोसले शून्य धावांवर नाबाद होता. बडोदाकडून राज लिम्बानी, निनाद राथवा आणि महेश पिटीया यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. अतित सेठने ४७ धावांत ५ आणि भार्गव भटने ६५ धावांत २ गडी बाद केले.

विदर्भाच्या २७६ धावांचे लक्ष्य गाठताना बडोदा संघाची दमछाक झाली. विदर्भाच्या गोलंदाजांनी बडोद्याच्या फलंदाजांना रोखून ठेवले आणि त्यांचा अर्धा संघ ७३ धावांत गुंडाळला. बडोदाचे सलामीवीर ज्योत्सनील सिंग आणि शिवलिक शर्मा यांना दर्शन नळकांडेने आल्यापावली बाद केले. ज्योत्सनीलने १ आणि शिवलिक शर्मा शून्यवर बाद झाला. त्यानंतर आलेला सुकीर्त पांडे खेळपट्टीवर तग धरू शकला. तो ३५ धावांवर नाबाद होता.

शाश्वत रावत शून्य, विष्णू सोळंकी ४ धावांवर बाद झाले. त्यांनाही दर्शन नळकांडेने बाद केले. मितेश पटेलला पार्थ रेखडेने १६ धावांवर बाद केले. विदर्भाच्या गोलंदाजांसमोर बडोदाच्या फलंदाजांनी शरणागती पत्करल्याचे दिसत होते. खेळ थांबला तेव्हा सुकीर्त पांडे ३५ आणि निनाद राथवा १० धावांवर नाबाद होते. विदर्भाकडून दर्शन नळकांडेने ७ धावांत ४ आणि पार्थ रेखडेने १९ धावांत १ गडी बाद केला. उद्याचा सामन्याचा चौथा दिवस असून विदर्भ किती लवकर बडोद्याचे फलंदाज बाद करून सामना जिंकतो याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# सात्त्विक-चिराग दुसऱ्या फेरीत

## त्रिशा जॉली, गायत्री गोपीचंद पराभूत • ऑस्ट्रेलियन ओपन सुपर बॅडमिंटन

◆ **सिडनी, १८ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश करण्यासाठी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय पुरुष दुहेरीच्या स्टार जोडीने उत्कृष्ट कामगिरी केली. सात्त्विक-चिरागने पहिल्या फेरीत चायनीज तैपेईच्या चांग को-ची आणि पो ली-वेईवर सरळ गेममध्ये विजय मिळवला. जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या भारतीय जोडीने को-ची आणि पो ली-वेई विरुद्धच्या ४८ मिनिटांच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात २५-२३, २१-१६ असा विजय मिळवला.

सुरुवातीच्या सामन्यात एका टप्प्यावर सात्त्विक आणि चिरागची अव्वल मानांकित जोडी २-६ अशी पिछाडीवर होती. चुरशीची स्पर्धा झाली, परंतु चिनी तैपेई जोडीने १६-१४ पर्यंत कमी आघाडी कायम ठेवली. भारतीय जोडीने १९-१७ अशी आघाडी मिळवण्यासाठी परत झुंज दिली, परंतु नंतर सामना रोमांचक झाला. त्यानंतर दोन्ही संघांनी गेम पॉइंट्सची देवाणघेवाण केली, परंतु भारतीय जोडीने अखेर त्यांचा तिसरा गेम रूपांतरित केला. दुसऱ्या गेमच्या सुरुवातीला सात्त्विक आणि चिरागने ७-४ अशी आघाडी घेतली, परंतु तैवानच्या जोडीच्या दोन नेट चुका आणि एका शक्तिशाली स्मॅशमुळे त्यांना बरोबरी साधता आली. भारतीय जोडीने मध्यांतराला एका गुणाची आघाडी घेतली. त्यानंतर त्यांनी आपली आघाडी कायम ठेवली आणि सामना जिंकला.

महिला दुहेरीत, तथापि, त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांचा पहिला सामना इंडोनेशियन जोडी एफ. कुसुमा आणि एम. पुष्पितसारी यांच्याकडून १०-२१, १४-२१ असा पराभव झाला. भारतीय एकेरी खेळाडू लक्ष्य सेन, एच. एस. प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत आणि आयुष शेट्टी बुधवारी त्यांच्या मोहिमेला सुरुवात करतील. *(वृत्तसंस्था)*

## लिटल फ्लावर स्कूलची कादंबरी पाटीलची महाराष्ट्र राज्य फुटबॉल संघात निवड

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**



दिमापूर (नागालँड) येथे होणाऱ्या डॉ. तेलिमेरन एओ ज्युनिअर मुली राष्ट्रीय फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी येथील लिट्ल फ्लावर स्कूलची कादंबरी संतोष पाटील हिची निवड झाली. तिचे सोलापूर शहर व जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे सेक्रेटरी प्रा.डॉ. किरण चौगुले सर, किरण(पप्पू) दुस्तकर, प्रशालेचे मुख्याध्यापिका सिस्टर सिलीन कराकट, क्रीडाशिक्षक प्रसेनजीत सुर्यवंशी यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सिद्धेश्वर कन्याच्या अंकिता रंगदळाला तलवारबाजी स्पर्धेत दुहेरी मुकुट

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**



येथील सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या इयत्ता सहावीतील अंकिता रंगदळ हिने राज्य तलवारबाजी स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात प्रशालेतील कास्यपदक प्राप्त केले. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ राजशेखर येळीकर, ॲड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

## सोलापूरची आर्या उमाप २३ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**



बीसीसीआय अंतर्गत होणाऱ्या टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी २३ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात येथील आर्या उमापची निवड झाली.२४ नोव्हेंबरपासून विजयवाडा येथे होणाऱ्या स्पर्धेत ती भाग घेईल. तिचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील, व्हा. चेअरमन श्रीकांत मोरे, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख व संयुक्त सेक्रेटरी धैर्यशील मोहिते पाटील आणि चंद्रकांत रेंबर्सु, स्नेहल जाधव, किरण मणियार, सारिका कुरुलकर, मानसी जाधव यांनी अभिनंदन केले.

## व्हॅलेंटाईन स्कूलची शरण्या मादासची सोलापूर जिल्हा कबड्डी संघात निवड

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**



पूणे येथे झालेल्या किशोर किशोरी अजिंक्यपद स्पर्धेमध्ये व्हॅलेंटाईन सर्कल स्कूल व श्रीराम स्पोर्ट्स क्लबची शरण्या मादास हिची सोलापूर जिल्हा कबड्डी संघात निवड झाली. तिला क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा यांनी अभिनंदन केले.

## सोजर 'फार्मसी'च्या पवन सुरवसेला दुहेरी मुकुट

**बार्शी, दि. १८ नोव्हेंबर-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत विभागीय क्रीडा स्पर्धेत सोजर कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी पवन विलास सुरवसे याने १५०० मीटर धावणे व ५००० मीटर धावणे या स्पर्धेत भाग घेऊन या दोन्ही स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे पंढरपूर येथे ही स्पर्धा झाली. त्यास क्रीडाशिक्षक प्रा. रणजीत शेळके यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे, संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले व सचिवा कल्पनाताई बारबोले यांनी अभिनंदन केले.



# मेहता शाळेत क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

कै. वि. मो. मेहता शाळेत क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन पोतदार पॅथॉलॉजी लॅबचे संचालक, डॉ. नीलकंठ पोतदार यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी स्नेहल महाजन यांनी केले. प्रास्ताविक व सत्कार मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या हस्ते झाले. पाहुण्यांचा परिचय स्वामिनी पवार हिने केला. ज्योत व क्रीडा साहित्याचे पूजन करण्यात आले. क्रीडा प्रमुख अमित कोर्टीकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ढोल वाद्यांच्या व टाळ्यांच्या गजरात प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. सृष्टी लिंगडे हिने निरनिराळ्या खेळांची उत्कृष्ट माहिती सांगितली. ध्रुव रोटे याने क्रीडा प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेतली. कार्यक्रमाची सांगता सोहम पुजारी याच्या आभार प्रदर्शनाने झाली.

# डॉ. आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या बुद्धिबळ स्पर्धेस सुरुवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेर यांच्या विद्यमाने आयोजित इंटर झोनल बुद्धिबळ स्पर्धेस येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरवात झाली. यात सोलापूर जिल्ह्यातील २५ महाविद्यालयांनी भाग घेतला आहे. याचे उद्घाटन पोलिस अधिक्षक विजयलक्ष्मी कुरी यांच्या हस्ते झाले. यावेळी भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल के देशमाने, सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य सचिन गायकवाड, झोनल स्पोर्ट्स अध्यक्ष सोलापूर प्रो. शिवशरण कोरे, आंतरराष्ट्रीय चेअरमन पंच सुमुख गायकवाड, जिमखाना चेअरमन प्रो. अमित वडवेराव, पंच उदय वगैरे, निवड समिती रोहित पवार आदी उपस्थित होते. विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अध्यक्ष इंजीनियरिंग रवींद्र डी गायकवाड, सेक्रेटरी अनामिका रवींद्र गायकवाड, अभिनंदन केले.



## इरा स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१८ नोव्हेंबर-**

जेऊर येथील इरा पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. जेऊरचे गावचे क्रीडा संघटक नितीन शेळके व इरा पब्लिक स्कूल चिकलठाणची धनुर्विद्या खेळाडू श्रद्धा उमेश बोराडे, रमेश बोराडे, संस्थेचे सचिव सुनिल अवसरे, श्री. पठाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# बीडमध्ये राज्य खो-खोचा महासंग्राम रंगणार १८ ते २१ डिसेंबरला : डॉ. चंद्रजित जाधव

### राष्ट्रीय संघ निवडीसाठी खेळाडूंची उत्सुकता शिगेला

**मुंबई, १८ नोव्हेंबर-**



महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि बीड अमेच्युअर खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली ६१ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा १८ ते २१ डिसेंबर दरम्यान बीडमध्ये रंगणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस व नवनिर्वाचित महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सहयोगी उपाध्यक्ष डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.

राज्यातील सर्वोत्तम खेळाडूंचा खो-खो कौशल्यदंगल श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड येथे पार पडणार आहे. बीड येथे होणाऱ्या या महत्त्वाच्या राज्य स्पर्धेतून ५८ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा पुरुष व महिला संघ निवडला जाणार आहे. निवडलेला संघ हैद्राबाद, तेलंगणा येथे होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे.

खो-खो महासंघाकडे नोंदणी केलेले खेळाडूच या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठीचे प्रवेश अर्ज नमुना व गणवेश क्रमांकानुसार यादीचे नमुने १ डिसेंबर २०२५ पासून अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील. राज्य संघटनेकडून देण्यात आलेल्या निर्धारित फॉर्ममध्ये माहिती भरून १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत . या मेलवर पाठवणे बंधनकारक आहे. हाताने लिहिलेल्या प्रवेशिका ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

या स्पर्धेमुळे बीडच्या क्रीडा संस्कृतीला नवा जोश आणि वेग मिळणार असून, राज्यभरातील अव्वल खेळाडूंमध्ये रोमांचक लढती पाहायला मिळणार असल्याचे सरचिटणीस डॉ. जाधव यांनी सांगितले.



## ज.रा. चंडकच्या लिगाडे बंधूची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

बाळे येथील ज.रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संकेत व रितेश लिगाडे बंधूची शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. येथील मार्कंडेय तलावावर झालेल्या राज्य स्पर्धेतील कामगिरीवर त्यांची निवड झाली. यशस्वी खेळाडूंचा संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक मोहन घोडके, क्रीडा शिक्षक दशरथ गुरव, क्रीडा शिक्षिका शेख आदी उपस्थित होते.

**राज्य कामगिरी** : १७ वर्षांखालील : संकेत लिगाडे (१ व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड प्रथम, हायबोर्ड तृतीय). १९ वर्षांखालील : रितेश लिगाडे ( हायबोर्ड द्वितीय, १ मीटर व ३ मीटर स्प्रिंग बोर्ड तृतीय)





# सिंहगड पब्लिक स्कूलचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील वार्षिक क्रीडा दिन उत्साहपूर्ण साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या नृत्य, योगा व ड्रिल सादरीकरणाने कार्यक्रमाला रंगत आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक महादेव राऊत तर अध्यक्ष म्हणून कॅम्पस डायरेक्टर संजय नवले उपस्थित होते. प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या सत्कारानंतर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि आकर्षक मार्च पास्टनंतर क्रीडा मशाल प्रज्वलन करून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, योगासन, व्यायाम ड्रिल आणि पिरॅमिड सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि आकर्षक मार्च पास्टसह क्रीडा प्रतिज्ञा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या दमदार पावलांनी मैदान दुमदुमून गेले. यानंतर पारंपरिक क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. शिस्तबद्ध संचलनाने उपस्थित प्रेक्षकांना अभिमान वाटावा अशी क्रीडा परंपरा विद्यार्थ्यांनी उभारली.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयाची विविध क्रीडा स्पर्धेत कामगिरी





**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथील खेळाडूंनी विविध ठिकाणी झालेल्या आंतर महाविद्यालयीन विविध क्रीडा स्पर्धांमध्ये कामगिरी केली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक प्रा. संभाजी कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थापक अध्यक्ष सुभाष देशमुख, अध्यक्ष रोहन देशमुख, सचिव डॉ. अनिता ढोबळे आणि



प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

**कामगिरी** : मैदानी : महांगडे (१०० व २०० मीटर धावणे सुवर्ण), पल्लवी भोसले (८०० मीटर धावणे, कांस्य). ४ बाय १०० मीटर रिले मुली तृतीय ( वैष्णवी जाधव, खुणे अंजली, कुर्डे सायली आणि भोसले पल्लवी). कुस्ती : सुरज जवळगे (६५ किलो, रौप्य), प्रतिक शिंदे (राज्य इंद्रधनुष्य स्पर्धेत महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संघाचे शास्त्रीय तबलावादन आणि लोकसंगीत तालवाद्य या प्रकारात प्रतिनिधित्व).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नूतन विद्यालयात भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वृक्षारोपन

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

आष्टी येथील नूतन विद्यालय येथे श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्ष प्रारंभानिमित्त वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाने भाऊसाहेबांना अभिवादन करण्यात आले. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचे सन २०२५ हे जन्म शताब्दी वर्ष. नूतन विद्यालयात दरवर्षी प्रमाणे प्रथम भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व ज्ञानज्योतीची समई लावून कार्यक्रमाची सुरुवात झाली. नंतर प्रशालेच्या प्रांगणात इयत्ता पाचवी ते दहावी च्या विद्यार्थी व वर्गशिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. प्रत्येक वर्गाला एक वृक्ष दत्तक देऊन वृक्ष संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली. तसेच प्रशालेच्या आवारात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी शेटफळ केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर माने, प्रशालेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सांगोल्यात अध्यक्षपदाचे ७ तर सदस्यपदाचे ७८ अर्ज अपात्र

**अध्यक्षपदाचे २४ तर सदस्यपदांचे २६१ अर्ज वैध**

**सांगोला, दि.१८ नोव्हेंबर -**

सांगोला नगरपरिषदेसाठी अध्यक्षपदासाठी ३१ व सदस्यपदासाठी प्राप्त ३३९ अर्जांची मंगळवार दि.१८ नोव्हेंबर छाननी झाली. त्याम ध्ये अध्यक्षपदाचे ३१ पैकी ७ तर सदस्यपदाचे ३३९ पैकी ७८ अर्ज अपात्र ठरले. त्यामुळे अध्यक्षपदासाठी २४ तर सदस्यपदासाठी २६१ अर्ज पात्र झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली. सदस्यपदासाठी प्रभाग क्र.१ अ मध्ये १० अर्जापैकी ७ पात्र तर ३ अपात्र, १ ब मध्ये १३ अर्जापैकी ११ पात्र तर २ अपात्र, प्रभाग क्र.२ अ मध्ये १४ अर्जापैकी ११ पात्र तर ३ अपात्र, २ ब मध्ये २० अर्जापैकी १४ पात्र तर ६ अपात्र, प्रभाग क्र.३ अ मध्ये ११ अर्जापैकी ११ पात्र, ३ ब मध्ये १८ अर्जापैकी १४ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.४ अ १२ अर्जापैकी ९ पात्र तर ३ अपात्र, ४ ब मध्ये १६ अर्जापैकी १२ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.५ अ मध्ये १५ अर्जापैकी १२ पात्र तर ३ अपात्र, ५ ब मध्ये १२ अर्जापैकी ९ पात्र तर ३ अपात्र, प्रभाग क्र.६ अ मध्ये ११ अर्जापैकी ६ पात्र तर ५ अपात्र, ६ ब मध्ये १४ अर्जापैकी ११ पात्र तर ३ अपात्र, प्रभाग क्र.७ अ मध्ये १८ अर्जापैकी १४ पात्र तर ४ अपात्र, ७ ब मध्ये १३ अर्जापैकी १० पात्र तर ३ अपात्र, प्रभाग क्र.८ अ मध्ये ११ अर्जापैकी ९ पात्र तर २ अपात्र, ८ ब मध्ये १६ अर्जापैकी १२ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.९ अ मध्ये १७ अर्जापैकी १३ पात्र तर ४ अपात्र, ९ ब मध्ये १२ अर्जापैकी ११ पात्र तर १ अपात्र, प्रभाग क्र.१० अ मध्ये १९ अर्जापैकी १२ पात्र तर ७ अपात्र, १० ब मध्ये २६ अर्जापैकी २२ पात्र तर ४ अपात्र, प्रभाग क्र.११ अ मध्ये १० अर्जापैकी ७ पात्र तर ३ अपात्र, ११ ब मध्ये ९ अर्जापैकी ७ पात्र तर २ अपात्र, ११ क मध्ये २२ अर्जापैकी १७ पात्र तर ५ अपात्र असे एकूण ११ प्रभागातून दाखल झालेल्या ३३९ अर्जापैकी २६१ अर्ज पात्र झाले असून ७८ अर्ज अपात्र झाल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

### अक्कलकोट नगराध्यक्षपदाचे ४ तर नगरसेवकपदाचे ६० अर्ज अवैध

**अक्कलकोट दि १८ नोव्हेबर-**

अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेले चार जणांचे नामनिर्देशन पत्र अवैध झाले असून नगरसेवकपदासाठी एकूण ६० अर्ज अवैध ठरले आहेत.

येथे नगराध्यक्षपदासाठी एकूण ११ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. तर नगरसेवकपदासाठी १४३ उमेदवारानी अर्ज दाखल केले होते. या दाखल केलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी अक्कलकोट नगर परिषद कार्यालयात मंगळवारी करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षपदासाठी अकरा पैकी चार उमेदवारांचे अर्ज हे अवैध ठरले आहेत. तर नगरसेवक पदासाठी दाखल करण्यात १४३ उमेदवारी अर्जापैकी ६० जणांचे अर्ज हे अवैध ठरले आहेत. जोडपत्र एक व दोन सोबत जोडलेले नसल्याने, जोडपत्र दोन मध्ये पर्यायी उमेदवार म्हणून नमूद व पाच सूचक जोडलेले नाही, अर्धवट भरण्यात आलेले आहे शेवटी स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, बँक खात्याचा तपशील जोडलेला नाही, शौचालयाचा दाखला प्रमाणपत्र जोडलेला नाही, नगरपरिषद ठेकेदार नसल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही , नगरपरिषद थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, दुबार सुचक तसेच पक्षाच्या वतीने जोडपत्र एक व दोन सादर केलेले नाही असे उमेदवारी अर्ज हे अवैध ठरविण्यात आले आहेत.

**नगराध्यक्षपदासाठी अवैध ठरलेले अर्ज** : सुनील कटारे, एजाज बळोरगी, गौरी कल्याणशेट्टी ,महेश हिंडोळे.

**नगरसेवक पदासाठी अवैध ठरलेले अर्ज** : महानंदा स्वामी, राजेसाहेब शेळके, वर्षा चव्हाण, सिकंदर चाऊस, मानसी जाधव, सोनाली धनशेट्टी, कविता आळवीकर, शितल भांडेकर, सोनाली धनशेट्टी, स्वामीनाथ चौगुले, अंकुश चौगुले, अशोक जाधव, विजय आळवीकर ,कस्तुरा चौगुले , एजाज बळोरगी, रफिक बेपारी, शबाना शेख, कल्लाप्पा मोरे, दत्ता मडीखांबे, सुवर्णा घोडके, सखुबाई घोडके, पल्लवी कटारे, भागुबाई कुंभार, शैलेश राठोड, नवनीत राठोड, रमेश कापसे, मोहसीन मोकाशी, करीम शेख, ऐश्वर्या शिंदे, एजाज अरब, पल्लवी कटारे ,अनिरुद्ध धोंगडे, सुनिता आळगी, नुरद्दीन इस्माईल बागवान, मजहर मुजावर, मुजाहिद बागवान, गीताबाई शिंदे, युगंधरा हरवाळकर, मुमताज बागवान , सुनंदा भकरे, शकुंतला रोडगे, सुनंदा स्वामी, रामचंद्र समाने, श्रीशैल इचगे, राजेंद्र थंब, पुनम गायकवाड, छाया जाधव, वैशाली पाटील, चांदसाब खिस्तके, भाग्यश्री देविदास कवटगी, ज्योती जरीपटके, सोनाली मोरे, रामेश्वर पाटील, सिद्धाराम पाटील, राहुल बकरे, लक्ष्मण जमगे 'रविकांत मंगरूळे, महेश हिंदोळे केदार कवटगी

# अनगरमध्ये राष्ट्रवादीच्या उज्ज्वला थिटे यांचा अर्ज छाननीत अवैध

## अर्जावर नाही सूचकाची सही; आता नगराध्यक्षाची दुरंगी लढत

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१८ नोव्हेंबर-**

राज्यात गाजत असलेल्या अनगर नगरपंचायतीच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी (अप) पक्षाच्या उमेदवार उज्वला थिटे यांच्या उमेदवारी अर्जावर सूचकाची सही नसल्यामुळे तो अर्ज छाननीमध्ये बाद करण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी सांगितले.

अनगर नगरपंचायतीची नगराध्यक्षपदाची लढत तिरंगी नाही तर दुरंगी होणार आहे. उद्या बुधवारी १९ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी नगराध्यक्षपद बिनविरोध होणार की दुरंगी सामना होणार हे स्पष्ट होणार आहे. उज्वला थिटे यांनी काल कमांडो आणि पोलीस संरक्षणात आपला उमेदवारी अर्ज अखेरच्या दिवशी दाखल केला होता. आज अनगर



नगरपंचापतीसाठी दाखल करण्यात आलेल्या सर्व अर्जांची निवडणूक निर्णय अधिकारी तथा मोहोळचे तहसीलदार मुळीक यांनी छाननी केली असता थिटे यांच्या अर्जावर सूचकाची सही नसल्यामुळे तो अर्ज बाद करण्यात आला. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठीचा सामना दुरंगी होणार की उद्या अर्ज मागे घेतला जाणार हे चित्र स्पष्ट होणार आहे. नगराध्यक्षपदासाठी प्राजक्ता अजिंक्यराणा पाटील व सरस्वती शिंदे यांचे अर्ज वैध ठरले आहेत .अनगर नगरपंचायतीच्या निवडणूकीबाबत १७ प्रभागासाठी १८ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. प्रभाग ५ मध्ये सागर नरहरी गुंड यांनी भाजपाकडून अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला ,तर याच प्रभागामधून जयराम बोडके यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. उर्वरीत १६ प्रभागा मधून १६ च उमेदवारी अर्ज आल्याने व त्यांची आज छाननी झाल्यानंतर १६ नगरसेवक बिनविरोध झाले आहेत.

मात्र प्रभाग ५ मधील दोन्ही उमेदवारांचे अर्ज छाननीमध्ये वैध झाले आहेत. उद्यापासून अर्ज माघारी घेण्यास सुरुवात होत असून प्रभाग ५ बिनविरोध होणार की निवडणूक लागणार हे मुदत संपल्यानंतर स्पष्ट होणार आहे.



# करकंब परिसरातील २५ स्कूल बसची तपासणी

**सहा बस पोलिस ठाण्यात; सव्वा लाखांचा दंड वसूल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विशेष पथकाने करकंब परिसरातील २५ स्कुल बसची तपासणी करण्यात येऊन कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या ६ स्कुल बस पोलिस ठाण्यात अटकावून ठेवण्यात आल्या. यावेळी १ लाख २२ हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.

गेल्या आठवड्यामध्ये करकंब येथे एका स्कुल बसखाली सापडून शाळकरी मुलाचा मृत्यू झाला होता. या घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी बेकायदेशीररीत्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या स्कुल बसवर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सोमवारी करकंब परिसरातील विविध शाळांमध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या २५ स्कुल बसची तपासणी करण्यात आली. वाहन चालकाची अनुज्ञप्ती, वाहनाचा परवाना, योग्यता प्रमानपत्र, विमा प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र इत्यादी वैद्य कागदपत्रे नसलेल्या तसेच अवैध शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. दोषी आढळून आलेल्या वाहनावर सुमारे १ लाख २२ हजार रुपये दंड आकारण्यात आला. दोषी आढळून आ-लेली ६ वाहने पोलिस स्टेशन करकंब येथे अटकावून ठेवण्यात आली आहेत.

ग्रामीण भागात विविध भागातून शालेय विद्यार्थी वाहतूक होत असते. विद्यार्थी वाहतुकीसाठी शालेय विद्यार्थी वाहतूक नियम ावली २०११ नुसार पूर्तता असणे गरजेचे असते, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी नेरपगार यांनी सांगितले. सदर कारवाई मोटार वाहन निरीक्षक विशाल यादव, सहायक मोटार वाहन निरीक्षक बाळासाहेब सलगर, श्रीमती तेजस्विनी वायचळ यांनी पार पाडली.

# अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती

**करकंब येथे २३ वर्षानंतर वर्गमित्रांच्या भेटीगाठी; माजी विद्यार्थी स्नेहमेळावा**



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१८ नोव्हेंबर-**

करकंब (ता. पंढरपूर) येथील रामभाऊ जोशी हायस्कूलच्या २००१-०२ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी नजरेत मावलेली शालेय दुनिया अनुभवत व जुन्या आठवणींना उजाळा देत स्नेहमेळावा घेतला.

मेळाव्याची सुरूवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यावेळी प्राचार्य हेमंत कदम, करळे, अभंगराव, घुले, पुजारी, शिंदे, मळेगावकर, गायकवाड, गव्हाणे, पी.एस.कुलकर्णी, शिक्षिका शिंदे हे सर्व मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते. स्वतःची ओळख सांगताना प्रत्येकाने मनातील भावना व्यक्त केली.

आपला वर्ग, आपली बाकं, आपली धम्माल याविषयी सर्वांनी मनमोकळा संवाद साधला. सर्वांच्या उपस्थितीमुळे प्रेम, मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील आठवणी पुन्हा जिवंत झाल्या. शिक्षकेतर कर्मचारी कवीटकर, कांबळे, चौगुले, भंडारे हेही उपस्थित होते.

कविता, शाळेतील खोड्या सांगूत सगळ्यांना खळखळून हसवले,तर कोणी गाण्यांच्या ओळींनी त्या दिवसांची धडधड जागी केली. क्षणभर असे वाटले की घड्याळ मागे फिरले आहे.एकत्र बसून,एकत्र हसून, मैत्रीचे धागे पुन्हा घट्ट विणण्याचा संकल्प करत कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन झाले. शालेय जीवन संपले असेल, पण मनातली मैत्री अजूनही तितकीच जिवंत राहिली.

हा सोहळा मनात कायमचा कोरला गेला.अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती या ओळी आठवत सर्वांनी एकमेकांचा साश्रू नयनांनी निरोप घेतला.

# पंढरपुरात नगराध्यक्षाचे आठ तर सदस्यपदाचे ३२१ अर्ज मंजूर

**निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकपदासाठी ३६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्याची मंगळवार दि. १८ रोजी छाननी करण्यात आली. या छाननीत नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवकपदासाठी ३६६ दाखल उमेदवारी अर्जापैकी ३२१ मंजूर तर ३९ अर्ज नामंजूर करण्यात आले. तसेच ६ अर्जांवर आक्षेप घेण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी सोमवारी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांनी मोठी गर्दी केली होती. नगराध्यक्ष पदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी ३६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. दाखल झालेल्या या अर्जाची छाननी मंगळवार दि. १८ रोजी नगरपरिषद सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी दि.१९ ते २१ नोव्हेंबर हा कालावधी असेल. दि.२६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह वाटप व अंतीम उमेदवार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

### मोहोळमध्ये नगराध्यक्षाचे सहा तर सदस्यपदाचे ४५ अर्ज अवैध

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.१८ नोव्हेंबर-**

मोहोळ नगरपरिषद निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी १८ पैकी ६ अर्ज अवैध तर १२ अर्ज वैध ठरले आहेत . तर २०नगरसेवक पदासाठी १७० पैकी ४५ अर्ज अवैध तर १२५ अर्ज वैध ठरले आहेत. उद्या पासून अर्ज माघारी घेण्यासाठी १९ , २० व २१ असे तीन दिवस आहेत .त्यानंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे .

अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी अतिशय घडामोडी घडल्या यात शिवसेना शिंदेचे राज्याचे ओबीसी प्रमुख आणि मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर यांच्या अर्जाला शिवरत्न दीपक गायकवाड यांनी हरकत घेतली होती . त्यामध्ये उमेदवारी अर्ज भरताना त्यांनी गुन्हे दाखल असल्याची माहिती लपवली अशी हरकत घेण्यात आली होती .तथापि ही हर करत फेटाळण्यात आली .आणि श्री बारसकर यांचा अर्ज वैध ठरला .तर दुसऱ्या प्रमुख हरकतीमध्ये शिवसेना उभाठाचे युवा सेना जिल्हाप्रमुख महेश देशमुख यांनी त्यांच्याच पक्षाचे शहर प्रमुख विक्रम पंडितराव देशमुख यांना दिलेला पक्षाचा एबी फॉर्म अवैध असल्याचे सांगत मलाच म्हणजे महेश देशमुख यांनाच पक्षाने एबी फॉर्म दिला आहे असा दावा केला त्यानंतर दोन्ही बाजूंच्या वकिलाने युक्तिवाद केल्यानंतर महेश देशमुख यांची हरकत योग्य आहे योग्य आहे असा निर्णय दिल्याने विक्रम देशमुख यांना दिलेलेमशाल चिन्ह त्यांच्याकडून गेले आणि ते महेश देशमुख यांना मिळाले.

### श्रीशैल बिराजदार यांचे निधन

**अक्कलकोट, दि.१८ नोव्हेंबर-**



हालहळ्ळी (अ) (ता.अक्कलकोट) येथील श्रीशैल भिमशा बिराजदार (वय-६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, तीन भाऊ, तीन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे.

बुधवारी (दि.१९ नोव्हेंबर) रोजी सकाळी अकरा वाजता हालहळ्ळी(अ) येथील राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे.एमएसईबीचे निवृत्त अधिकारी विश्वनाथ बिराजदार यांचे ते लहान बंधू होत. पत्रकार रविकांत धनशेट्टी यांचे ते मामा होत.

# मंगळवेढ्यात हरकतीमुळे छाननी प्रक्रिया लांबली; निर्णय प्रलंबित

**अर्जाची छाननी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाली**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ नोव्हेंबर-**

आज दि.१८ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून छाननी सुरुवात झाली होती, यामध्ये प्रथम नगराध्यक्षपदासाठी अर्ज भरलेल्या उमेदवारांना बोलवून एकत्रितरित्या छाननी करण्यात आली. यावेळी दोन नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांनी एकमेकांविरुद्ध हरकती घेतल्या, या हरकतीची सुनवाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दुपारी तीन वाजता ठेवली होती.

दुपारी तीन वाजल्यापासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत तब्बल ३ तास सुनावणी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासमोर घेण्यात आली. दोन्ही उमेदवारांनी सोलापूर येथील नामांकित वकिलांची फौज उभी केली होती.

निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दोन्ही बाजूने युक्तिवाद ऐकून घेतला, यावर निर्णय अद्याप दिलेला नाही, निर्णय देण्यासाठी विलंब होत असल्यामुळे शहरांमध्ये विविध चर्चेला उधाण आले असुन यावर अंतिम निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी कधी देणार? निर्णय काय असणार? याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, १० प्रभागातील किती उमेदवारांचे अर्ज अपात्र झाले? किती उमेदवारांवर हरकती आल्या याबाबत ही माहिती मिळू शकली नाही. येथे नगराध्यक्षासाठी १९ तर सदस्यपदासाठी १७९ अर्ज दाखल झाले होते.



# युटोपियन शुगर्स येथे रस्ते सुरक्षा अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १८ नोव्हेंबर-**

कचरेवाडी (ता.मंगळवेढा) येथील युटोपियन शुगर्स लि. येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर यांचे वायुवेग पथक मंगळवेढा यांच्यावतीने ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावून रस्ता सुरक्षा अभियान संपन्न झाले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, मंगळवेढा वायुवेग पथकाचे प्रमुख, मोटार वाहन निरिक्षक गणेश मोहनराव तपकीरे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे, चिफ फायनान्सियल ऑफीसर दिनेश खांडेकर, ई.डी.पी मॅनेजर अभिजीत यादव, केनयार्ड सुपरवायझर श्रीकांत गणपाटील, सुरक्षा अधिकारी सिकंदर सय्यद, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रियांका माने व पूनम चव्हाण उपस्थित होते. यावेळी श्री. परिचारक यांनी हे अभियान अपघात कमी करणे आणि वाहतुकीच्या नियम ांविषयी जागरूकतेसाठी दरवर्षी राबवले जाणारे एक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय अभियान असल्याचे सांगितले. या अभियानांतर्गत वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन आणि कारखाना प्रशासन एकत्र काम करतात असेही त्यांनी सांगितले. मंगळवेढा वायुवेग पथकाचे प्रमुख म ोटार वाहन निरिक्षक गणेश मोहनराव तपकीरे यांनी रस्ते अपघाताविषयी प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहाय्यक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे व असिफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली वायुवेग पथक स्थापन केल्याचे सांगीतले. ओव्हरलोड वाहतूक करु नये, ऊसाने भरलेली वाहने पुढे नेण्यासाठी स्पर्धा करु नये. आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवू नये. चालकाकडे योग्य ते लायसन्स असणे गरजेचे आहे. भरलेल्या किंवा रिकाम्या वाहनाला दोनपेक्षा जास्त टेलर जोडू नये. शहरातील मुख्य रस्त्याचा वापर न करता बाह्यवळण रस्त्याचा वापर करावा. रात्रीचे वेळी पाठीमागील बाजुस लाल रंगाचा टेल लँप दिवा लावावा. टेलरला दोन्ही बाजूस

# मंगळवेढ्यातील बालविवाह पोलीसांनी रोखला

**बाल संरक्षण कक्षाची सतर्कता आला कामी**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१८ नोव्हेंबर-**

मंगळवेढा शहरात अल्पवयीन वधूचा होणारा बालविवाह सोलापूर बाल संरक्षण कक्ष व पोलीस प्रशासन यांच्या सतर्कते मुळे टळला आहे. दरम्यान व्हॉटसअप, फेसबुकच्या जमान्यातही बालविवाह होत असल्याने सुज्ञ नागरिकामधून चिंता व्यक्त केली जात आहे.

या घटनेची हकीकत अशी, सोलापूर येथील बाल संरक्षण कक्षचे मल्लीनाथ तमशेट्टी यांना मंगळवेढ्यातून एका अज्ञात व्यक्तीने ऑनलाईन तक्रार करुन येथे दि.१५ नोव्हेंबर रोजी १२.४० वाजता बालविवाह होणार असल्याचे कळविले होते. त्यानुसार तेथील अधिकारी मल्लीनाथ तमशेट्टी मंगळवेढा पोलीस स्टेशनला हजर झाले.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्याशी बालविवाह होणार असलेबाबत चर्चा केली. पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर,महिला पोलीस हवालदार वंदना अहिरे, सुरेश कांबळे, पोलीस अंमलदार श्रीकांत देवकते, बालविकास विभागाच्या अस्मिता पठाण यांचे पथक रजपूत मंगल कार्यालय येथे दाखल झाले. यावेळी या पथकाला मोहोळ येथील १५ वर्षीय १० महिन्याची वधू व कचरेवाडी येथील २३ वर्षीय वर यांची लगीनघाई सुरु असल्याचे निदर्शनास आले.

या पथकाने वधू व वरास ताब्यात घेवून मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये हजर करुन त्यांचे समुपदेशन करुन वधूस आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले.

सध्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पुर्ण होवून विज्ञानाकडे प्रगती करीत असताना व्हॉटसअप,फेसबुकच्या जम ान्यातही मंगळवेढ्यात बालविवाह होत असल्याचे समजताच सुज्ञ नागरिकांमधून याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### 'ऑर्किड'च्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत अवतरला 'कांतारा'

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुलच्या वतीने बालदिनानिमित्त नर्सरी ते दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात सहभागी विद्यार्थ्यांनी 'कांतारा'सह मँगो ट्री, ऑक्सिजन, पाणी, ट्रॅफिक पोलिस आदी वेशभुषा परिधान केले होते. छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांची व्यक्तीरेखा साकारली होती. अक्कनबळग संस्थेच्या अध्यक्षा प्रार्थना बिज्जरगी यांच्या हस्ते, संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रार्थना बिज्जरगी, रुपाली घोंगडे, सुलोचना नसके, निर्मला कणगी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. काजल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.



### शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी माने यांची मनपा उर्दू मुले कॅम्प शाळेला भेट

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी महानगरपालिका उर्दू मुले कॅम्प शाळेला भेट देऊन परिसराची पाहणी केली. त्या त्या वर्गावर जावून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवादही साधला. यावेळी प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक भगवान मुंडे, मनपा उर्दू मुले कॅम्प शाळेच्या मुख्याध्यापिका माहेजबीन मुल्ला, मनपा उर्दू मुली कॅम्प शाळेच्या मुख्याध्यापिका नाजनीन कोरबू, मनपा उर्दू कॅम्प प्रशालेचे मुख्याध्यापक हारून बंदूकवाले, मनपा मराठी कॅम्प प्रशाला १ चे मुख्याध्यापक जगन्नाथ सज्जन, शिक्षण मंडळाचे डाटा एन्ट्री ऑपरेटरचे अमोल गायकवाड आदी उपस्थित होते.



### साबळे आणि वाघिरे कंपनीच्यावतीने रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

साबळे आणि वाघिरे कंपनीच्या वतीने जनरल मॅनेजर बाळासाहेब जगदाळे यांच्या वाढदिवासनिमित्त झालेल्या रक्त दान शिबिरामध्ये एकूण ५१ रक्त दात्यानी रक्तदान केले.साबळे आणि वाघिरे कंपनीच्या वतीने दर वर्षी रक्तदान शिबिर घेतले जाते. या वर्षी दिवाळी दरम्यान सोलापूर शहरात रक्ताचा तुटवडा जाणवत होता. याची दाखल घेऊन मोठ्या प्रमाणावर शिबिर घेण्यात आले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी साबळे आणि वाघिरे कंपनीमधील अंकुश राठोड आणि मदन आपटे यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी डॉक्टर हेडगेवार ब्लड बँकेचे सहकारी लाभले.



### वालचंद महाविद्यालयात स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयातस्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती मोठया उत्साहात साजरीकरण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.संतोष कोटी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. बिरसा मुंडा हे एक आदिवासीस्वातंत्र्यसैनिक, युवकांचे प्रेरणास्थान होते. बिरसा मुंडा यांनीयुवकांना लढण्याची संघटित होण्याची आणि सामाजिक न्यायासाठी उभे राहण्याचीप्रेरणा दिली. त्यांच्या विचारांची आजच्या पिढीला नितांत गरज आहे असे प्रतिपादन प्रमुख वक्ते प्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी केले.'आदिवासी संस्कृती आणि बिरसा मुंडा यांचे योगदान या विषयावर त्यांनी बिरसा मुंडा यांच्या उलगुलान आंदोलनाची माहिती देत. जमीन हक्क, वनसंरक्षण आणि सामाजिक समानतेसाठी केलेल्या संघर्षावर प्रकाश टाकला.अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी केले.या कार्यक्रमप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री अनुपम्हेत्रे, डॉ.जीवराज कस्तुरे, प्रा.डॉ. निशा वाघमारे, प्रा.डॉ. विजया महाजन, हनुमंत मते, डॉ.गोविंद तोडकरी, प्रा.डॉ. संदिप जगदाळे, प्रा.डॉ.अभय जाधव, प्रा.डॉ.जितेंद्र गांधी तसेच ग्रंथालयातील कर्मचारी वविद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.नागनाथ धायगोडे तर सूत्रसंचालन डॉ. पद्मावती पाटील यांनी तर आभार डॉ.अमोल शिंदे यांनी मानले.

# सार्वजनिक नळांचे झोननिहाय सर्वेक्षण करून तातडीने अहवाल सादर करा

- मलनिस्सारण केंद्रात येणारे पाणी बायपास नसल्याची घ्यावी
- पालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे पाहणीदरम्यान आदेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

ट्रंक लाईनच्या चेंबरची उंची वाढवण्याबाबत तात्काळ आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच मलनिस्सारण केंद्रात येणारे पाणी बायपास होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी.

सार्वजनिक नळांचे झोननिहाय सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सोरेगाव परिसरातील महत्त्वाच्या मलनिस्सारण आणि पाणीपुरवठा संबंधित प्रकल्पांची सविस्तर पाहणी केली. या पाहणीत नियोजित सांडपाण्याचे पंप हाऊस, प्रतापनगर मलनिस्सारण केंद्र आणि प्रतापनगर तलाव परिसराचा समावेश होता. या वर्षी प्रतापनगर तलाव प्रथमच अतिवृष्टीमुळे पूर्ण क्षमतेने भरला असून तलावातील वाढलेल्या पाण्यामुळे मलनिस्सारण केंद्राकडे जाणाऱ्या मुख्य पाईपलाईनचे चेंबर संपूर्णपणे जलमग्न झाले आहे. यामुळे केंद्रात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण अत्यंत वाढले असून प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होत आहेत.पाहणी दरम्यान आयुक्तांनी भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ट्रंक लाईनच्या चेंबरची उंची वाढवण्याबाबत तात्काळ आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच मलनिस्सारण केंद्रात येणारे पाणी बायपास होणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचेही आदेश दिले.

याशिवाय, निर्मिती मंगल कार्यालयाजवळील नाला आणि मंगल कार्यालय समोरील तार-कंपाउंडसह अतिक्रमण तातडीने हटविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच झोन क्रमांक ५ मधील कल्याण नगर भाग-३ येथील सार्वजनिक नळांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सार्वजनिक नळांचे झोननिहाय सर्वेक्षण करून सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधित विभागाला दिले.

या पाहणीदरम्यान सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चोबे, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, सहअभियंता रामचंद्र पेंटर, विभागीय अधिकारी तळीखेडे, राहुल शिंदे, लक्ष्मी इंजिनिअरिंगचे प्रतिनिधी अनिकेत जोशी, वेपकॉस कन्सल्टंटचे अनिल जाधव, शेफाली दिलपाक आदी उपस्थिती होते. महानगरपालिका प्रशासनाद्वारे शहरातील मलनिस्सारण व्यवस्था मजबूत आणि कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना वेगाने राबविण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.



## कार्तिक त्रयोदशी, ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यानिमित्त दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

कार्तिक त्रयोदशीच्या मुहुर्तावर तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी सोहळ्यानिमित्त भद्रावती पेठ येथील यलम्मा देवी मंदिरासमोर भव्य दिपोत्सव, भजन संगीत तसेच विष्णू सहस्त्रनाम स्तोत्रम्, ललिता सहस्त्रनाम स्तोत्रमासह महाराष्ट्रातील लोकप्रिय हास्य कलाकार व सोलापूरचे सुपुत्र अंबादास कनकट्टी यांचा हास्य विनोदाचा कार्यक्रम जनदर्पणच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाविकांची अलोट गर्दी होती.

प्रारंभी डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रूग्णालयाचे व्हाईस चेअरमन रमेश विडप, पंडित वेणुगोपाल जिल्ला पंतुलू, पद्मशाली पद्मावती देवी ब्रम्होत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास बिंगी, भाजपाचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, श्री मार्कंडेय रुग्णालयाचे संचालक लक्ष्मीनारायण कुचन, देविदास यंगलदास, नागराज रासकोंडा, श्रीनिवास जिल्ला, वज्रेश्वरी गाजूल, अविनाश महाराज आदींची उपस्थिती होती. बाळू मदनाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध भक्तीगीते सादर केली. महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमास एसव्हीसीएसचे शाळेचे प्रमुख तथा होटगी मठ संस्थानचे सचिव स्वामी, पोलिस उपनिरीक्षक ताटे, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, आनंद बिर्रु, प्रा.नरेंद्र गुंडेली, दत्तात्रय आडम, किरण पामू, नागनाथ सोमा, शेखर इगे यांची उपस्थिती होती.



### ६४ वी महाराष्ट्र राज्य हौसी मराठी नाट्य स्पर्धा

**सोलापूर :** हुतात्मा स्मृती मंदिरात मंगळवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत राजश्री विश्वकल्याण मल्टीपर्पज सोसायटी जुळे सोलापूर आयोजित दोन अंकी ''राहिले दुर घर माझे'' नाटक सादरीकरण केले.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात 'रेलवन ॲप'ची जनजागृती मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील रेल्वे स्थानकात तिकीट घर येथे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात ''रेलवन'' या ॲप च्या संदर्भात मुख्य स्थानकांवर पोस्टर आणि प्रात्यक्षिके दाखवून प्रवाश्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. रेल्वे प्रशासनाने रेलवन हे ॲप काही महिन्यांपूर्वी डेव्हलप करून रेल्वेच्या सेवा पूर्ततेसाठी वापरात आणण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर रेल्वे विभागातील सोलापूर, पंढरपूर, कलबुरगि, लातूर, कुर्डुवाडी या मुख्य स्थानकांवर या ॲप च्या संदर्भात माहिती सांगण्यात येत आहे. तिकीट बुकिंग आणि आरक्षण या दोन्ही काउंटरवर या संदर्भात विस्तृत माहिती प्रकाशित करण्यात




आली आहे. या ॲप मधून आरक्षित तिकीट बुकिंग, आर-वॉलेट वापरून ३% सवलतीसह अनारक्षित यूटीएस तिकिटे, लाईव्ह ट्रेन ट्रॅकिंग आणि रिअल-टाइम चौकशी, ई-केटरिंगद्वारे फुड ऑर्डर, तक्रार निवारण प्रणाली, प्लॅटफॉर्म तिकिटे, तिकीट रद्द करणे, पीएनआर सेवा आदी सेवांचा फायदा रेल्वे प्रवासी घेऊ शकतात. सोलापूर विभागातून रेल्वेचा प्रवास करणारे आणि इतर सर्व रेल्वे उपभोक्त्यांनी रेल्वेच्या सेवांचा उपभोग घेण्यासाठी रेलवन सारख्या ॲप डाउनलोड करून एकाच छताखाली असलेल्या सर्व प्रवासी सेवांचा पुरेपूर वापर करावा असे आवाहन सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य प्रबंधक श्री योगेश पाटील यांनी केले आहे. प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून रेलवन डाउनलोड करू शकता. शिवाय विद्यमान रेलकनेक्ट/यूटीएस क्रेडेन्शियल्स वापरून लॉगिन करा किंवा नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करा. रेलवन या ॲप ची सोलापूर रेल्वे विभागाच्या डीआरएम सोलापूर या अधिकृत ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम, थ्रेड आणि यु ट्यूब या सोशल मीडिया हँडल वरून संपूर्ण माहिती देण्यात येत आहे.



## 'दक्षिण'मधील राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाच्या कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री.महादेव बिराजदार रा. शिरवळ याचा सह तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा कार्यकर्त्यांचा खासदार प्रणितीताई शिंदे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार, दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भीमाशंकर जमादार यांच्या उपस्थितीत जनवात्सल्य निवास सोलापूर येथे काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यामध्ये प्रवेशकर्ते- महादेव बिराजदार यांच्यासह चिदानंद शावळ, महादेव पुजारी, चंद्राम जनगोंडे, अजय बिराजदार, राहुल हिप्परगी, रविकांत बिराजदार, रविकांत डम्मे, सचिन करके, यल्लाप्पा हिप्परगे, नागेश तुळजापुरे, शाहीर निक्केवार आदींनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला खासदार प्रणितीताई शिंदे यांनी त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले.

यावेळी महादेव बिराजदार म्हणाले आम्ही सर्व कार्यकर्ते आज देशाचे नेते राहुलजी गांधी, माजी केंद्रीय गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे साहेब, प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब, खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे काम प्रामाणिकपणे करून काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी काम करु असे म्हणाले.

यावेळी दक्षिण सोलापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष भीमाशंकर जमादार, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, तालुका सेवादल यंग ब्रिगेडचे अध्यक्ष मौलवी शेख,अकबर शेख, लखन चव्हाण, शिवानंद बहेरमठ, जीवनकुमार वाघमारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हमीभावने सोयाबीनची खरेदी प्रकिया सुरु

- जिल्हा पणन अधिकारी मनोजकुमार वाजपेयी
- तांत्रिक बिघाडामुळे खरेदी प्रक्रियेस होतोय विलंब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन मंडळ आणि राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एनसीसीएफद्वारे सोयाबीन आणि उडीद या पिकांच्या हमीभाव खरेदीला शासकीय मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सोलापूर जिल्ह्यात कुर्डुवाडी, अक्कलकोट, बार्शी, करमाळा, मंगळवेढा, पंढरपूर, अकलूज आणि सोलापूर येथे हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. उत्तर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुळ गोदामात हमीभाव खरेदी योजना २०२५-२६ या वर्षासाठी शेतकऱ्याची नोंदणी प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. दरम्यान, सोयाबीनचा हमीभाव रु. प्रति क्विंटल ५३२८ तर उडीद हमीभाव रु. प्रति क्विंटल ७,८०० रुपये असा शासनाने ठरवला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रथम ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये अद्यावत ७/१२ पिकाच्या नोंदणीसह व त्यावर असलेले पीक क्षेत्रफळ, आधार कार्ड व आधार कार्ड लिंक असलेले बँक खाते, नोंदणीकरिता मोबाईल व स्वतः शेतकरी यांनी बायोमेट्रिककरिता हजर रहावे लागणार आहे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार फक्त F..Q. दर्जाचे सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे.

| उडीद केंद्र | नोंदणीकृत शेतकरी संख्या |
|---|---|
| कुर्डूवाडी | ३५ |
| अक्कलकोट | ७६ |
| बार्शी | ० |
| करमाळा | ७९ |
| मंगळवेढा | ३४ |
| पंढरपूर | ० |
| अकलूज | ० |
| एकूण | २२४ |

**हमीभाव खरेदी प्रक्रिया सुरू**

हमीभावाने सोयाबीनची खरेदी सुरू झालेली आहे. बार्शी तालुक्यात सर्वाधिक ५१२ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. त्याची किंमत ८५,२४८ इतकी झालेली आहे. तांत्रिक बिघाडामुळे खरेदी प्रक्रिया उशिराने होत आहे. काही दिवसात ही प्रक्रिया सुरळीतपणे सुरू होईल.

**- मनोजकुमार वाजपेयी,**
जिल्हा पणन अधिकारी सोलापूर

| सोयाबीन केंद्र | नोंदणीकृत शेतकरी संख्या |
|---|---|
| कुर्डूवाडी | ४ |
| अक्कलकोट | १५३ |
| बार्शी | ५१२ |
| करमाळा | १ |
| मंगळवेढा | १ |
| पंढरपूर | ० |
| अकलूज | ० |
| एकूण | ६७१ |





## पीएनजीतर्फे प्रथा संग्रह सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

पीएनजी ज्वेलर्सने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे.

'प्रथा' म्हणजेच 'परंपरा'. हा संग्रह भारतीय स्त्रीच्या सौंदर्य, भावना आणि कलात्मकतेचे प्रतिनिधित्व करतो. तसेच ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ३०% पर्यंत सूट आणि हिरे दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ७५% पर्यंत सूट. यासोबतच जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर ०% कपात, ज्यामुळे प्रेम आणि परंपरेचं प्रतीक असणारे दागिने खरेदी करण्याची ही उत्तम संधी ठरते.यावेळी डॉ.सौरभ गाडगीळ म्हणाले, प्रथा वेडिंग कलेक्शन म्हणजे वारशाची आणि भावनेची शाश्वत नाळ आहे.या मोहिमेद्वारे आम्ही केवळ दागिने नव्हे, तर प्रत्येक विवाहा मागील भावना, बांधिलकी आणि एकतेचा सुंदर उत्सव साजरा करतो.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : शहरात थंडीत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे स्वेटर खरेदी करण्यासाठी पार्क चौकातील मार्केट गजबजले आहे. मंगळवारी टिपलेले छायाचित्र.



## महत्वाचे...

### पद्मश्री अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांची आज प्रकट मुलाखत

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.२५ वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन येथे पद्मश्री खा.अ‍ॅड.उज्ज्वल निकम यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली. माझा जीवन प्रवास जळगाव ते दिल्ली व्हाया मुंबई याअंतर्गत ही मुलाखत होणार आहे. माधव देशपांडे हे मुलाखत घेणार आहेत.



### भारत मुक्ती मोर्चाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी बोकेफोडे

**बार्शी, दि. १८ नोव्हेंबर-**

वीर बिरसा मुंडा व राष्ट्रपिता लहुजी वस्ताद यांच्या जयंतीनिमित्त बामसेफ व भारत मुक्ती मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने करमाळा येथे घेण्यात आलेल्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरामध्ये नवी दिल्लीचे बामसेफ राष्ट्रीय महासचिव गोरखनाथ वेताळ यांच्या हस्ते तानाजीराव बोकेफोडे, बार्शी यांची भारत मुक्ती मोर्चा जिल्हा कार्याध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली. प्रशिक्षणाचे मार्गदर्शक वेताळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.



### त्रिभाषा समितीचा २१ नोव्हेंबर रोजी जिल्हा दौरा

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत शिक्षणतज्ज्ञ डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. २१ नोव्हेंबर रोजी ही समिती सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र कोणत्या इयत्तेपासून, कशाप्रकारे लागू करावयाचे याबाबत धोरण निश्चित करण्याच्या अनुषंगाने ही समिती विभाग व जिल्हा स्तरावर भेटी देत आहे. सामान्य नागरिक, भाषातज्ज्ञ, विचारवंत, मराठी भाषेशी संबंधित किवा संलग्न शासकीय किंवा अशासकीय/खासगी संस्था यांचे अध्यक्ष/सदस्य, राजकीय पक्षांचे नेते/लोकप्रतिनिधी, प्राथमिक/माध्यमिक, शिक्षक संघटना यांचे अध्यक्ष/सदस्य, पालक-शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आदींशी ही समिती संवाद साधणार आहे. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा नियोजन भवन सभागृह येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राच्या अनुषंगाने प्रश्नावली व मतावली तयार करण्यात आली आहे. तरी सर्वांनी या चर्चासत्रास उपस्थित राहून त्रिभाषा धोरणासंदर्भात मते व विचार मांडावेत, असे आवाहन प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी केले आहे.

### सिव्हीलमधून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

शहरातील सिव्हील हॉस्पीटलमधून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरुन नेली. याबाबत सचिन दत्तात्रय केंदूळे (वय-३०, रा.विडी घरकुल, सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ८ नोव्हेंबर रोजी रात्री सचिन केंदूळे याने एम.एच.१३ बी.पी.१५७६ या क्रमांकाची दुचाकी सिव्हील हॉस्पीटलमधील बी ब्लॉक येथे हॅन्डल लॉक करुन पार्क केली होती. चोरट्याने ती चोरुन नेली.

---

शहरात फसवणुकीच्या दोन घटना

# जादा पैशाचे आमिष दाखवून महिलेची २१ लाखांची फसवणूक, शिक्षकास अटक

### दुसऱ्या घटनेत ६५ हजारांच्या फसवणूक प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

जादा पैशाचे आमिष दाखवून महिलेची २१ लाख ५० हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या बार्शीच्या शिक्षकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रंजना रमेश पवार (वय ५६, रा. उमा नगरी, मुरारजी पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन राजकुमार विठ्ठल थिटे (वय ४२, रा. बार्शी, जि. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकुमार थिटे यास फौजदार चावडी पोलिसांनी अटक केली आहे.

सन २०२२ मध्ये एके दिवशी रंजना पवार या त्यांची मैत्रीण कोकीळा कोळी हिच्या घरी जुनी मिल कंम्पौड येथे गेल्या होत्या. त्यावेळी रंजना पवार यांची राजकुमार थिटे याच्याशी झाली. थिटे याने रंजना पवार यांना मी स्वतः ट्रेडींग करतो, तुम्ही १० हजार भरले तर तुम्हांला दर महिन्याला १ हजार रुपयेप्रमाणे २० महिने पैसे मिळतील, असे सांगितले. त्यामुळे रंजना पवार यांनी थिटे यास ८ हजार रुपये





दिले होते. त्याचा परतावा थिटे याने वेळोवेळी दिला. त्यामुळे पवार यांचा थिटे याच्यावर विश्वास बसला. त्यानंतर थिटे याने पवार यांना १ लाख रुपये भरले तर तुम्हांला १० हजार ८०० रुपये भेटतील असे आमिष दाखविले. त्यावेळी रंजना पवार हिने स्वतः, बहिण व बहिणीची दोन मुले विजय किसन मोरे व एकनाथ चव्हाण तसेच पुणे येथील रवि पठारे अशा सर्वांनी मिळून थोडे थोडे करून २१ लाख ५० हजार रुपये गुंतविले. थिटे याने दोन महिने सर्वांना गुंतवणुकीवरील परतावा म्हणून पैसे दिले. त्यानंतर मे २०२४ मध्ये गुंतविलेल्या पैशाच्या खात्रीकरीता पवार हिने नोटरी करून घेतली. या नोटरीमध्ये थिटे याने पवार यांना १९ लाख ५० हजार रुपये व २ लाख रुपयांचा चेक दिला. त्यानंतर पवार यांनी थिटे यास पैसे मागणी केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे याबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक खंडागळे पुढील तपास करीता आहेत.

दुसऱ्या घटनेत प्रधानमंत्री सार्वजनिक योजनेअंतर्गत सोलार बसविण्यासाठी लोन करून देतो असे सांगून ६५ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या दोघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत हणमंत निंगप्पा पुजारी (रा. जीवनविकास नगर, कुमठा नाका, ७० फुट रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन चंदन मंजुळकर (रा. लक्ष्मी नगर, नक्का वस्ती, सोलापूर) आणि बाळकृष्ण चव्हाण (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ मार्च २०२५ ते १ जुलै २०२५ या कालावधीत चंदन मंजुळकर व बाळकृष्ण चव्हाण या दोघांनी पुजारी यांच्या घरी प्रधानमंत्री सार्वजनिक योजनेअंतर्गत सोलार बसविण्यासाठी अंदाजे ३ लाख ९५ हजार रुपये खर्च आहे असे सांगून यापैकी ३ लाख रुपयांचे लोन करून देतो असे सांगून पुजारी यांना २ लाख १० हजार रुपयांचे लोन मंजूर असताना त्यांच्याकडून ३ लाख रुपये जास्तीचे घेतले. त्यामुळे पुजारी यांनी मंजुळकर व चव्हाण यांना वारंवार पैसे परत करण्याची मागणी केली. त्यावेळी २५ हजार रुपये ऑनलाईनद्वारे दिले. उर्वरीत ६५ हजार रुपये देण्यास टाळाटाळ केली. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पारडे पुढील तपास करीत आहेत.

### रंगराज नगरात लाखाची घरफोडी

**सोलापूर :** शहरातील लक्ष्मी नारायण नगरजवळील रंगराज नगरातील बंद घर फोडून चोरट्याने १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत व्यंकटेश पार्वतय्या श्रीराम (वय ५६, रा. प्लॉट नं. २, लक्ष्मीनारायण नगर, रंगराज नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर या कालावधीत व्यंकटेश श्रीराम हे घराला कुलूप लावून परगावी गेले होते. त्यावेळी चोरट्याने श्रीराम यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून बेडरूममधील कपाटातील १ लाख ५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने चोरून नेले. म्हणून याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.

---

# 'दक्षिण'चे विस्तार अधिकारी संदीप खरबस निलंबित

### पंढरपूर पंचायत समिती मुख्यालयास हजर राहण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदीप खरबस यांनी मंजूर कामाचे बिल काढण्यासाठी दोन हजार रूपये लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. ३० ऑक्टोबर रोजी लाचखोरीची कारवाई झाल्यानंतर १७ नोव्हेंबरपर्यंत जिल्हा परिषदेकडून निलंबित करण्यात आले नव्हते. शिवाय कारवाईनंतरही खरबस पंचायत समिती कार्यालयात काम काज करीत असल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे दैनिक तरुण भारतने सोमवार, १७ नोव्हेंबर रोजी वृत्त प्रसिध्द केल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाकडून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी खरबस यांना ३० ऑक्टोबरपासून निलंबित केले आहे. तसेच या काळात पंढरपूर पंचायत समिती कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

संदिप खरबस यांनी दक्षिणमध्ये विस्तार अधिकारी



पदभार घेतल्यापासून अनेक ग्राम पंचायत अधिकारी व सरपंच यांनी वरिष्ठांकडे तक्रार केली होती. मात्र या तक्रारीकडे वरिष्ठांनी दुर्लक्ष केल्यामुळे मंजूर कामाचे बिल काढण्यासाठी दोन हजार रूपये लाच घेताना खरबस यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. ३० ऑक्टोबर रोजी लाचखोरीची कारवाई झाल्यानंतरही खरबस यांना निलंबित केले नव्हते. ३० ऑक्टोबर ते १७ नोव्हेंबर या काळात खरबस यांनी कार्यालयात काम करीत असल्याचे तक्रारदारांनी सांगितले. त्यामुळे या काळात झालेल्या कामकाजाचीही चौकशी करून ते आदेश रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे. खरबस यांना निलंबित करण्यासाठी दक्षिणचे बीडीओ व उपमुख्य कार्यकारी अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सीईओ जंगम यांनी हे आदेश दिले.

तरुण भारत Impact

---

# बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकणाऱ्यास ५० हजारांचा दंड



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर -**

शहरातील जोडबसवण्णा चौकात बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकणाऱ्यास महापालिकेकडून ५० हजारांचा दंड करण्यात आला आहे.

महानगरपालिका घन कचरा विभाग व आरोग्य विभागाच्या निरीक्षणादरम्यान शहरातील जोडबसवण्णा चौक परिसरात बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर फेकल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. संबंधितांनी त्यांच्या मेडिकलमधील बायोमेडिकल कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकल्याचे महापालिका अधिकाऱ्यांच्या पाहणीत आढळून आले.

या घटनेबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत नमूद करण्यात आलेल्या नियमांचे स्पष्ट उल्लंघन झाल्याने महानगरपालिकेने तात्काळ कारवाई केली आहे. संबंधित व्यक्तीवर पर्यावरण (संरक्षण) कायदा, कलम १५ नुसार ५० हजार रुपये इतका दंड आकारण्यात आला आहे. बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो. हे लक्षात घेऊन महापालिकेच्यावतीने ही कारवाई करण्यात आली आहे.

**नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई : आयुक्त डॉ.ओम्बासे**

याबाबत महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी म्हटले आहे की, नागरिकांना तसेच सर्व वैद्यकीय व्यावसायिकांनी बायोमेडिकल कचरा ही अतिसंवेदनशील आणि नियमबद्ध पद्धतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. शहर स्वच्छ, निरोगी आणि सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व वैद्यकीय प्रतिष्ठानांनी नियमावलीचे पालन करावे. शहरात कुठेही बायोमेडिकल वेस्ट कोणी टाकत असेल तर नागरिकांनी त्वरित महापालिकेचे आरोग्य निरीक्षक तसेच आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांना संपर्क करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.





---

# महाविकास आघाडीत होणार इलेक्टिव्ह मेरिटवर जागावाटप

### महापालिका निवडणुकीसाठी मतदारांचा कौल ठरणार महत्वाचा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या आगामी निवडणुकीत सत्ताधारी भाजप पक्षाला रोखण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन नवीन आघाडी केली पाहिजे, असे वक्तव्य राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खा.शरद पवार यांनी सोलापुरात केल्यानंतर शहराच्या राजकीय मोर्चेबांधणीत हालचाली सुरू झाल्या आहेत.

या आघाडीत काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उबाठा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी या पक्षसंघटनांचा समावेश असणार आहे. आघाडीतीली मित्र पक्षाचे आणि उमेदवाराचे इलेक्टिव्ह मेरिट लक्षात घेऊन एकूण २६ प्रभागात सर्वपक्षीय उमेदवार उभे केले जाण्याची व्यूहरचना आखली जात आहे.

दरम्यान, यासंबंधी लवकरच शिक्कामोर्तब





करण्यात येईल, असे सांगण्यात येते. दरम्यान, स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात आघाडीतील सर्व नेते एकत्रित आले होते. पुढील रणनीती व मोर्चेबांधणी करण्यासाठी लवकरच बैठक घेण्याचे ठरवण्यात आले. काँग्रेस पक्षाच्या वतीने उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट आणि उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेकडे उमेदवारांची निश्चिती केली जात आहे. आपापल्या बालेकिल्ल्यात आघाडीतील मित्रपक्ष जागा लढवण्यास इच्छुक आहेत. यामध्ये काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष गणेश वानकर, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा सुनीता हे पुन्हा एकदा इच्छुक आहेत. पूर्वभागामध्ये माकपाचा वर्चस्व असल्याने, या प्रभागात आघाडीतील कोणत्या पक्षाला कोणती जागा मिळेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**आघाडीचा ठरणार फॉर्म्युला**

आगामी महापालिका निवडणूक लक्षात घेता प्रभागातील पक्षाचे प्राबल्य आणि उमेदवार यांची निश्चिती करून आघाडीतील मित्रपक्षांच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरणार आहे. काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट, उद्धव ठाकरे शिवसेना आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी या पक्षांमध्ये जागावाटप निश्चित करण्यात येईल. याबाबत स्थानिक पातळीवरील नेतेमंडळींना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२७१

**तया स्वांत:करणजिता । सकळ कामोपशांता ।**
**परमात्मा परौता । दुरी नाहीं ।।**

या नाशिवंत देहाला माणूस मी म्हणत असतो. पण प्रत्यक्षात या देहात नांदणा-या आत्म्याला तो ओळखत नाही. ज्याला आत्म्याचा परिचय होतो त्याला भगवंताचे स्थान समजते. तो स्वत:चे अंत:करण जिंकतो. ज्याच्या कामवासना नष्ट झाल्या आहेत, त्याला परमात्मा स्वत:पासून वेगळा वाटत नाही. हे सांगतांना भगवंत म्हणतात, तया स्वांत:करणजिता ! सकळ कामोपशांता! परमात्मा परौता ! दुरी नाहीं !! ज्याप्रमाणे सोन्यात मिसळलेला हीनाचा दोष नाहीसा झाला म्हणजे खाली फक्त शुध्द सोने उरते. त्याप्रमाणे अंहकाराचा भ्रम नष्ट झाला, की जीवाला नित्य प्राप्तच असलेला ब्रम्हभाव प्राप्त होतो. ज्याप्रमाणे घटाचा आकार नाहिसा झाल्यानंतर त्यातील पोकळीला आकाशात मिळून जाण्यासाठी स्थलांतर करावे लागत नाही. ते आपोआप आकाशात मिसळते. त्याप्रमाणेच देहाच्या ठिकाणी असलेला खोटा अहंकार अज्ञानासह नष्ट झाला म्हणजे, त्याला आपण परमात्म स्वरुप असल्याचे जाणवते. अर्थात परमात्मस्वरुपात विलीन होण्यासाठी त्याला काही वेगळे करावे लागत नाही. आजच्या या ओवीत फार मोठा सिध्दान्त माऊलींनी स्पष्ट केला आहे. आपण म्हणजेच परब्रम्ह हे त्यांनी दाखवून दिले आहे. आपण आणि परमात्मा कांही वेगळे नाही. फक्त आपणाला त्याचा परिचय होत नाही, म्हणून त्याला आपण इतरत्र शोधत असतो. नामदेव महाराजांनी म्हटले आहे की, नामदेव कहे सुनोरे धगडा, आतम्देव न पुजौ दगडा. अर्थात, आपल्यातच देव आहे, त्याचा शोध घ्यायला पाहिजे. संत कबीरही म्हणतात, तेरा साहब है घर भीतर, बाहर नैना क्यों खोले. माऊलींच्या आपल्यातच देव आहे या वाक्याला इतर संतांनीही दुजोरा दिल्याचे आपणास पाहायला मिळते.



आपण या नाशिवंत देहालाच सर्वस्व समजून बसलो असल्याने, परमात्म्याचा शोध आपणाला लागत नाही. जवळी आहे परी भेटेना, असे म्हटल्याप्रमाणे अवस्था होत असते. शोधा म्हणजे सापडेल, ही संतोक्ती आपणाला प्रत्यक्ष कृतीत उतरवावी लागेल. तुज आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी, हे आता आपणाला समजले असल्याने आपण स्वत:चा म्हणजे प्रत्यक्षात आपण कोण आहोत याचा परीचय करुन घ्यायलाच पाहिजे. हा परिचय व्हावा म्हणून आपणाला मार्ग दाखविणारा कोणीतरी भेटला पाहिजे. संत महात्म्याशिवाय हा मार्ग कोण दाखविणार आहे. योग्य मार्गदर्शक किंवा संतपुरुष आपणाला शोधूनही सापडत नसेल तर,संत महात्म्याचे ग्रंथ आपल्याकडे आहेतच. गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध, कबीरवाणी असे अनेक ग्रंथ आपणाला मार्गदर्शन करु शकतील. ग्रंथ हेच गुरु, म्हटल्याप्रमाणे त्यांना गुरु मानून त्यातून सकारात्मक दृष्टीकोणातून घेण्यास हरकत नाही. ग्रंथातून किंवा सदगुरुकडून घेत असतांना, आपला देहाचा अहंकार सोडणे आवश्यक आहे. मीपणाचा अहंकार गेला म्हणजे तो सापडतो. अर्थात, मी गेल्याशिवाय तो येत नाही. आपल्यातून मी गेला म्हणजे, राग, लोभ, मोह, क्रोध, काम, मत्सर हे सर्व आपोआप निघुन जातात. हे सर्व निघुन गेले म्हणजे आपोआप सुख, समाधान, शांती, स्थैर्य आपल्यात निर्माण होऊ लागते. आपल्यातील नकोत्या गोष्टी निघुन जाव्यात व योग्य त्या गोष्टीचे आगमन व्हावे यासाठी मूळ ज्ञानेश्वरी वाचावी. जय जय राम कृष्ण हरी।.

**- ज्ञानदास डॉ.विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार**
**दि. १९ नोव्हेंबर २०२५**
**विक्रम संवत् २०८२**
**शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - कार्तिक**
**कृ. चतुर्दशी (०९.४३)**
**ऋतु - हेमंत**
**नक्षत्र- स्वाती (०७.५८)**
**योग - सौभाग्य (०८.५९)**
**करण - चतुष्पाद (२२.५९)**
**....राहू काल....**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**

**दिनविशेष - १९९८: अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्यावर महाभियोग चालवण्यात आला.**
**१९९९: शेन्झो १: पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना ने आपले पहिले शेन्झोउ अंतराळयान प्रक्षेपित केले.**
**२०००: शांतता, नि: शस्त्रीकरण आणि विकासासाठी इंदिरा गांधी पुरस्कार कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना प्रदान.**



## अनिवार्य 'टीईटी'चा निर्णय रद्द करण्यासाठी शिक्षक संघटनेचे आमदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर ..**

सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर रोजी 'टीईटी' संदर्भात घेतलेला निर्णय रद्द होण्यासाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) निकषांत बदल करावा लागणार आहे. त्या कायद्यातील दुरुस्तीचे विधेयक लोकसभेत सादर करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न करावा, असे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने आमदार अभिजित पाटील यांना दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे २० ते ३० वर्षे अध्यापन करून आदर्श विद्यार्थी घडविणारे शिक्षक प्रचंड मानसिक दडपणाखाली आहेत. हजारो शिक्षक चिंतेत असून त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर राज्य सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी. 'एनसीटीई'च्या निकषांत बदल करावा. १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेसंदर्भातील शासन निर्णय रद्द करावा आणि शिक्षण सेवक पद कायमचे रद्द करावे, अशाही मागण्या शिक्षक संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे आमदार अभिजित पाटील यांच्याकडे केल्या आहेत. त्यावर निश्चितपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करू, अशी ग्वाही देण्यात आली. यावेळी संघटनेचे नीलेश देशमुख, तात्यासाहेब जाधव, विनोद वारे, राजेश सुर्वे, केशवराव जाधव आदी उपस्थित होते.

# ग्रामपंचायतीला कर वसुलीसाठी अच्छे दिन

## घरपट्टी व पाणीपट्टी करात ५० टक्के सवलत

### कर सवलतीला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

राज्यातील ग्रामपंचायतींच्या करवसुलीला वेग देण्यासाठी शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गाम पंचायतीच्या निवासी करासह घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबत्ती करावर ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही करसवलत ३१ डिसेंबरपर्यंतच लागू असून सर्व जिल्हा परिषदांना अंमलबजावणीचे आदेश देण्यात आहेत. जिल्हा परिषदेनीही सर्व ग्रामपंचायतीना आदेश देऊन अधिकाधिक कर जमा करण्याचे सांगितले आहे.

अनेक ग्रामपंचायतींमध्ये करवसुली अपुरी असल्याने कोट्यावधी रूपयांचे कर थकबाकी असल्याचे बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. त्यामुळे




**मोठ्या ग्रामपंचायतींना होणार फायदा**

मोठ्या लोकसंख्येच्या ग्राम पंचायतीमध्ये कोट्यवधीची कर थकबाकी प्रलंबित आहे. त्यातून कर्मचारी पगार आणि थकीत वीजबिलासारख्या खर्चावर मोठ्या प्रमाणात ताण येत आहे. शासनाच्या कर सवलतीच्या या निर्णयामुळे अशा मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

विकासकामे करताना आणि सोईसुविधा देताना अडचणी येत होत. म्हणून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, तसेच विकासकामांसाठी निधी उपलब्ध व्हावा,

यासाठी ही ५० टक्के करसवलत योजना राबवली जात आहे. मात्र त्या संबंधीचा निर्णय ग्रामसभा किंवा मासिक सभेत ग्रामपंचायतीनेच घ्यायचा आहे. शासनाची ही योजना लागू करायची की नाही, याचा अंतिम निर्णय ग्रामपंचायतीकडेच राहणार आहे.

हजारो रुपयांची कर थकबाकी असलेल्या ग्रामपंचायतींना या शासनाच्या ५० टक्के सवलतीमुळे दिलासा मिळणार आहे. तसेच करांची वसुली न झाल्यास वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार असल्याने ग्रामसेवकांवर मोठ्या प्रमाणात ताण येत होता. एकरकमी वसुलीमुळे नागरीकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने ग्रामसेवकांची ही अडचणही दूर होणार आहे.

**ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी योजना**

जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींचे कर एक कोटीपेक्षा अधिक थकीत आहे. त्यामुळे कर्मचार पगार व इतर विकासकामे करताना अडचणी येतात. म्हणून शासनाने गावाच्या विकासासाठी व ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत करात ५० अक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात या योजनला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**- कुलदीप जंगम,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद**

नागरीकांकडे घरपट्टी, पाणीपट्टी व ग्रामपंचायतीचे इतर थकबाकी मोठ्या प्रमाणावर आहे. वसूलीसाठी पाठपुरावा केल्यानंतरही नागरीकांकडून प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत करात ५० अक्के सवलत दिल्यामुळे उत्सफूर्तपणे नागरीक एकरकमी कर जमा करीत आहेत. त्यामुळे करसवलत योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**- ज्ञानेश्वर कोळी,** ग्रामपंचायत अधिकारी भंडारकवठे. दक्षिण सोलापूर

## बाळासाहेब ठाकरे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**



शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्तशिवसेना सोलापूर महिला आघाडी जिल्हा संपर्क कार्यालयात तसेच महाराष्ट्र कामगार सेना कार्यालयात जिल्हासंघटिका अमिता जगदाळे यांच्या हस्ते आदरांजली कार्यक्रम आयोजित केले. बाळासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

जिल्हा संघटिका जगदाळे म्हणाल्या, बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या ठाकरी बाण्याने मुक्तहस्ते विरोधकांवर शब्दांचा मारा केला. त्यांच्या व्यंगचित्रांनी अनेकांना घायाळ केलं. महाराष्ट्राचा इतिहास ज्यांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, त्यांचे राज्याच्या समाजकारणात योगदान आहे बाळासाहेबांचे तेजस्वी विचार आजही मूळ शिवसेनेला बळ देतात.

कार्यक्रमास उपजिल्हाप्रमुख भारती मुनोली, डॉ. शोभा थडकर, दिपाली पवार, संध्या सोनकांबळे सायरबनो मुलांनी, कल्पना शेळवणे, सुवर्णा दांडगे, मीना जाधव, निशा माने, नाना मोरे, रवी म्हात्रे, अजय खांडेकर थडकर राम सिंग धानीवळे तिरुपती परकीपंडला शशिकांत बिराजदार, संताजी भोळे, नाना मोरे, बंटी बेलमकर, अजय खांडेकर, अंबादास चव्हाण, सुरेश शिंदे, रवी म्हेत्रे, पंकज गजाकोश, रामसिंग धनिवाले, तिरुपती परकीपंडला आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## 'ऑर्किड'मध्ये विद्यार्थ्यांसाठी आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ नोव्हेंबर-**

शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये बालदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय फन फेअरचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उदघाटन सोलापूर विज्ञान केंद्राच्या गृहविज्ञान विषयाच्या विशेषज्ञ अनिता शेळके-सराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी, संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, स्कुलच्या मार्गदर्शिका मीना पारखे आदी मान्यवर उपस्थित होते. फन फेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या सृजनशीलतेला वाव देण्यासाठी आणि त्यांच्यात आत्मविश्वास वाढविण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उद्देश असल्याचे प्राचार्या रुपाली हजारे यांनी सांगितले. फन फेअरच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी जवळपास ५० हुन अधिक फूड स्टॉल व गेम स्टॉल उभे करून आपले आर्थिक कौशल्य सिद्ध केले.या दोन दिवसीय उपक्रमास पालक वर्गानी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन व आभार तृप्ती चाटी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षककेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## घराला आग लागून २० लाखांचे नुकसान

### एसीच्या गळतीमुळे आग लागल्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १८ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे एसी गळती व शॉर्टसर्किटने आग लागून रोख रक्कम, फर्निचर, घरातील साहित्य जळून जवळपास वीस लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मंद्रूप येथील बाबूलाल नगर येथे सोमवारी दुपारी ही घटना घडली. परीसरातील लोकांनी आग विझविण्यास मदत केल्याने जिवितहानी झाले नाही.

या घटनेची नोंद मंद्रुप पोलिसात झाली आहे. विंचूर येथील माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक लिगाडे यांच्या घराला आग लागून ही दुर्दैवी घटना घडली. सोमवारी अशोक लिगाडे हे शाळेला गेल्यानंतर दुपारी त्यांच्या पत्नी चतुराबाई कपडे धुण्यासाठी बसल्या होत्या. त्यावेळी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घरातील एसीला गळती लागली. यामुळे शॉर्टसर्किट होऊन आग घरातील लाकडी साहीत्य व कपड्यांना लागल्याने आगीने मोठा पेट घेतला. लिगाडे यांच्या घरातील धूर पाहून शेजारी असणाऱ्या लोकांनी घराचे वीजपुरवठा बंद केला. त्यानंतर शेजाऱ्यांनी बोअरच्या पाण्याने आग आटोक्यात आणले. मात्र मुलीच्या साखरपुडयासाठी आणलेले सोने व कपडे जळून खाक झाले. तसेच लाकडी फर्निचर याचे देखील नुकसान झाले. शिवाय घरातील दोन लाख रूपये रोख रक्कमही जळाल्याने लिगाडे कुटुंबाचे २० लाखापर्यंत नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार व हवालदार सचिन मसलखांब यांनी घटनास्थळी भेट दिली. तपास हवालदार मसलखांब करीत आहेत.

## सिध्दारुढ स्वामीजींचे शुक्रवारी हत्तुर येथे प्रवचन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथे सन्मुखारूढ मठ, विजयपूर व शांताश्रम हुबळी मठाचे परमपूज्य गुरुवर्य सद्गुरु श्री अभिनव सिद्धारूढ स्वामी महाराज यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादाप्रमाणे यंदाही अध्यात्मिक सुविचार संध्या अंतर्गत शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता हत्तूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी बरुरचे आनंद शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी गुरु दर्शन व प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन हत्तूर सदभक्त मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

## प्रात्यक्षिक परीक्षेला बोर्डाचे पथक देणार अचानक भेट

### परीक्षा केंद्रावरील सोईसुविधांची करणार पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ नोव्हेंबर :**

दहावी व बारावी परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पडावे, म्हणून दहावी व बारावी परीक्षेला शिक्षणाधिकाऱ्यांसह परीक्षा मंडळाकडून प्राधान्य देण्यात येत आहे. कापीला आळा घालण्यासाठी बोर्डाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थी व पर्यवेक्षकांचे सरमिसळ पध्दत व प्रत्येक केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे व संरक्षक भिंतीची अट घालण्यात आली आहे. याशिवाय यंदा विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकावेळी सुद्धा बोर्डाची पथके काही शाळांना अचानक भेटी देऊन पाहणी करणार आहे. दरवर्षी शिक्षणाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालील पथकांकडून भेटी दिल्या जात होत्या. यावर्षी इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या काळात होणार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांचे तोंडी तथा प्रात्यक्षिक २ ते १८ फेब्रुवारी दरम्यान पार पडेल. सध्या आता प्रत्येक परीक्षा केंद्रांची पडताळणी सुरू आहे. प्रत्येक केंद्रावरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बंधनकारक आहे. दुसरीकडे त्या केंद्र शाळेला पक्की संरक्षक भिंती, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय या सुविधांची पाहणी करणार आहे. ज्या केंद्रावर सीसीटीव्ही नाहीत, त्यांना परीक्षेपूर्वी कॅमेरे बसवण्याचे आदेश देण्यात आले आहे.

दरवर्षी दहावी-बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षेवेळी जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांची पथके काही शाळांना भेटी देऊन पाहणी करायचे. पण, आता बोर्डाकडून पथके नेमली जाणार आहेत. या पथकाकडून जिल्ह्यातील २० ते २५ टक्के शाळांना अचानक भेटी देऊन प्रात्यक्षिक परीक्षेची पाहणी करण्यात येणार आहे . पारदर्शकपणे परीक्षा व्हावी हा त्यामागील हेतू असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.

## शहरात अतिक्रमणे झाली उदंड, महापालिकासह पोलीस प्रशासन सुस्त

सध्या शहरातील सर्वच भागांमध्ये अतिक्रमणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. बाजारपेठेसह रहिवासी भागातही अतिक्रमणे वाढल्याने रस्ते निमुळते होत असल्याने अपघातांची तसेच वाहतूक कोंडीचीही समस्या तीव्र होत आहे. अतिक्रमण काढण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनी प्रशासनाशी पत्रव्यवहार केला. परंतु मनपाच्या उदारमतवादी धोरणामुळे अतिक्रमणे कमी होण्याऐवजी ती वाढतच चालली आहेत. शहरात अजगरी विळख्याने निर्माण झालेल्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळा ठरत आहे. तसेच अपघातांची संख्याही वाढत आहे. वाढते अतिक्रमण हटविण्याला महापालिकासह वाहतूक पोलिसांच्या सुस्तवालपणा कारणीभूत ठरत आहे की काय? असा प्रश्न पडतो.






मुख्य रस्त्यांना मोकळा श्वास घेता यावा, यासाठी महापालिका आयुक्तांनी सर्वप्रथम अतिक्रमणांकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. शहरातील विविध पसिरातील अतिक्रमण निर्मूलन मोहीम धडाकेबाज पद्धतीने राबविण्याची गजर निर्माण झाली आहे. पण, अतिक्रमण निर्मूलन विभाग हा मन मानेल त्या पध्दतीने काम करीत असल्याने त्यांच्याकडून राबविलेल्या जाणाऱ्या मोहिमा थंडावल्या आहेत. शहरातील प्रत्येक भागातील रस्त्यांवर दिवसेंदिवस अतिक्रमणांमध्ये वाढ होत आहे. विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या राजकीय नेत्याच्या वरदहस्ताने अतिक्रमण करून व्यवसाय थाटलेले आहेत. मात्र, महापालिकेला त्याचे कुठलेही सोयरसुतक नसून, केवळ पालिकेकडून वेळ मारून नेली जात असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

शहरातील बाजारपेठांप्रमाणेच मुख्य रस्तेदेखील अतिक्रमणाने व्यापले आहेत. शहरातील दुभाजक असलेल्या रस्त्यावर बूट, टरबूज, कपडे, गॉगल्स, रस असे वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्यांनी ठाण मांडले आहे. विजापूर रोड, ७० फुट रोड, अरविंद धाम पोलिस वसाहतीसमोरील रस्ता येथे तर रस्त्याच्या कडेलाच भाजी विक्रीचा बाजार भरतो. विजापूर रोडवर तर हातगाडी आणि विविध वस्तूंची विक्री करणाऱ्यांनी रस्त्याच्या कडेची जागाच जणू बळकावली आहे. त्यामुळे परिसरात अपघात अनब वादही नित्याचेच झाले आहेत. रात्री चायनीज वा अन्य खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून रस्त्यालगत दुकाने थाटली जातात. विशेष म्हणजे, या व्यावसायिकांकडून पालिकेला कुठल्याही प्रकारचा कर मिळत नसतानाही प्रशासन त्यांच्यावर मेहेरनजर असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

अतिक्रमित रस्ते रहदारीसाठी मोकळे करणे गरजेचे आहे. शहरातील अतिक्रमणाचा विळखा कमी केल्यास अपघाताचे प्रमाण कमी होऊ शकेल. यासाठी पालिका प्रशासनाने अतिक्रमणधारकांना कायदेशीर नोटीस देऊन ते काढणे अपेक्षित आहे. तर, पुन्हा अतिक्रमण केल्यास दंड आकारणी करावी. पण, पालिका कारवाईच करत नसल्याने त्यांच्या भूमिकेबाबतच संशय व्यक्त होत आहे. शहरातील बाजारपेठ परिसरात अतिक्रमण वाढले आहे. प्रत्येक दुकानासमोर वाहनांची गर्दी व्यावसायिकांचे अतिक्रमण असे समीकरणच झाल्याने रस्त्याने पायी चालणेदेखील जिकिरीचे झाले आहे. नवी पेठ, चाटी गल्ली, कुंभार वेस, जोडबसवण्णा चौक, बुधवार बाजार, विजापूर वेस, लक्ष्मी मार्केट या भागातील मुख्य रस्त्यांवर दररोज अशीच स्थिती कायम आहे. अतिक्रमणामुळे २० फुटांचा रस्ता असूनही प्रत्यक्षात १० फूटच रस्त्याची जागा वापण्यास मिळत असल्याचे चित्र आहे.

व्यावसायिकाच्या अतिक्रमणाने रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनधारकांच्या वाहनधारकांना त्रास सहन करावा लागतो आहे. आसार मैदान, पार्क चौपाटी, सात रस्ता या परिसरातील चायनीज गाड्यांवरील पदार्थांच्या तिकटांमुळे वाहनचालकांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. मोटारसायकलने मार्गक्रमण करणाऱ्या नागरिकांच्या डोळ्यात येथील विक्रेत्यांमुळे मिरचीची पूड उडते. सायंकाळी तेथे नागरिकांची मोठी गर्दी होत असते. त्यामुळे प्रत्येक दहा मिनिटांनी तेथे वाहतुकीचा खोळंबा होतो.

शहरातील बहुतांश हॉटेल व्यावसायिकांनी त्यांच्याकडे आलेल्या ग्राहकांच्या वाहने लावण्यासाठी रस्त्यावरच अतिक्रमण केले आहे. हॉटेलमध्ये जाणाऱ्या ग्राहकांची वाहने रस्त्यालगत उभी केली जातात, त्यामुळे रस्त्यावर नेहमी अपघात होतात. पण, त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने आता पालिका आयुक्तांनी स्वत: या प्रकरणात पुन्हा लक्ष घालून शहरातील मुख्य रस्ते मोकळे करावेत अशी अपेक्षा आहे.

# महत्वाचे...



## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचे सहकार्य आवश्यक : दंडोती

**वळसंग, दि. १८ नोव्हेंबर-**

विद्यार्थ्यांच्या अर्थपूर्ण शिक्षणासाठी पालक आणि शिक्षकांमधील चांगला संवाद आवश्यक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, पालक आणि शिक्षकांनी समान ताकदीने उभे राहिले पाहिजे, असे शिवानंद दंडोती म्हणाले. अक्कलकोट तालुक्यातील सदालपूर गावातील मातोश्री लक्ष्मीबाई मैत्रे कन्नड शाळेतील आयोजित बालदिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक के.ए. कुलकर्णी उपस्थित होते. शिक्षक एस.जी. पाटील यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. शिक्षक व्ही.एम. कुलकर्णी यांनी स्वागत केले आणि दयानंद वरनाळे यांनी आभार मानले. शिक्षक के.एच. नयोदी, मायबु किणी, परशुराम कोळी, प्रवीण सीरापनह्ली, अर्जुन बनसोडे, महेबुबा जमादार आदी उपस्थित होते.




## प्रा.गणेश गोटे यांना राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट शिक्षक व प्राचार्य हे दोन मानाचे किताब

**बार्शी, दि. १८ नोव्हेंबर-**

सौंदरे या ग्रामीण भागातून राष्ट्रीय पातळीवर चमकदार झळाळी घेत महात्मा फुले विद्यालयाचे प्राचार्य प्रा. गणेश गोटे यांना राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट शिक्षक आणि राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट प्राचार्य हे दोन मानाचे किताब मिळाल्याने सौंदरे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. नवी मुंबईतील भावे नाट्यगृहात इंडियन टॅलेंट ऑलंपियाडतर्फे आयोजित भव्य समारंभात हा सन्मान प्रदान करण्यात आला. ७४ देशांमध्ये ऑलिंपियाड स्पर्धा घेणाऱ्या या संघटनेतर्फे मिळालेला राष्ट्रीय गौरव महत्त्वाचा मानला जात आहे. प्रा. गोटे यांनी एमसीएम, एमसीपी, डी. ई.कॉम, एमबीए अशी बहुविध पदवी प्राप्त केली असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी त्यांनी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. गतवर्षी संगणक विज्ञान ऑलिंपियाडमध्ये शाळेने २ आंतरराष्ट्रीय क्रमांक व ९ सुवर्णपदके मिळवत भरीव कामगिरी केली होती. समारंभाला देशाची पहिली महिला आयपीएस व माजी राज्यपाल डॉ. किरण बेदी, तसेच पद्मभूषण, ऑलिंपिक सुवर्णपदक विजेती सायना नेहवाल उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते प्रा. गोटे यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.



## जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये स्टुडंट्स लिड कॉन्फरन्सचे आयोजन

**जेऊर दि.१८ नोव्हेंबर**

झरे (ता.करमाळा) येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने स्टुडंट्स लीड कॉन्फरेन्स साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले अध्यक्षस्थानी होते. खजिनदार आशाताई बिले, संचालिका डॉ. स्वाती बिले, डॉ. सुनीता दोशी, डॉ. निशा सारंकर, ज्योती मुथा, मुख्याध्यापिका अमृता परदेशी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मिशन सिंदूर, वॉटर इलेक्ट्रिसिटी, रोबोट, आत्मनिर्भर भारत, कंप्युटर, डीएनए मॉडेल, हर्बेरियम अशा सर्व विषयांचे विविध मॉडेल प्रोजेक्ट तयार करून त्याबद्दल माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष श्री.बिले यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व मार्गदर्शन केले. दोशी व मुथा यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मनभरून कौतुक केले. संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. विद्यार्थी आकांक्षा कदम व वेदांत कादगे यांनी सूत्रसंचालन केले. वेदांत कादगे याने आभार मानले.

## माजी आमदार रमेश कदम यांच्या विरुध्दच्या खटल्यास कोल्हापूर उच्च न्यायालयातून स्थगिती

**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी प्रलंबित असलेल्या खटल्यात दोष मुक्त करण्यात यावे म्हणून केलेल्या अर्जात कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शिवकुमार दिघे यांनी खटला चालवू नये अशी तात्पुरती स्थगिती दिली. २० जानेवारी २०१५ रोजी रात्री नऊ वाजाचे सुमारास तारापूर येथे तत्कालीन आमदार रमेश कदम यांनी बेकायदेशीर वाळू वाहतूक करणार टिपर व जेसीबी पकडलेला होता. त्यावर कार्यवाहीसाठी परिमंडळ अधिकारी मोहम्मद हुसेन तांबोळी यांच्यासह काही कर्मचारी हे रात्री साडेनऊ वाजता गेले असता आमदार रमेश कदम यांनी तहसीलदार का आले नाहीत म्हणून त्यांना शिवीगाळ केली व पंचनामा माझ्या समक्ष करा त्यावर मी सही करणार आहे असे म्हणून त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा आणला, अशा आशयाची फिर्याद महंमद हनीफ तांबोळी यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावरून पोलिसांनी दोषारोपत्रक दाखल केले होते. खटला हा पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयात प्रलंबित असताना रमेश कदम यांनी दोष मुक्तीसाठी अर्ज दाखल केला होता तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर रमेश कदम यांनी कोल्हापूर उच्च न्यायालयात दोष मुक्तीसाठी पुनरवृत्ती अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीच्या वेळेस कदम यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून पुढील तारखेपर्यंत सत्र न्यायालयाने खटला पुढे न चालवण्याचा आदेश दिला. यात सरकार तर्फे ॲड. पी एस राणे यांनी तर माजी आमदार रमेश कदम यांच्यातर्फे ॲड. रितेश थोबडे, ॲड विनोद सूर्यवंशी यांनी काम पाहिले.

# मोडनिंब येथील उड्डाणपुलालगतचा हायमास्ट बंद

## लाखोंचा खर्च करुनही दिवा वापरातच नाही; नागरिकांतून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१८ नोव्हेंबर-**

सोलापूर-पुणे महामार्गावरील मोडनिंब (ता.माढा) येथील उड्डाणपुलाजवळ राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत शंभर फूट उंचीचा हायमास्ट दिवा उभारला आहे. परंतु अद्यापही तो बंदच आहे. सुमारे १३ लाख रुपयांचा खर्च करुन दिवा वापरातच नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत मोडनिंब उड्डाणपुलाजवळ सुमारे १३ लाख रुपये खर्च करून सात दिव्यांचा हायमास्ट चार महिन्यांपूर्वी उभारण्यात आला. मोडनिंब बसस्थानक, आदर्शनगर सर्व्हिस रोड, शेटफळ, बावी येथून मोडनिंब उमा विद्यालयाकडे जाणाऱ्या मार्गासह आसपासचा मोठा परिसर या प्रकाशयोजनेच्या कव्हरेजमध्ये आहे. अनेक वेळा एसटी प्रवाशांना मोडनिंब येथील बसस्थानकात न सोडता उड्डाणपुलाजवळ अथवा रस्त्यावरच सोडून बस निघून जातात. या ठिकाणापासून मोडनिंब बसस्थानक एक-दीड किलोमीटर आहे. रात्री अंधाऱ्या वाटेवरून महिला, मुलींसह ज्येष्ठांना जावे लागते. त्यामुळे रात्री-अपरात्री येणाऱ्या महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रात्री आठनंतर बसस्थानकात कोणतीही बस न येणे आणि रात्रपाळीतील वाहतूक नियंत्रकही उपलब्ध नसणे यामुळे प्रवाशांना पुलाच्या झिरो पॉइंटपासून जास्त अंतर काळोखात पायी चालत जावे लागते. विजेअभावी अंधार असल्याने अपघातांचीही शक्यता वाढली आहे. त्यामुळे तातडीने विद्युतपुरवठा करून हायमास्ट सुरु करण्यात यावा, अशी मागणी मनसेचे प्रशांत गिड्डे यांनी केली आहे.

### निष्काळजीपणा ठरत आहे त्रासदायक

हायमास्ट उभारला, पण अजूनही वीजजोडणी नाही. महामार्ग, प्रशासनाचा हा निष्काळजीपणा आम्हा नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. अनेक महिला व नागरिक पहाटे फिरावयास येतात. त्यांना अंधाऱ्या वाटेवरून जा-ये करावे लागत आहे, असे ऋषी कोठावळे यांनी सांगितले.



# ...अन्यथा बसवनगर येथे २४ नोव्हेंबरला रास्ता रोको

## 'दक्षिण'मधील नुकसान भरपाईची छावा संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

दक्षिण तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीतील नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी. अन्यथा सोलापूर-विजयपूर महामार्गावरील बसवनगर येथे दि. २४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता छावा संघटनेतर्फे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे दक्षिण तालुकाध्यक्ष गणेश मोरे यांनी दिला आहे.

दोन महिन्यांपूर्वी दक्षिण सोलापूर तालुक्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. माती वाहून गेल्यामुळे शेतजमिनी खराब झाल्या, पिके वाहून गेली, व अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी शासनाकडून नुकसानभरपाई जाहीर करण्यात आली. परंतु दक्षिण सोलापुरातील अनेक शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत नुकसानभरपाई मिळालेली नाही. शासनाने जाहीर केलेली मदत प्रत्यक्षात न मिळाल्यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष व नाराजी निर्माण झाली आहे. दक्षिण तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांची उपजीविका पूर्णपणे शेतीवर आहे. अतिवृष्टीच्या झालेल्या नुकसानी मुळे त्यांच्यावर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. बी-बियाणे, खते, आणि इतर शेतीसंबंधित खर्चासाठी शेतकरी कर्ज काढत आहेत, परंतु भरपाई न मिळाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. शासनाने जाहीर केलेल्या सर्वेक्षणानुसार, तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकरी व व्यावसायिकांना नुकसान भरपाई तात्काळ मिळणे आवश्यक आहे. मात्र, प्रशासकीय उदासीनता आणि विलंबामुळे वेळेत नुकसानभरपाई न मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या अन्यायाच्या निषेधार्थ छावा संघटना शेतकरी बांधवांच्या वतीने लाक्षणिक रास्ता रोको आंदोलन करणार आहे.

# नाट्य रसिकांच्यावतीने प्रशांत दामले यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १८ नोव्हेंबर-**

मराठी रंगभूमीवरील विक्रम वीर हास्य सम्राट अभिनेते प्रशांत दामले यांनी नुकतेच १६ नोव्हेंबर रोजी पुण्यात बाल गंदर्व रंग मंदिरात आपल्या रंगभूमीवरील कारकिर्दीतील विक्रमी १३,३३३ वा प्रयोग सादर केला.



यावेळी मा. नामदार चंद्रकांत पाटील व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार हे उपस्थित होते. यावेळी प्रयोगाच्या मध्यंतरात दोन्ही मंत्रण्याच्या हस्ते प्रशांत दामले यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशांत दामले यांनी महाराष्ट्रातील अतिवृष्टी मुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी १३,३३,३३३ रुपये चा धनादेश मुख्यमंत्री साहाय्य निधीसाठी दिला.

यावेळी सोलापुरातील प्रसिद्ध नाट्य वितरक उपरे ब्रदर्स चे लक्ष्मण उपरे व शिवाजी उपरे यांनी उपस्थित राहून सोलापूरच्या नाट्य रसिकांच्या वतीने सोलापूरची सुप्रसिद्ध शेंगा चटणी देऊन सन्मान केला. यावेळी प्रशांत दामले यांनी सोलापूर रसिकाचे आभार मानले व लवकरच सोलापुरात त्यांच्या सध्या सर्वत्र गाजत असलेल्या शिकायला गेलो एक या नाटकाचा प्रयोग करणार असल्याचे सांगितले.

# टेंभुर्णीजवळ टँकरची दुचाकीला मागून धडक





## अपघातात बाप लेकांचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१८ नोव्हेंबर-**

टँकरने दुचाकीला मागून धडक देऊन झालेल्या अपघातात बादलेवाडी (ता.माढा) येथील सुरेश सोमनाथ सरक (वय ४०) व मुलगा अभिजित सुरेश सरक (वय २१) या दोघांचा जागीच दुर्दैवी मृत्यु झाला. ही घटना सोमवार दि. १७ रोजी दुपारी बाराच्या सुमारास तांबवे हद्दीत बँक ऑफ बडोदा समोर घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, मयत सुरेश सोमनाथ सरक व मुलगा अभिजित सुरेश सरक हे दोघे त्यांचा मंगळवारी ढवळस येथे धार्मीक कार्यक्रम असल्याने त्याचेसाठी लागणारा बाजार आणण्यासाठी टेंभूर्णीकडे आपल्या एमएच ४५ ए.व्ही ८३५२ या दुचाकीवरून जात असताना एमएच ४२ बी ०२४० या टँकरने पाठीमागून धडक दिली. या झालेल्या अपघातात दोघे पितापुत्र टँकरचे चाकाखाली आले. यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी टँकरचालक छगन विठल माने (रा. तांबवे ता. माढा) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सर्वांना दिले जेवणाचे आमंत्रण एक दिवस अगोदरच मृत्यू

मयत सरक पितापुत्र याचा ढवळस येथील देवीला मंगळवारी देवदेव होता. सोमवारी सकाळी सर्वांना जेवणासाठी आमंत्रण दिले होते. परंतु त्यांना टेंभूर्णीला बाजारहाट आणण्यासाठी जात असताना वाटेतच मृत्युने गाठल्याने बादलेवाडी गावावर शोककळा आली आहे. तर मयत अभिजित सुरेश सरक हा महिन्यांपूर्वीच विठ्ठलराव शिंदे कारखान्यात सिक्युरिटी गार्ड म्हणून कामाला लागला होता.



# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुण्यात विराट मोर्चा

## मागण्या मान्य न केल्यास असहकार आंदोलन करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

२० वर्षाच्या संघर्षानंतर शिक्षकेतर कर्मचारी भरतीचा अध्यादेश काढण्यात आले तरी अद्याप भरती प्रक्रिया सुरू झाली नाही. त्यामुळे बदलापूर सारख्या घटना घडत आहेत. म्हणून शासनाने तात्काळ शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रक्रिया सुरू करावी.चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे २४ वर्षानंतरच्या लाभाच्या अनुषंगाने पूर्वीप्रमाणे एस५ मध्येच वेतन निश्चिती करण्यात यावी. नवीन सुधारित आश्वासित प्रगती योजनाबाबत निर्णय घ्यावा. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विनाअट वेतनश्रेणीत पदोन्नती मिळावी, शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त झाल्यानंतर त्यांच्या पदात व वेतनश्रेणीत कोणताही बदल करू नये या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळातर्फे सोमवारी पुण्यात शनिवार वाडा ते शिक्षण आयुक्त कार्यालय दरम्यान विराट मोर्चा काढण्यात आला. शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे नेते शिवाजी खांडेकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील विविध जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी हजारोंच्या संख्येने या मोर्चात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

यावेळी शिक्षक आमदार जयंत आसगावकर, संघटनेचे अध्यक्ष अनिल माने, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, विना अनुदानित कृती समितीचे खांडेराव जगदाळे, मुख्याध्यापक संघटनेचे हरिश्चंद्र गायकवाड, शिक्षक लोकशाही आघाडीचे शिवाजी कामाथे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले. या आंदोलनात सात ते आठ हजार शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. सोलापूर जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे सचिव मुस्ताक शेतसंदी , अध्यक्ष रवी सुर्वे, षडाक्षरी स्वामी , स्नेहराज चव्हाण , सचिन कोक्कळगी, सुरेश कोळी, सुधाकर व्हनकोरे आदी शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर-**

इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने परीक्षेची तारीख जाहीर केली आहे. विद्यार्थ्यांना ३१ डिसेंबरपर्यंत परीक्षेसाठी अर्ज करता येणार आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा आणि बुद्धिमत्ता चाचणी या विषयांची ३०० गुणांची ही परीक्षा असणार आहे . या परीक्षेसाठी नियमित शुल्कासह २७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि १ ते ३१ डिसेंबर या कालावधीत चौथी व सातवीची शिष्यवृत्ती मे महिन्यात विलंब शुल्कासह विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहेत. इयत्ता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अंतिम सत्र परीक्षा झाल्यावर होणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून त्याचे वेळापत्रक पुढील महिन्यात जाहीर होईल.

- आठ फेब्रुवारीला शिष्यवृत्ती परीक्षा
- जिल्हा परिषद भरणार परीक्षा शुल्क

यंदा पाचवी व आठवी आणि चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा होणार आहे. पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. एप्रिल-मे महिन्यात चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन आहे. सध्या विद्यार्थ्यांकडून परीक्षेचे अर्ज भरून घेतले जात आहेत.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**

यंदा चौथी, पाचवी, सातवी व आठवीतील १५ हजारांहून अधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा देणार आहेत . त्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून भरले जाणार आहे.



# अविष्कार स्पर्धेत सोजर कॉलेजने उमटविला यशाचा ठसा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१८ नोव्हेंबर -**

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी येथील बी. फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कु. तनुजा खिस्ते हिने लोकमंगल कॉलेज ऑफ फार्मसी, वडाळा येथे आयोजित 'अविष्कार' झोनल लेव्हल रिसर्च स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

तिच्यासोबत तृतीय वर्ष बी फार्मसीतील विद्यार्थिनी श्रुती पवार हिने विशेष काम पाहिले. त्यांचा या यशाने महाविद्यालयात अभिमानाचा क्षण निर्माण केला. महाविद्यालयातील इतर विद्यार्थिनींनी जसे स्नेहल टोगे, वैष्णवी सपकाळ, संपदा मुंडे, राजनंदिनी गाढवे, जोहा पटेल, आमना शेख, अर्पिता परखे, स्नेहा नांदेडकर, रसिका राठोड, स्नेहल देशमुख, प्रणिता अंगुले यांनी झोनल लेवल स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

कल्पकता, नवोन्मेष व वैज्ञानिक दृष्टीकोनाची चाचणी घेणाऱ्या या स्पर्धेत तनुजाने सादर केलेला प्रकल्प परीक्षकांचे लक्ष वेधून घेत अग्रस्थान मिळवण्यात यशस्वी झाला. तनुजा खिस्ते हिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, तिच्या उज्वल शैक्षणिक आणि संशोधनात्मक भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या प्रवासात मार्गदर्शनाची साथ देणारे अविष्कार को-ऑर्डिनेटर प्रा. शेख अकलाख आणि प्रेरणादायी नेतृत्व करणारे प्राचार्य डॉ. सुजित करपे सर यांचे योगदान विशेष महत्वाचे ठरले. संस्थापक अरुणदादा बारबोले व सचिवा कल्पनाताई बारबोले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या नाविन्यपूर्ण कामगिरीचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# सोजर फार्मसीच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमात ७१ शिक्षकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१८ नोव्हेंबर -**

खांडवी (ता. बार्शी) येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये टिचिंग विथ इंटेन्शन या विषयावर प्रभावी फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अध्यापन पद्धतींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे, पारंपरिक पद्धतींपलीकडे जाऊन उद्देशपूर्ण व विद्यार्थी-केंद्रित शिक्षण स्वीकारणे असा याचा उद्देश होता. यावेळी वक्ते म्हणून सोलापूरच्या भास्कर सॉफ्ट स्किल्स ट्रेनिंग सेंटरचे संचालक राहुल उपाध्ये उपस्थित होते. श्री. उपाध्ये यांनी चिंतनशील चर्चा, व्यावहारिक मार्गदर्शन आणि महाराष्ट्रातील शिक्षक-विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अनुभवांवर आधारित उदाहरणांद्वारे माहिती दिली. फॅब्टेक कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संजय बायस यांची विशेष उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. सुजीत करपे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. विविध महाविद्यालयातील ७१ शिक्षकांनी यामध्ये सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे समन्वयन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर शुभम मगर यांनी केले. रजिस्ट्रेशन कमिटीचे कार्य प्रा. स्वरुपा ठावरे, स्वप्नील पोळ यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले व सचिवा कल्पनाताई बारबोले यांनी शिक्षक-क्षमता विकासाची गरज व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.



# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सांगोला महाविद्यालयात बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**सांगोला, दि. १८ नोव्हेंबर -**

सांगोला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस प्र. प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंड मधील उलिहातू या गावी १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला. इंग्रज सरकारच्या अन्यायाविरोधात त्यांनी छोटा नागपूर क्षेत्रात इ.स.१८९५ साली लढा उभारला. त्यांचा ९ जून १९०० रोजी रांची कारागृहात मृत्यू झाला.त्यांना लोकांनी



जननायक हा किताब बहाल केला. त्यांचा कार्याचा आदर्श घ्यावा असे उद्गार यावेळी डॉ. सुरेश भोसले यांनी काढले.

सदर कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.आर. जी.खानापुरे, बाबासो इंगोले, प्रदीप आसबे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



## महत्त्वाचे



### गणेश्वरशास्त्री द्राविड यांना श्रीदासगणू महाराज पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ नोव्हेंबर-**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील दामोदर आश्रमात श्रीराधादामोदर प्रतिष्ठान व संतविद्या प्रबोधिनी तर्फे दिला जाणारा श्रीदासगणू महाराज पुरस्कार यावर्षी काशी येथील वेदशास्त्र संपन्न गणेश्वरशास्त्री द्राविड यांना प्रदान करण्यात आला. वेदाचे संरक्षण, संवर्धन यासंबंधीच्या शास्त्रीजींच्या कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व १.२५ लक्ष रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

याच कार्यक्रमात संस्कृत भाषा संवर्धन पुरस्कारही प्रदान करण्यात आले. पुणे व लातूर या विभागातून संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी समृध्दी जाधव, गौरवी ठुबे, स्वप्नाली महाजन व तनुजा चोपडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच अनंतप्रज्ञा गौरव पुरस्कार पंढरपूर येथील तुलसी कबाडे हिला प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी श्रीराधादामोदर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा कल्याणी नाम जोशी, श्री दासगणू महाराज प्रतिष्ठानचे सचिव विक्रम नांदेडकर, सुधीर शिरडकर यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सांगोला नगराध्यक्षपदासाठी २१, सदस्यपदांसाठी २२३ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ नोव्हेंबर -**



सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी अध्यक्षपदासाठी २१ तर सदस्यपदांसाठी २२३ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहेत. नगराध्यक्षासाठी दाखल झालेल्या २१ अर्जांपैकी १७ पुरुष तर ४ महिला आणि सदस्यपदांसाठी दाखल झालेल्या २२३ अर्जांपैकी ११२ पुरुष तर १११ महिलांचा सम ावेश आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैफन नदाफ व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली.

सदस्यपदासाठी प्रभागनिहाय दाखल झालेल्या अर्जांची संख्या याप्रमाणेफ; प्रभाग क्र.१ अ-(ना.मा.प्र.महिला) ७ अर्ज, १ ब-(सर्वसाधारण) ७ अर्ज, प्रभाग क्र.२ अ -(अनू.जाती) ६ अर्ज, २ ब-(सर्वसाधारण महिला) १४ अर्ज, प्रभाग क्र.३ अ-(अनू.जाती महिला) ३ अर्ज, ३ ब -(सर्वसाधारण) १२ अर्ज, प्रभाग क्र.४ अ -(सर्वसाधारण महिला) ५ अर्ज, ४ ब - (सर्वसाधारण) १० अर्ज, प्रभाग क्र.५ अ -(ना.मा.प्र.) ५ अर्ज, ५ ब-(सर्वसाधारण महिला) ९ अर्ज, प्रभाग क्र.६ अ-(ना.मा.प्र.महिला) ६ अर्ज, ६ ब-(सर्वसाधारण) ७ अर्ज, प्रभाग क्र.७ अ -(ना.मा.प्र) १२ अर्ज, ७ ब -(सर्वसाधारण महिला) १० अर्ज, प्रभाग क्र.८ अ-(अनू. जाती महिला) १० अर्ज, ८ ब-(सर्वसाधारण) १५ अर्ज, प्रभाग क्र.९ अ-(ना.मा.प्र) १२ अर्ज, ९ ब -(सर्वसाधारण महिला) ९ अर्ज, प्रभाग क्र.१० अ-(सर्वसाधारण महिला) १४ अर्ज, १० ब-(सर्वसाधारण) १९ अर्ज, प्रभाग क्र.११ अ-(ना.मा.प्र.महिला) ९ अर्ज, ११ ब -(सर्वसाधारण महिला) ६ अर्ज, ११ क-(सर्वसाधारण).

### कुर्डुवाडी नगरपालिका : नगरसेवक पदासाठी आलेले १५ अर्ज नामंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.१८ नोव्हेंबर -**



कुर्डुवाडी नगराध्यक्ष पदासाठी दाखल सर्व १० अर्ज छाननी प्रकरियेत मंजूर झाले आहेत.मात्र नगरसेवकपदासाठी दाखल एकुण १६४ अर्जात पैकी १५अर्ज अवैध ठरवण्यात आले आहेत.नगराध्यक्ष व नगरसेवकपदासाठी अनेकानी पक्षा कडुन व अपक्ष असे अर्ज दाखल केले होते. नगराध्यक्ष पदासाठी दाखल एकुण १० अर्ज ७ उमेदवारांनी दाखल केले आहेत. नगरसेवक पदासाठी दाखल १६४ अर्ज १३० उमेदवरांनी दाखल केले आहेत. अर्ज छाननी प्रकियेत नगरसेवक पदाचे अवैध अर्ज पुढील प्रमाणे प्रभाग १ ब मोटे रमेश सीमा (भाजप) प्रभाग २ अ जानराव अनाद रामचंद्र( भाजप), प्रभाग ३ अ गायकवाड साक्षी महादेव (भाजप), प्रभाग ४ ब गव्हाणे अजिंक्य दत्तात्रय (शिवसेना उबाठा), प्रभाग ४ ब शिंदे संतोष अशोक (राष्टवादी काँग्रेस पार्टी), माने शिरीष विष्णूपंत (भाजप), प्रभाग ५ ब शेख असलम महमद( भाजप) प्रभाग ८ अ कोळी युवराज कैलास (भाजप), ९ अ शेंडगे प्रतिभा श्रीकांत (भाजप), प्रभाग ९ ब सातव सागर गोरख (भाजप), प्रभाग ७ ब बागल पल्लवी सोमनाथ, (राष्ट्रवादी शरद पवार), प्रभाग ७ ब श्रीरामे रंजना राजाभाऊ ( राष्ट्रवादी काँग्रस पक्ष), प्रभाग ९ ब भराटे हरिबा निवृत्ती (भाजप), प्रभाग ९ ब भराटे हरिबा निवृत्ती (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ), प्रभाग ९ ब भराटे संदीप कांतीलाल (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) या पक्ष उमेदवारांना पक्षाकडून अधिकृत ए.बी फॉर्म न मिळाल्याने आर्ज नामंजूर झाले आहेत.

# बार्शीत रंगणार भाजपप्रणित महायुती विरुध्द उध्दव सेना यांच्यात सामना

## काँग्रेस 'अकेला चलो'च्या भूमिकेत

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि. १८ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी मोठा ट्विस्ट तयार झाला आहे. स्वतंत्रपणे निवडणुका लढवेल असे वाटत असलेल्या भाजपने शिंदे सेनेला सोबत घेत महायुती म्हणून एकत्र लढण्याची घोषणा केली. तर दुसरीकडे स्थानिक आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतलेल्या सोपल-बारबोले गटाने शेवटच्या टप्प्यात महाविकास आघाडी म्हणून नव्हे तर उध्दव सेनेच्यावतीने नगराध्यक्षपदासह नगरसेवकांच्या सर्व जागा लढवण्याचा निर्णय घेतल्याने बार्शीच्या राजकारणात चर्चांना ऊत आला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानेही सोपल गटाला पाठिंबा जाहीर केल्याने ते महायुती सोबत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बारबोले यांच्या या निर्णयामुळे बार्शी नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अस्तित्व जवळपास संपल्यातच जमा झाले आहे. तर काँग्रेसने 'अकेला चलो'ची स्वीकारली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचेही अस्तित्व नसणार आहे.




बार्शी तालुक्याच्या राजकारणात गेल्या अनेक वर्षांपासून आमदार दिलीप सोपल विरुध्द माजी आमदार राजेंद्र राऊत असाच सामना सर्वच निवडणुकांत पहावयास मिळतो. यंदा देखील असाच सामना रंगणार असला तरी दोघांचेही पक्ष आहेत आणि ते आपल्या सोयीने पक्ष निवडतात. पूर्वी एकत्र शिवसेनेत असलेल्या माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी भाजपच्या माध्यमातून काम करत विकास कामासाठी भरघोस निधी देणाऱ्या भाजपच्या माध्यमातूनच नगरपालिकेची निवडणूक लढवण्याचा पक्का निर्णय घेतलेला होता. ते मित्र पक्षाला जागा सोडतील, असे दिसत नव्हते. मात्र वरिष्ठ पातळीवर झालेल्या चर्चेअंती त्यांनी ना.एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सोबत घेत ४२ पैकी नगरसेवकांच्या ६ जागा दिल्या असून त्यांचे उमेदवारही जाहीर केले आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटही सोबत असल्याचा त्यांचा दावा आहे.

तर दुसरीकडे उध्दव सेनेचे आमदार दिलीप सोपल आणि विधानसभेच्या पूर्वी राऊत गटाकडून शरद पवारांच्या राष्ट्रवादीत गेलेले माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी नगरपालिका निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय घेतलेला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ते स्थानिक विकास आघाडी किंवा अपक्ष म्हणून निवडणुकीला सामोरे जातील, अशी चर्चा होती. त्या दिशेने त्यांचे नियोजनही झाले होते. मात्र अचानकपणे उध्दव सेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी बार्शीमध्ये शिवसेनेच्या मशाल चिन्हावर निवडणुका लढवाव्या, अशी आग्रही भूमिका घेतल्याने सोपल-बारबोले यांचा नाईलाज झाला व नगराध्यक्षपदाच्या उमेदवार निर्मला विश्वास बारबोले यांच्यासह सर्व ४२ जागा या अपक्ष किंवा राष्ट्रवादी काँग्रेस नव्हे तर उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या म शाल या चिन्हावरच लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

विश्वास बारबोले यांच्या या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे बार्शी शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अस्तित्व पूर्णपणे संपल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची तुतारीही असणार नाही. ना.अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनीही सोपल यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या चिन्हावरील एकही उमेदवार या निवडणुकीत नसल्याने घड्याळाचेही अस्तित्व जवळपास संपुष्टात आले, असेच म्हणावे लागेल. महाविकास आघाडीतील तिसरा घटक पक्ष काँग्रेसनेही आपला सवतासुभा मांडला असून त्यांनी बऱ्याच प्रभागात आपले उमेदवार उभे केले आहेत. एकंदरीत महाविकास आघाडी नव्हे तर केवळ उध्दव सेना विरुध्द भाजप-शिंदे सेना महायुती असा सरळ सामना या निवडणुकीत रंगणार आहे. त्यामुळे बार्शीकर जनता कमळ, धनुष्यबाण की मशालीला साथ देणारफुले? कोणत्या नेत्याच्या राजकीय निर्णयाचे स्वागत करणार?फुले हे मात्र निकालानंतरच समजणार आहे.

## अकलूज नगराध्यक्षासाठी ६ तर नगरसेवकासाठी १०१ अर्ज पात्र

### नगराध्यक्षपदाचा एक अर्ज डमी असल्याने बाद तर उमेदवारांचे ४५ अर्ज अपात्र

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१८ नोव्हेंबर-**



अकलूज नगरपरिषदेच्या उम ेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया आज सकाळी ११ ते दुपारी साडेतीन वाजेपर्यंत झाली. यामध्ये नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी आलेल्या अर्जांपैकी एकूण १०७ अर्ज पात्र ठरले. त्यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी सहा तर नगरसेवकापदासाठी १०१ अर्जांचा समावेश आहे.

नगराध्यक्षपदासाठी एकूण ७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी सहा पात्र तर एक अर्ज अपात्र ठरला. अपात्र ठरलेला अर्ज हा डमी अर्ज असल्याने व त्यावर फक्त एकच सूचक असल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार तो अर्ज अवैध ठरविण्यात आला. सदस्यपदासाठी १४६ पैकी १०१ अर्ज पात्र ठरले. एकूण १ ते १३ प्रभागासाठी १४६ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. छाननी दरम्यान ४५ अर्ज अपात्र ठरले तर १०१ अर्ज पात्र झाले. छाननी प्रक्रिये दरम्यान कोणत्याही उमेदवाराने दुसऱ्या उमेदवाराच्या अर्जाविरोधात कोणतीही हरकत (ऑब्जेक्शन) नोंदवलेली नाही.

**निवडणूक आयोगाचा सुधारित नियम**

राज्य निवडणूक आयोगाने काल जारी केलेल्या सूचनेनुसार मान्यता प्राप्त पक्षांच्या पूरक उमेदवाराच्या अर्जावर फक्त एकच सूचक असल्यास तो अर्ज वैध मानावा, आणि उमेदवाराने माघार घेतली नाही तर त्याला अपक्ष म्हणून ग्राह्य धरावे असे नमूद केले होते. तथापी आज आयोगाने सुधारित सूचना काढून स्पष्ट केले की राजकीय पक्षाच्या पूरक उमेदवाराला जर केवळ एक सूचक असेल तर त्याचा अर्ज वैध धरण्यात येणार नाही. अपक्ष म्हणून पात्र होण्यासाठी किमान पाच सूचक असणे बंधनकारक आहे. अकलूज नगरपरिषद निवडणूक २०२५ प्रभागनिहाय अपात्र अर्ज (बाद अर्ज) प्रभाग १ मधून ४ उमेदवार,प्रभाग २ मधून २ उमेदवार ,प्रभाग ३ मधून ५ उमेदवार,प्रभाग ४ मधून ३ उमेदवार, प्रभाग ५ मधून ३ उमेदवार,प्रभाग ६ मधून ४ उम ेदवार,प्रभाग ७ मधून २ उमेदवार,प्रभाग ८ मधून २ उमेदवार, प्रभाग ९ मधून ५ उमेदवार,प्रभाग १० मधून ३ उमेदवार,प्रभाग ११ मधून ५ उमेदवार,प्रभाग १२ मधून ३ उमेदवार, प्रभाग १३ मधून ४ उमेदवार.

## बार्शी नगराध्यक्षासाठी १० तर नगरसेवकपदासाठी २८४ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी १० तर नगरसेवक पदासाठी २८४ असे एकूण २९४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले यांनी दिली. अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्याने नगरपालिका परिसराला जत्रेचे स्वरुप प्राप्त झाले होते. निवडणूक अर्ज दाखल करुन घेण्याची प्रक्रिया अतिशय संथ गतीने सुरु असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यास वेळ लागत होता.

निवडणूक प्रशासनाच्यावतीने नगरपालिका आवारात मंडप उभारण्यात आला होता. त्याठिकाणी उमेदवार व त्यांच्यासोबत आलेले कार्यकर्ते थांबले होते. उमेदवारांनी अर्ज दाखल केल्यानंतर नगरपालिका आवारात आपापल्या समर्थकांसमेवत ग्रुप फोटो काढत होते. अर्ज भरण्यासाठी उमेदवाराच्या रांगा लागल्याचे चित्र पहिल्यांदाच दिसून आले. बरोबर दुपारी ३ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले यांनी नगरपालिकेच्या जिन्यातील जाळीला कुलूप लावून सर्व इच्छुक उमेदवार आतमध्ये घेतले. रात्री सात वाजेपर्यंत उमेदवारांचे अर्ज घेतले जात होते. त्यामुळे उमेदवार अक्षरशा ताटकळून गेल्यासारखे झाले होते.

बार्शी नगरपालिका निवडणुकीत उध्दव ठाकरेच्या शिवसेनेच्यावतीनेही सर्व जागेवर आपले उमेदवार उभे केले आहेत तर तिकडे महायुतीत भाजपच्यावतीने नगरसेवकपदासाठी ३६ आणि नगराध्यक्ष पदासाठी एक असे ३७ उमेदवारी अर्ज दाखल केले. शिंदे सेनेला सहा जागा सोडण्यात आल्याने त्यांच्या उमेदवारांनी धनुष्यबाणाच्या चिन्हावर आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. सोपल-बारबोले यांच्यावतीने उध्दव सेनेच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार निर्मला बारबोले यांनी मशालीच्या चिन्हावर अर्ज दाखल केले. माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह जिल्हा प्रमुख लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पक्षाचे एबी फॉर्म सादर केले.

## राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमित्त मोडनिंब येथे पत्रकारांचा सन्मान

**मोडनिंब, दि.१८ नोव्हेंबर-**

मोडनिंब (ता. माढा) येथे रोटरी क्लब ऑफ मोडनिंबच्या वतीने राष्ट्रीय पत्रकारिता दिनानिमि त्त मोडनिंब शहरातील पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी रोटरी आणि प्रसार माध्यमे यांनी एकत्र येऊन कार्य केल्यास मोठे सामाजिक काम होईल, असे मत डॉ.प्रशांत कोल्हे यांनी व्यक्त केले. यावेळी मोडनिंब प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रथमेश पवार, मारुती वाघ, प्रकाश सुरवसे, विरण कुलकर्णी, प्रा.रमेश शिरसट,अभिषेक पवार, विजय परबत, अजित खडके यांचा प्रमाणपत्र, शाल, सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. रोटरीचे अध्यक्ष निलेश गिड्डे, डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ.शशिकांत वागज, सुनिल रेपाळ, प्रल्हाद साळुंखे, बापू व्यवहारे, उमेश शिंदे यांनी पत्रकारांचा सत्कार केला.



रोटरीचे अध्यक्ष गिड्डे यांनी ग्रामीण पत्रकारांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. सचिव सुनील रेपाळ यांनी सूत्रसंचालन केले. मोडनिंब प्रेस क्लबचे अध्यक्ष पवार यांनी रोटरी क्लब समाजोपयोगी उपक्रम ाचे कौतुक केले. प्रा. शिरसट यांनी आभार मानले.

## किल्ले बांधणी स्पर्धा; २६ रोजी बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ नोव्हेंबर -**

येथील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने वतीने तालुकास्तरीय किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि.२६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता संघटनेच्या कार्यालयात बक्षीस वितरण होणार आहे. सदर कार्यक्रम पुणे येथील सहा.पोलीस निरीक्षक चेतन थोरबोले, सांगोला तालुका पशुवैद्यकीय अधिकारी अस्लम सय्यद, कवठेमहांकाळ येथील पोलीस उपनिरीक्षक अमोल शिवशरण यांच्या हस्ते व मुंबई येथील विनोबा भावे नगरचे पोलिस उपनिरीक्षक रमेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमास सर्व स्पर्धकांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.

## कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर यांनी मुख्यमंत्र्यांशी साधला संवाद



### पुणे विभागाचे केले प्रतिनिधित्व; २५ हजार सरपंचांतून मिळाली संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ नोव्हेंबर :**

भारतीय गुणवत्ता परिषदेच्यावतीने मंगळवारी दि. १८ नोव्हेंबर रोजी सरपंच संवाद ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील सरपंच यशपाल वाडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. वाडकर यांना २५ हजार सरपंचांमधून संवादाची संधी मिळाली असून, त्यांनी पुणे विभागाचे प्रतिनिधित्व केले आहे.

गावातील जिल्हा परिषद शाळेला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने त्या कार्यक्रमासाठी सरपंच वाडकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना निमंत्रण दिले व त्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्विकार केला.

यावेळी सरपंच संवाद कार्यशाळेतून मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थानिक प्रश्नांची माहिती घेऊन त्यांचे निराकरण करुन सरपंचांना मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत महाराष्ट्रातील २५ हजार सरपंच दृकश्राव्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यात मोजक्या सात ते आठ सरपंचांना आपल्या गावातील कार्याचा आढावा सांगण्याची संधी मिळाली. पुणे विभागात वाडकर (लोकनियुक्त सरपंच, ग्रामपंचायत कासेगाव, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) या एकमेव सरपंचांना मुख्यमंत्र्यांशी बोलण्याची संधी मिळाली. त्यांनी यावेळी कासेगावच्या विकासाची यशोगाथा सांगितली. यात प्रामुख्याने सरपंच संवाद उपक्रमाच्या माध्यमातून सुरु असलेले प्रयत्न, अंतर्गत निधीच्या माध्यमातून जलसंधारण, कृषी, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण या विविध विषयांवर गावात सुरु असणारे कार्य, मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत राबवले जाणारे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम, महिला ग्राम सभेत ठराव करून व गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या सहकार्याने गावात केलेली दारूबंदी आदी विषयांबद्दल मुख्यमंत्र्यांना अवगत केले. त्यांच्या कार्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, नांदणीचे सरपंच शिवानंद बंडे यांच्यासह जिल्ह्यातील सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर ऑनलाईन वर्षा निवास स्थानी मुख्यमंत्र्यांसह, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, एकनाथ ढवले, जिग्नेश शाह, दिलीपसिंह बैस, श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.